शनिवार । २२ फेब्रुवारी १९७५
एक रुपया

# माणूस

## कांगारूचे पुनरागमन




**माणूस** पुढील अंक
चित्र वार्ता पुस्तक
पुरवणीसह
प्रसिद्ध होत आहे.

किंमत एक रुपया
विक्रेत्यांनी कृपया नोंद घ्यावी.

# साप्ताहिक माणूस

| संपादक | साहाय्यक | शनिवार | वर्ष : चौदावे |
| --- | --- | --- | --- |
| श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर | २२ फेब्रुवारी | अंक : एकूणचाळीसावा |
| | सौ. निर्मला पुरंदरे | १९७५ | किंमत : एक रुपया |


# मा. यशवंतराव, तर्कतीर्थ आणि बदल

श्री. यशवंतराव चव्हाण यांनी जयप्रकाशांच्या चळवळीविरुद्ध अगदी ठाम भूमिका घेतलेली आहे. बोर्डी शिबिरात व नुकत्याच झालेल्या सातारा दौऱ्यात त्यांनी जयप्रकाशांशी राजकीय सुसंवाद साधण्याची कल्पना पूर्णपणे धुडकावून लावली व कुठल्याही तडजोडीला स्पष्ट नकार दर्शवला. याविषयी बचावात्मक भूमिका घेऊ नये, जनतेत जाऊन खंबीरपणे आपली बाजू मांडावी असाही थोडा आक्रमक सल्ला त्यांनी काँग्रेसजनांना या दौऱ्यात दिलेला आहे. चव्हाण बोले आणि काँग्रेस डोले अशी निदान महाराष्ट्रापुरती तरी स्थिती असल्याने हा सल्ला पूर्णपणे मानला जाईल व धारिया वगैरे किरकोळ अपवाद निकालात निघतील यात काही शंका नाही. तरी बरे, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी जयप्रकाश चळवळीबरोबर असा संवाद व्हायला हवा असे मत नुकतेच प्रकट केलेले आहे. तर्कतीर्थांचे आणि यशवंतरावांचे जिव्हाळ्याचे संबंध सर्वश्रुतच आहेत. पण चव्हाणांचे हिशोब वेगळे. तर्कतीर्थांना कुठे दिल्लीचे राजकारण खेळायचे आहे ? आणि चव्हाणांना आजवर फक्त दिल्लीच महत्त्वाची वाटत आलेली आहे. त्यासाठी त्यांनी हव्या त्या तडजोडी आजवर केलेल्या आहेत, नको त्या भूमिका घेतलेल्या आहेत. अर्जुनाला जसा झाडावरील पोपटाचा फक्त डोळाच दिसत होता तसा चव्हाणांना फक्त सत्तेचा पुढचा गोळाच दिसत आलेला आहे. ज्यांच्या हाती सत्तेची सूत्रे असतील त्यांच्याशी यासाठी कधीही, केव्हाही संघर्षाचा प्रसंग न उद्भवू देण्याचे पथ्य चव्हाणसाहेब कटाक्षाने पाळीत आलेले आहेत व त्याचे फळही आजवर त्यांना मिळत राहिलेले आहे. मग तो जुना संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न असो की नवा जयप्रकाशांच्या चळवळीचा प्रसंग असो. तत्त्वापेक्षा चव्हाणांनी व्यक्ती मोठी मानली. जनतेपेक्षा, ध्येयधोरणांपेक्षा वरिष्ठ नेतृत्वावर विश्वास प्रकट केला. आज इंदिरा गांधी जयप्रकाशांच्या चळवळीला कडाडून विरोध करीत आहेत. चव्हाणसाहेब गप्प राहिले असते तरी चालण्यासारखे होते. तसे त्यांचे स्थान बळकट आहे. पण शंकेला जागा नको म्हणून त्यांनीही खाडिलकरांप्रमाणे एकदम जयप्रकाश विरोधाचा चढा सूर लावला आणि आपले स्थान अधिकच घट्ट करून घेतले. उद्या इंदिरा गांधींची भूमिका बदलली तर चव्हाणांची भूमिकाही बदलल्याशिवाय राहाणार नाही. कारण चव्हाणांची अशी खास, वेगळी, स्वतंत्र व आग्रही भूमिकाच नसते. उजव्या कम्युनिस्टांच्या सहकार्याबाबत चव्हाणांनी व्यक्त केलेल्या मताबद्दल म्हणूनच आश्चर्य वाटून घेण्याचे कारण नाही. कारण ते आज इंदिरा गांधींचे मत आहे, बाईंचे सध्याचे ते धोरण आहे. उद्या बाई बदलल्या तर यशवंतरावही बदलतील, हे निश्चित. कारण आजवरची यशवंतरावांची ही राजकारणात हमखास यशस्वी ठरत आलेली 'लाईन' आहे. 'पॉलिसी' आहे. तर्कतीर्थ पडले विचारवंत, त्यामुळे त्यांनी जयप्रकाशांच्या चळवळीला योग्य ते महत्त्व देण्याचे आवाहन केले. पण चव्हाणांची बात निराळी आहे. त्यांना हे सत्तेपलीकडचे जनमानसाचे प्रवाह ध्यानात घेण्याची अवश्यकताच काय ? त्यांनी आपले सत्तेचे बुरूज यानिमित्ताने पक्के करून घेतले हे त्यांच्या आजवरच्या लौकिकाला साजेसे असेच आहे. नवीन काही नाही.

¤

पण एक गोष्ट खरी. चव्हाणांच्या या धोरणामुळे महाराष्ट्रात सुस्थिरता राहिली हेही नाकारून चालणार नाही. महाराष्ट्रातील सत्तान्तरेही त्यामुळे तुलनेने खूपच सुरळित व समजुतीच्या वातावरणात पार पडली. संघर्ष फारसे टोकास गेले नाहीत, आतल्याआत तडजोडी होऊन मार्ग निघाले. अर्थात या सुस्थिरतेलाही किती महत्त्व द्यायचे हा प्रश्न आहेच. सुस्थिरता कशासाठी हा खरा प्रश्न आहे. शेतीक्षेत्रात नाईकांसारखा शेतीप्रेमी मुख्यमंत्री असूनही प्रगती करू शकला नाही हे इंदिरा गांधींनी पुण्यात येऊन सांगेपर्यंत कुणाला माहीतच नव्हते. उद्योगधंद्यांचे काय झाले ? नासिक–पुणे–मुंबई या त्रिकोणाबाहेर उद्योगधंदे किती निघाले ? उत्पादन वाढले का ? बेकारी कमी झाली का ? अशा मूलभूत पातळीवर महाराष्ट्राच्या सुस्थिरतेची चिकित्सा एकदा व्हायला हवी. सुप्रसिद्ध चव्हाण–दांडेकर वादात रागवारागवी फार झाली. चिकित्सा व समालोचन झाले नाही. आत्तापर्यंतची वाटचाल चुकली असल्यास नवी वाट कशी असावी याबद्दलचा थंड, शास्त्रशुद्ध विचार झाला नाही. असा विचार केल्यावर जे उत्तर निघेल ते खरे चव्हाणकालखंडाचे मूल्यमापन. नाहीतर सुस्थिरतेचे उगाचच स्तोम माजत राहील आणि बदलाचे वारे येईनासे होतील.

जयप्रकाश चळवळीचा तरी दुसरा अर्थ काय आहे ? आज येथील जनमानसात बदल हवा अशी तीव्र जाणीव निर्माण झालेली आहे. जयप्रकाश या जाणीवेचे प्रतीक आहेत. मंत्रिमंडळात बदल करून किंवा केवळ मुख्यमंत्री बदलून महाराष्ट्र या जाणिवेकडे डोळेझाक करणार आहे का ? मग एक वेळ अशी येईल, की सुस्थिरतेची किंमत मोजूनही लोक बदलाचे स्वागत करतील. हे खरे आहे, की ही वेळ अजून महाराष्ट्रात आलेली नाही. पण येणारच नाही अशाही समजुतीत कुणी राहू नये.

—श्री. ग. मा.

# ही चळवळ अपेशी होऊन चालणार नाही

## एस्. एम्. जोशी

बिहारमध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी भ्रष्टाचार, बेकारी, महागाई, आणि निकामी शिक्षणपद्धती याविरुद्ध आंदोलन सुरू केले. कॉलेजे बंद पाडली. विधानसभेवर मोर्चे नेले. परंतु सरकारने दखल घेतली नाही. उलट अमानुष दडपशाही करून आंदोलन मोडून काढण्याचा यत्न केला. तेव्हा विद्यार्थ्यांनी सर्वोदयी नेते जयप्रकाश नारायण यांना आंदोलनाचे नेतृत्व स्वीकारण्याची विनंती केली, तेव्हापासून ते आंदोलन लोकशाही विरोधी आहे असा बकवा काँग्रेसवाले आणि उजवे कम्युनिस्ट, यांनी सुरू केला आहे. इंदिरा गांधींच्या पुरोगामी धोरणाविरुद्ध, प्रतिगामी शक्तींनी केलेला हा हल्ला आहे, अशी आवई उठविली. तसा प्रचार आकाशवाणी व सरकारी प्रचारयंत्रणेद्वारा सतत करण्यात येतो. इतकेच काय परंतु रशियानेही आपल्या प्रचारयंत्रणेचा वापर करून आंतरराष्ट्रीय जगतातही त्याचे लोण नेऊन पोचविले. इतके करूनही आंदोलन वाढतच चालले, हे पाहून इंदिराजींच्या सरकारने आपल्या पाशवी बलाचा बेमुर्वत वापर करण्यास प्रारंभ केला. आंदोलनाने उपस्थित केलेले प्रश्न रस्त्यावर येऊन सुटत नाहीत, असे सांगत असताच इंदिरा गांधींनी आपला पक्ष व कम्युनिस्टांना रस्त्यावर येऊन जयप्रकाशविरोधी निदर्शने करण्याचे आवाहन केले. त्यासाठी सरकारकडून सर्व प्रकारची मदतही त्यांनी दिली.

जे कम्युनिस्ट संसदीय लोकशाहीविरुद्ध जन्मभर शंखनाद करीत आले, तेच आता संसदीय लोकशाहीचे पाठीराखे म्हणून मिरवू पाहत आहेत. त्यांचा हा मानभावी पवित्रा इंदिराजींचा पाठपुरावा करून शासनात घुसण्यासाठी आहे. उजव्या कम्युनिस्टांची भूमिका समजणे कठीण नाही. कारण त्यांनी खऱ्या-खोट्याचा कधी विधि-निषेध बाळगलेला नाही. म. गांधींच्या शुद्ध साधनाबद्दलच्या आग्रहाची त्यांनी सतत टवाळीच केली आहे. आपले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी वाटेल त्या मार्गांचा अवलंब करण्याची त्यांची नेहमीच तयारी असते. ते ज्या चळवळीत असतील, ती क्रांतिकारी व ते ज्या आंदोलनावर बहिष्कार घालतील ते सारे प्रतिगामी—असा त्यांचा खाक्या असतो.

इंदिरा गांधींनीदेखील लोकशाहीच्या नावाखाली, जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखालील बिहार आंदोलनास विरोध करावा, हे विशेष समजले पाहिजे. बिहारमधील काँग्रेसपक्ष सडलेला आहे. गोरगरिबांच्या दृष्टीने तेथे कायद्याचे राज्य राहिलेले नाही. भ्रष्टाचाराचा धुडगूस चालला आहे. अशा स्थितीत कॉलेजातील विद्यार्थ्यांनी भ्रष्टाचारविरोधी आंदोलन सुरू केले व जयप्रकाशजीं-सारख्या सर्वोदयी नेत्याचे मार्गदर्शन स्वीकारले, तर त्याचे त्यांनी स्वागतच करायला हवे होते. तसे न करता जे. पीं. ना करचुकव्यां-कडून मदत मिळते, त्यांच्या अतिथिगृहात ते उतरतात अशी चिखल-फेक त्यांनी सुरू केली. जनतेने—विशेषतः तरुणपिढीने—देशापुढील प्रश्न सोडविण्यास सहकार्य द्यावे, अशी आवाहने त्या वेळोवेळी करीत असतात. बिहारच्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या या उप-क्रमाचे त्यांनी स्वागत करून त्याचा उपयोग देशकार्यासाठी करून घ्यायला हवा होता. स्वातंत्र्य लढ्यात वेळोवेळी विद्यार्थ्यांनी आणि तरुण पिढीने मोठ्या संख्येने उड्या घेतल्या आहेत. १९२० च्या असहकार-आंदोलनात, १९३० च्या मिठाच्या सत्याग्रहात व ४२ च्या 'चले जाव' लढ्यात विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने भाग घेतला. त्या आंदोलनाचे लोण महाविद्यालयापर्यंत पोचत असे आणि विधार्थी आपला नि त्याचा अभ्यासक्रम सोडून समूहाने त्यात हिरीरीने भाग घेत असत. त्यामुळे आंदोलनाला तेज चढून ते प्रखर बनण्यास सहाय्य होई. स्वराज्य प्राप्तीनंतर मात्र ही प्रक्रिया कुंठीत झाली. पश्चिम बंगालचा अपवाद वगळल्यास, विद्यार्थ्यांनी समाजपरि-वर्तनाच्या आंदोलनासाठी मोठ्या संख्येने शाळा-कॉलेजे सोडल्याचे दिसत नाही. क्रांतिकारी विरोधी पक्षातही स्वातंत्र्यपूर्वकाळी तरुणातून बरीच भरती होत असे. स्वराज्य मिळाल्यावर ती बंद पडली. राज्यकर्त्या पक्षाने आता सर्व काही शासनामार्फत होऊ शकेल, असा जो आभास निर्माण केला, त्याचाही हा परिणाम असू शकेल. तरुणांना वाटू लागले, की उच्च शिक्षण घेऊन बाहेर पडलो, की आपणाला उन्नतीचे दरवाजे खुले होतील. निरनिराळे व्यवसाय सुरू करता येतील. नोकऱ्या मिळू शकतील व सुखासमाधानाने दिवस व्यतीत करता येतील. समाजाच्या दृष्टीने आपल्याला काही करायचे आहे, असे त्यांना वाटेनासे झाले. सामाजिक कर्तव्याचा विसर पडला, समाजपरिवर्तनाबाबत ते उदासीन बनले.

सत्ताधारी काँग्रेसलाही आपण सर्व काही करू शकतो, सामाजिक व आर्थिक क्रांती आपल्या हातानेच होऊ शकते, असे वाटू लागले. स्वातंत्र्याच्या चळवळीत सतत जनसंपर्क साधून लोकशाही निर्माण करण्याचे जे काम करण्यात येई ते संपुष्टात आले. गोरगरीब श्रम-जीवींना आता समाज परिवर्तनासाठी काही संघर्षात्मक अथवा रचनात्मक कार्य करावयाची आवश्यकता नाही, अशी समज होऊन बसली. काँग्रेसचा सामान्य जनांबरोबर संपर्कच उरला नाही. पक्ष, हे निवडणुका जिंकण्याचे यंत्र होऊन बसले. गोरगरिबांमध्ये कार्य करून त्यांची सहानभूती आणि सहयोग मिळविण्याऐवजी जातपात, पैसा, भाषा, इ. गोष्टींचा वापर निवडणुक जिंकण्यासाठी होऊ लागला.

विरोधी पक्षांची अवस्था यापेक्षा फारशी निराळी आहे, असे म्हणता येत नाही. स्वातंत्र्यचळवळीतील क्रांतीची प्रक्रिया काँग्रेस-

वाल्यांनी सत्तेवर आल्यावर सोडून दिली, ती पुन्हा जोरात सुरू करण्यासाठी म्हणून समाजवादी पक्ष काँग्रेसमधून बाहेर पडला. श्रमजीवींच्या जीवनातील दैनंदिन गाऱ्हाणी सोडविण्यासाठी त्यांची संघटना उभारायची, वर्गीय लढे तीव्र करायचे, व त्याच्या भरीला रचनात्मक व शैक्षणीक कार्य करून लोकशक्तीचा दबाव समाज-परिवर्तन कार्यासाठी उभा करायचा हे त्यांचे ध्येय होते. फावडे, तुरुंग, आणि मतपेटी ही त्यांची प्रतीके होती. परंतु हळु हळू फावडे व तुरुंग मागे पडून समाजवादी पक्षही निवडणुकीमार्फत सत्ता हस्तगत करण्याच्या दुष्टचक्रात अडकून पडला. त्यानेही लोकप्रबोधनाचा आणि लोकशक्ती जागृत करण्याचा आपला वसा टाकून दिला.

### धनिकवर्गाची पकड

आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळाले, ते निव्वळ लोकशक्तीच्या प्रभावामुळे मिळाले, असे म्हणता येणार नाही. लोकजागृती आणि संघटनेचे लोण समाजाच्या अगदी तळाच्या घटकापर्यंत पोचण्याआधीच दुसरे महायुद्ध सुरू झाले. आंतरराष्ट्रीय परिस्थितीमध्ये फार मोठ्या घडामोडी होऊन गेल्या. त्याचा फायदा आपल्याला मिळाला आणि स्वातंत्र्य प्राप्त झाले. त्यावेळी धनिकवर्गातील सत्ताकांक्षी लोकांची पकड काँग्रेसवर होती, ती स्वराज्यामध्ये अधिक घट्ट झाली. परिणामतः देशाचे आर्थिक नियोजन धनिकवर्गाला फायदेशीर होईल, असे होत गेले. नव्या श्रीमंतांचा एक वर्गही निर्माण होत गेला. शेतीच्या धंद्याकडे दुर्लक्ष झाले. वित्तीय साधने प्रामुख्याने कारखानदारीवरच खर्च करण्यात आली. देशाच्या आर्थिक विकासासाठी अवजड उद्योगधंदे हवेतच. पण त्याचबरोबर नव श्रीमंतांचे व धनिकांचे चोचले पुरविणाऱ्या चैनीच्या वस्तूंच्या उत्पादनाने गडगंज फायदा लुबाडण्यासाठीही भांडवलाची गुंतवणूक भलत्याच क्षेत्रात होऊ लागली. त्यासाठी देशी कंपन्या विदेशी सहभागाने स्थापन झाल्या. इतकेच काय पण चैनीच्या उपभोग्य वस्तूंची चोरटी आयात करण्याचा धंदाही तेजीत आला. राज्यकर्त्या पक्षाला निवडणुकीसाठी अमाप पैसा पुरवून आपला चोरबाजार धूमधडाक्याने चालू ठेवण्याची त्यांनी व्यवस्था करून ठेवली. मनुष्यबळाचा वापर करण्याचा आग्रह धरला गेला नाही. साहाजिकच बेकारी, भ्रष्टाचार, महागाई, वाढत गेली. भ्रष्टाचार राज्यकर्त्यांपासून सुरू झाला आणि सर्वदूर पसरला. भ्रष्टाचाराचा जणू महारोगच समाजशरीरास लागल्यासारखा झाला.

विरोधी पक्ष व राज्यकर्ता पक्ष आपल्यासाठी काही करू शकेल, याचा भरवसा जनतेला वाटेनासा झाला. एकाच प्रकारच्या विचारसरणीने चालू पाहणारे अनेक पक्ष केवळ डाव पेचांच्या बारीकसारीक मुद्यांवर भांडून विभागले गेले. शोषित आणि पीडीत जनतेने आशेने कोणाकडे पहावे, अशी स्थिती राहिली नाही. जुलमाचा कहर झाला, अज्ञानी जनता निरनिराळ्या ठिकाणी बंड करून उठली, तरी उपयोग होत नसतो. फुटकळ प्रयत्नांना शासन सहज चिरडून टाकू शकते. नागरी हक्कांची पायमल्ली झाली, तरी त्याची दखल घेणार तरी कोण ! लब्धप्रतिष्ठित उच्चभ्रू समाजाला त्यात लक्ष घालावेसे वाटले नाही. कोणाचा अंकुशच राहिला नाही.

### दोन लाटातील फरक

अशा प्रकारे सामान्य जनांची सर्व बाजूंनी कोंडी झाली असताना बिहारच्या कॉलेज–विद्यार्थ्यांनी भ्रष्टाचार, बेकारी, महागाई, व निकामी शिक्षणपद्धतीविरुद्ध बंडाचा झेंडा उभारला. सामूहिक पुरुषार्थाची जिद्द पकडून ते मैदानात उतरले. सर्वोदयी नेते जयप्रकाश यांना त्यांनी मार्गदर्शनाची विनंती केली आणि आपले भवितव्य सामान्यजनांच्या भवितव्याशी जोडून जनतेला मैदानात उतरण्याचे त्यांनी आवाहन केले. युवाशक्ती आणि जनशक्ती असा हा संगम होऊन सर्वोदयी जे. पीं.चे त्यांना नेतृत्त्व लाभले. समाजातील निरनिराळ्या विभागांचे नेतृत्व करणाऱ्या आणि स्वतःला क्रांतिवादी म्हणविणाऱ्या पक्षांना जमले नाही ते युवाशक्तीने घडवून आणले. जनतेला आपण मैदानात उतरून आपली गाऱ्हाणी सोडविण्यासाठी चळवळ केल्याशिवाय तरणोपाय नाही अशी जाणीव झाली. स्वातंत्र्यापूर्वीच्या लोकसंघर्षांतून लोकशक्ती निर्माण करण्याची परंपरा नव्याने सुरू झाली. जनता मैदानात उतरली तरी तिला योग्य दिशा दाखवून पुढे नेणारा पुढारी कोण होता ? जयप्रकाश नारायण यांनी ती उणीव भरून काढली. कुजलेला डाव पुनः सुरू झाला. नवजागृतीची ही लाट बिहारपुरती सीमित राहिली नाही, देशभर तिचे पडसाद ऐकू येऊ लागले. काँग्रेसच्या भ्रष्टाचार व हुकूमशाहीपुढे इलाज चालत नाही असे म्हणून निराशेने स्वस्थ बसलेली मंडळी आणि मध्यम श्रेणीचे लोकही जयप्रकाशांच्या आंदोलनाबद्दल आस्थेने विचारपूस करू लागले.

इंदिरा गांधींची लोकप्रियता व जयप्रकाशजींची लोकप्रियता, यामध्ये गुणात्मक फरक आहे. इंदिरागांधी आता गरिबी हटवितील, त्यासाठी नवी धोरणे आखतील, आर्थिक नियोजन करतील, या आशेने जनता त्यांच्या भजनी लागली होती. परंतु त्यांनी जनतेची निराशा केली. याच्या उलट युवाशक्ती व जनशक्ती स्वतः मैदानात उतरून त्यागास तयार झाली आणि जयप्रकाशजींचे नेतृत्त्व त्यांनी स्वीकारले. आपले नष्टचर्य संपायचे, तर वैयक्तिक पुरुषार्थाने काम भागणार नाही. सामूहिक पुरुषार्थाचा मार्ग चोखाळावा लागेल, ही जाणीव होऊन मैदानात उतरलेल्या पुरुषार्थी व कार्यप्रवण जनतेचे नेतृत्व जे. पी. करीत आहेत. बिहार–चळवळीचे हे वैशिष्टच आहे. जनजागृतीची स्वातंत्र्यानंतर कुंठित झालेली प्रक्रिया आता पुन्हा सुरू झाली आहे. समाजाचा कारभार चालविण्यास, तसेच दारिद्र्याच्या चिखलातून समाज वर काढण्यात जनता सहभागी होऊ लागेल तेव्हाच लोकशाही दृढमूल होऊ शकेल. म्हणूनच भारतात लोकशाही जिवंत रहावयाची, तर ही चळवळ अपेशी होऊन चालणार नाही. तसे झाले, तर भारतीय लोकशाहीला भवितव्य राहणार नाही.

इंदिरा गांधी आणि त्यांचे कम्युनिस्ट साजिंदे मात्र तोंड फाटेपर्यंत ओरडून सांगताहेत की, जयप्रकाशजींचे आंदोलन लोकशाहीविरोधी आहे. परवा एका सुप्रसिद्ध दैनिकाच्या प्रतिनिधीने मला प्रश्न केला की, जे. पीं. च्या आंदोलनाला भांडवलदारांचा व प्रतिगाम्यांचा पाठिंबा आहे तो कशासाठी ? त्यांना काय सुचवावयाचे आहे, ते माझ्या लक्षात आले. मी म्हटले की, इंदिरा गांधींना प्रभावीपणे लोकशाही मार्गाने विरोध करील असा पक्ष देशात न उरल्याने व देशातील आर्थिक परिस्थिती उत्तरोत्तर बिघडत जात असल्याने इंदिरा गांधींची पावले हुकूमशाहीकडे वळू लागली आहेत. तसे नसते तर गफूर सरकारने विद्यार्थ्यांना ज्याप्रकारे झोडपून काढले, ते त्यांनी खपवून घेतले नसते. परंतु गफूर सरकारच्या दडपशाहीकडे त्यांनी

दुर्लक्षच केले. धनिकांना वाटत असावे की, जयप्रकाशजींच्या आंदोलनातून काँग्रेसच्या अरेरावी राजवटीला पर्याय उभा राहणे शक्य आहे. लोकशाही जिवंत राहिली तर खाजगी उद्योगधंद्याला काही स्थान राहू शकेल. समाजातील प्रत्येक गट आपल्या फायद्याच्या दृष्टीनेच आपली धोरणे आखीत असतो. सर्वसामान्य जनतेनेही आपल्या हिताचाच विचार करणे आवश्यक आहे. लोकजागृती झाली आणि सत्ता गोरगरीब जनतेकडे खऱ्या अर्थाने आली, तरच त्यांचा उद्धार होऊ शकेल—ही गोष्ट सर्वसाधारण लोकांना पटली आहे, म्हणूनच जयप्रकाशजींच्या आंदोलनाला जनतेचा प्रचंड पाठिंबा मिळत आहे.

आंदोलनाला धनिकांचा पाठिंबा मिळत आहे, केवळ एवढ्यानेच ते प्रतिगामी होऊ शकत नाही. इंदिराजींच्या पक्षाला देखील बडे भांडवलदार, जमीनमालक यांचा पाठिंबा आहे. तरीही त्या समाजवादी आणि पुरोगामी राहू शकतात; आणि जे. पीं. च्या आंदोलनाला धनिकांनी मदत केली, म्हणून ते प्रतिगामी काय ? प्रश्न असा आहे की, जयप्रकाशजींच्या चळवळीवर प्रभुत्व कोणाचे आहे ? जयप्रकाशजींचे की भांडवलवाल्यांचे ? तसेच इंदिरा गांधींच्या पक्षावर पगडा कोणाचा आहे—त्यांचा की काळाबाजारवाल्यांचा आणि बड्या भांडवलदारांचा ? या प्रश्नाचा निर्णय करायचा तर त्या पक्षाची कृती काय आहे, ते तपासावे लागेल. गेल्या चार पाच वर्षांची इंदिरा गांधींची कारकीर्द तपासली, तर स्पष्ट दिसून येते की, त्यांच्या राज्यात भांडवलशाहीची, करचुकवे आणि भ्रष्टाचारी लोकांची चलती आहे. गोरगरीब, श्रमजीवींची दैन्यावस्था आहे. इतकेच काय परंतु शोषित जनतेने उठाव केला, मजुरांनी संप केले, तर त्यांना सैनिकी दडपशाही करून झोडपून काढण्यात येते. गेले ते दिवस बरे होते, असे म्हणण्याची वेळ सामान्य लोकांवर आहे.

## ठोकळेबाज कार्यक्रम नकोच

जयप्रकाशजींच्या हाती सत्ता नाही. ती मिळावी, म्हणून त्यांची खटपटही नाही. पण गेली वीस वर्षे खेड्यापाड्यांतून जे. पी. हिंडत आहेत. ग्रामीण जनतेचे प्रश्न सोडविण्याचा सतत प्रयत्न करीत आहेत. विरोधी पक्षांनी देखील त्यांची निराशा केली. शेवटी त्यांना असे वाटू लागले की, तरुण पिढी जागृत झाली, तरच काही होऊ शकेल. गुजरातमध्ये त्यांना युवाशक्तीचे ओझरते दर्शन झाले, त्यानंतर बिहारमधील कॉलेज विद्यार्थी मैदानात उतरले. जे. पीं. नी त्यांचे नेतृत्व स्वीकारले, आणि विद्यार्थ्यांचे आंदोलन—जनान्दोलन होऊन गेले. आंदोलनावर जे. पीं. ची पकड आहे. ते संपूर्ण क्रांतीची घोषणा करीत आहेत. हजारोंच्या संख्येने सुशिक्षित तरुण आणि लक्षावधी गोरगरीब त्यांची भाषणे मन लावून ऐकत आहेत. तरुणांनी विरोधकांची सभा मोडण्याचा प्रयत्न केला, तर त्यांची ते कानउघडणी करतात. जाती मोडल्या पाहिजेत, एवढेच प्रतिपादन करून ते थांबत नाहीत. जानवे ही जातीची खूण आहे, श्रेष्ठपणाचे खोटे प्रतीक आहे—ते तोडून टाका असा उपदेश ते करतात—आणि हजारो तरुण जानवी काढून फेकून देतात. हुंडा घेऊ नका असा आदेश देतात. हुंडा घेणारे लोक भ्रष्टाचाराला कसे कारणीभूत आहेत, ते विशद करून दाखवितात. जमीन—मालकांना सांगतात की, कुळांना जमिनींवरून हुसकविलेले इतःपर खपवून घेतले जाणार नाही. बेनामी व्यवहार रद्द करण्यास जनतेला आवाहन करतात. ग्रामसभेला गावशासनाचे अधिकारी मिळाले पाहिजेत. ग्रामसभांना कार्यप्रवण करून लोकशाहीचा पाया नव्याने घालण्यास तरुणांना आणि जनतेला उत्तेजित करतात. जनान्दोलनावर इतके प्रभुत्व असलेला नेता आणि अशा प्रकारचा संपूर्ण परिवर्तनाचा कार्यक्रम सांगणारी चळवळ प्रतिगामी आहे काय ?

कोणी म्हणतात, जे. पीं. च्या चळवळीपुढे स्पष्ट असा सामाजिक—आर्थिक कार्यक्रम नाही. वर उल्लेखिलेला कार्यक्रम कुचकामाचा आहे काय ? पोथीनिष्ठ क्रांतिवाद्यांप्रमाणे क्रांतीची पुस्तके वाचून ठोकळेबाज कार्यक्रम लिहून काढला, म्हणजे तो पक्ष क्रांतिकारी ठरतो काय ? पक्षाच्या त्या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने जागृत जनतेची शक्ती किती आहे, ते पाहावे लागेल. राजनीतीवरील ग्रंथ आणि देशोदेशींच्या घटना वाचून देशासाठी घटना बनविता येत नाही. त्या समाजातील निरनिराळ्या शक्तींचे सतुलन सांभाळून प्रगतीचा मार्ग खुला करून देऊ शकेल, अशीच घटना बनवावी लागते. नाहीतर ती कागदावरच राहून जाते. समाजव्यवस्था खिळखिळी होऊन अराजक निर्माण होते. राजकीय पक्षांनासुद्धा तोच न्याय लागू आहे. त्यांनी आपले ध्येय सुस्पष्ट मांडले पाहिजे. परंतु त्यासाठी जे धोरण आणि कार्यक्रम आखावयाचा, तो अन्यत्र झालेल्या क्रांतीच्या अंधानुकरणाचा असून चालणार नाही. मुख्य प्रश्न आहे जनजागृती व लोकशक्ती उभी करण्याचा. जनतेची क्रांतिकारी शक्ती निर्माण करता आली नाही तर काय उपयोग ? नुसता कार्यक्रम क्रांतिकारी असून भागत नाही. जनशक्ती उभी करण्यासाठी जे आंदोलन केले जाते, त्यातूनच कार्यक्रम साकार होऊ लागतो. मात्र आपले ध्येय सुस्पष्ट असले पाहिजे.

जयप्रकाशजी तेच करीत आहेत. बिहारच्या जनतेच्या दारिद्र्याची, लाचारीची कारणे हुडकून त्यांच्यावर ते प्रहार करीत आहेत. सामाजिक विषमता वाढविणारी जातिप्रथा आणि दुष्ट रूढी, त्याचप्रमाणे जमीनमालकांकडून होणारी कुळांची पिळवणूक, यावर ते प्रहार करीत आहेत. तरीही आमचे तथाकथित क्रांतिवादी लोक सामाजिक—आर्थिक कार्यक्रम नाही अशा सबबीवर त्यांना विरोध करीत आहेत किंवा चळवळीपासून दूर रहात आहेत. खरे म्हणजे जे. पीं. च्या आंदोलनाला जनसंघ आणि संघटनाकाँग्रेससारख्या पक्षांचा पाठिंबा आहे म्हणून ते बुजतात आणि दूर पळतात. या पक्षांचा जे. पीं. ना पाठिंबा असला, तरी त्यांच्या काही अटी कबूल करून जे. पीं. नी त्यांचा पाठिंबा मिळविलेला नाही. तो टिकविण्यासाठी ते आपल्या विचारांना मुरडदेखील घालण्यास तयार नाहीत. कित्येकदा ते उघड सांगतात की, चळवळ प्रभावी झाली आणि बटाईदारांचा व गरीब शेतकऱ्यांचा कार्यक्रम साकार होऊ लागला, म्हणजे आज पाठिंबा देणारी काही मंडळी आपल्याला सोडूनही जातील. इतके असले तरीही गोरगरीब जनतेचे हित करू मागणारे पक्ष त्यांना विरोध करणार आहेत काय ? तसे असेल, तर त्यांना इंदिरा गांधींच्या धोरणाचे प्रच्छन्न समर्थकच म्हणावे लागेल.

## यशस्वितेची फूटपट्टी

जयप्रकाशजींचे आंदोलन यशस्वी होईल काय, असा प्रश्न वेळोवेळी

पृष्ठ ३९ वर



# ऑपरेशन हेमलकसा

प्रकाश भातम्ब्रेकर

हेमलकसा, भमरागड व आसपासच्या गावांतील माडिया–गोंडांच्या जीवनाबद्दल आतापर्यंत बरेचसे प्रसिद्ध झाले आहे. ते बव्हंशाने खरे असले तरी इथे सुरू असलेल्या लोकबिरादरी प्रकल्पाच्या दवाखान्यात काम करणे म्हणजे जिवाचं रान करून तारेवरची कसरत करणे आहे. फक्त माडिया मामाला सुधरवण्याचा प्रश्न नाही; मिल (बल्लारशा पेपर मिल) साठी लागणारे बांबू तोडण्यासाठी व त्यांच्या वाहतुकीसाठी डिसेंबर ते मे या सहा महिन्यांत जवळजवळ दोन हजार कामगार या भागात काम करीत असतात. त्यांपैकी आंध्र प्रदेशातून येणाऱ्या लोकांचेच प्रमाण जास्त असते. भमरागडच्या आसपास ३०–४० मैलांच्या परिसरात एकही दवाखाना नसल्यामुळे (भमरागड येथे सरकारी आयुर्वेदिक डॉक्टराची नेमणूक झालेली आहे. पण डॉक्टर नेहमीच गायब असतात.) आजारी पडले की हे सर्व कामगार इथेच औषधोपचारासाठी येतात. माडिया–गोंड दारू पितो, नाही असे नाही, पण त्याचा कुणालाही त्रास होत नाही. या उलट या कामगारांनी प्यालेली दारू म्हणजे एक भयकर डोकेदुखी ठरते. पण वैद्यकीय धंद्याची परंपरा आणि उदात्तता पाहता या त्रासाकडे कानाडोळा करूनसुद्धा त्यांच्यावर उपचार हे करावेच लागतात. शिवाय माडिया काही 'कोरा कागज' मुळीच नाही. गरिबी, भोळेपणा आणि अठरा विश्वे दारिद्र्य हे जरी त्याचा पाठपुरावा करीत असले तरी इथे आलेल्या इतर सभ्य (?) लोकांमुळे तो बिथरला आहे, बिघडत चालला आहे. या प्रवाहातून त्याची दिशा बदलणे वर्तमानपत्रांतून आपण वाचतो तितके ते सोपे नाही. आणि प्रकल्पात सध्या असलेली पाण्याची तीव्र चणचण यामुळे आधीच काळजीत आणि विवंचनेत असताना वरील सर्व परिस्थितीशी मिळते–जुळते घेणे म्हणजे किती मानसिक उलघाल करावी लागते ते प्रत्यक्ष इथे राहून अनुभवायलाच हवे. किंबहुना प्रकल्पाचे हे चित्र अद्याप जनतेच्या समोर आलेलेच नाही. त्यामुळे इथे पाय रोवून बसण्यापेक्षाही इथे राहणाऱ्या लोकांच्यात मिसळून त्यांच्या कलाने घेत घेत समाज प्रबोधन करायचे म्हणजे खरोखरीच असिधारा व्रत आहे.

महाराष्ट्र सरकारने या प्रकल्पासाठी ५० एकर जागा चंद्रपूरच्या जंगलात देण्याचे कबूल केले. डॉ. प्रकाश आमटे, अजीत वगैरे मंडळींनी इथे येऊन ही जागा पसंत केली. प्रत्यक्ष हेमलकसा गाव इथून दहा मिनिटांच्या अंतरावर. प्रकल्पाच्या मागच्या बाजूला ओढा (नाला) वाहतो आणि नाल्याच्या दुसऱ्या बाजूला कोयनगुडा हे गाव. पाहणी केली तेव्हा नाल्याला भरपूर पाणी होते. शिवाय विचार असा केला, की पाणी जरी आटले तरी विहीर खोदायची म्हणजे शेतीलाही पाणी पुरेल आणि दवाखान्यासाठीही. पण प्रत्यक्षात मात्र अनुभव आला तो निराळाच. बहुतेक फेब्रुवारीच्या मध्यावर नाला संपूर्णपणे कोरडा पडतो. पंचवीस फुटांपर्यंत विहीर खोदली पण पाण्याचा एक टिपूसदेखील न मिळाल्यामुळे तो अट्टाहास सोडून द्यावा लागला. जानेवारीत काही तज्ज्ञ मंडळींनी जागेची पाहणी केली आणि पावसाचे पाणी अडवून ते उन्हाळ्यात पुरवण्याची योजना आखली. पण कोयनगुडा गावाच्या नागरिकांनी ज्या हद्दीत बांध घालावयाचा होता तीस नापसंती दर्शवली आणि ती हद्द शेवटी कमी करावी लागली. म्हणजे एरव्ही शेती व दवाखाना

दोन्हीसाठी पाणीपुरवठा झाला असता. पण आता फक्त पिण्यासाठी जेमतेम पाणी मिळेल. स्वीत्झर्लंडच्या लोकांनी धरणासाठी व दवाखान्यासाठी लागणारा संपूर्ण खर्च देण्याचे कबूल केले आहे आणि त्या दिशेने त्यांची हालचाल पण सुरू आहे.

धरण बांधायचे म्हणजेही हजार अडथळे. बांधणुकीसाठी तयार पक्क्या विटा आणणे परवडणार नाही म्हणून इथेच विटा घालायच्या असे ठरले. गुत्तेदाराला एरव्हीपेक्षा जास्त पैसे देऊ करून, गेल्या डिसेंबरात इकडला रस्ता सुरू झाला की, विटा घालायला सुरू करण्यास सांगण्यात आले. गुत्तेदाराने ट्रकमधून कामगारांना इकडे आणले आणि दुसऱ्याच दिवशी कामगार इथून परत जाण्यास निघाले. 'आम्हाला फसवले. जंगलात आणून सोडले' असे त्यांचे म्हणणे. शेवटी कशीबशी त्यांची समजूत काढून काम सुरू झाले. एक लाखापेक्षा जास्त विटा तयार झाल्या. पण त्यासाठी लागणारी राखाडी, भट्टी घालण्यासाठी कोळसा, इत्यादी साहित्य बल्लारशा–चंद्रपूरहून आणावे लागते. पेपर मिलसाठी साहित्य नेणारे ट्रक बल्लारशाहून रिकामे येतात. त्यांना थोडे फार पैसे देऊन हे साहित्य आणावे म्हटले तर एकेका ट्रकने प्रत्येकी ९०० रु. मागितले. साहित्य मागवले नाही आणि अकाली पाऊस पडला तर सगळ्या विटांची माती ! म्हणजे इतक्या दिवसांची मेहनत पाण्यात. आणि ते मागवावे तर खर्च न परवडणारा. अशी ही कात्री. प्रत्यक्ष बांधकाम सुरू होण्याला अजून महिना तरी लागेल. तेव्हा बांधकामासाठी, दवाखान्यासाठी व मजुरांसाठी पाणी आणावे लागणार ते तीन किलोमीटरवर असलेल्या बांदिया नदीवरून (यंदा कमी पावसामुळे ही नदी पण आटण्याची चिन्हे दिसत आहेत). इतक्या लांबून पाणी आणायचे म्हणजे टँकर ठेवायला हवा आणि त्यासाठी डिझेल आणायचे ते चंद्रपूरहून. चंद्रपूर–हेमलकसा हे अंतर सुमारे १२० मैल आहे. अशी ही सर्व गुंतागुंत. पण वाटेल ते झाले तरी इथून काढता पाय घ्यायचा नाही हा निर्धार.

आता माडियाबद्दलच बोलायचे झाल्यास, इकडे आलेल्या जंगल खात्याच्या लोकांनी व इतर सभ्य समजल्या जाणाऱ्या लोकांनी यांची इतकी पिळवणूक केली आहे, की त्यांच्याच हितासाठी आपण काही करू म्हटले तरी त्यांचा विश्वास बसत नाही. मकर संक्रातीचे ताजे उदाहरण. त्या दिवशी माडियांचा दसरा असतो. आसपासच्या १०–१५ खेड्यांतली प्रत्येकी दोन–दोन, तीन–तीन माणसे आलेली. येताना गाववाले कोंबड्या, बकऱ्या, डुकरं बरोबर आणतात व इथून दोन मैलावर, जंगलात, डोंगराच्या पायथ्याशी त्यांची देवी आहे, तिथं या सर्वांचा बळी देऊन, शिजवून खातात व भमरागडला परत येऊन भरपूर नाचतात आणि परत जातात. दर तीन वर्षांनी रेडा कापतात. कर्मधर्मसंयोगाने या वर्षी तो कापला जाणार हे कळाल्यावरून आम्ही तिथे गेलो. पण दुपारच्या तीन–चार वाजेपर्यंत लोक तसेच बसून. आम्ही तिथे असल्यामुळे हा कार्यक्रम पुढे ढकलण्याचाच त्यांचा विचार होता. तिथे जमलेल्या लोकांपैकी बरेचसे लोक (पुढारी पण) दवाखान्यात येऊन गेलेत, औषधपाणीही त्यांनी इथून घेतलंय, इथल्या सर्वांना बरेचसे लोक चांगले ओळखतात. पण त्यावेळी त्यांची ही भूमिका. शेवटी आम्ही आमचे कॅमेरे गुंडाळून ठेवले आणि फोटो न घेण्याचे व दूर उभे राहून पाहण्याचे आश्वासन दिल्यावर त्यांनी पुढे पाऊल उचलले. कत्तलखान्यात जनावरांच्या सर्रास कत्तली होत असल्यामुळे अशा प्रकारचा बळी देण्यास सरकारी बंदी आहे की कसे ते नक्की माहीत नाही. पण पोलिसांच्या उपद्रवाला भिऊन कुणालाही कळू न देता ते असा कार्यभाग आटोपतात. हा सर्व प्रकार वाईट असला तरी त्यावेळी थोडाही विरोध आम्ही करतो तर जिवंत घरी परतलो नसतो. त्यांना विश्वासात घेऊन यापासून परावृत्त करण्यात युगे लोटतील.

पोलिसांपासून बचले पाहिजे. सरकारी लोकांपासून सावध राहिले पाहिजे वगैरे गोष्टी साध्या भोळ्या माडियाच्या डोक्यात कशा चटकन बसतात ! दर रविवारी कुठलं तरी एक स्थान निश्चित करून, सर्वांच्या नजरा चुकवून दूर कुठे तरी नदीच्या पात्रात किंवा अशाच एखाद्या ठिकाणी 'कुक्कुट झुंज' चालते. लोक जमतात. काहीजण आपापले कोंबडे आणतात आणि त्यांच्या पायात पाते बांधून लढतीला सोडतात. झपकन् एका कोंबड्याने पाय मारला की पाते आत घुसते आणि कोंबडा पडतो. मग ज्या कोंबड्याने त्याला हरवले त्याचा मालक हा हरलेला व स्वतःचा कोंबडा घेऊन घरी येतो. जिंकलेल्या कोंबड्यासाठी कुणी शंभर रुपये जरी देऊ केले तरी तो त्यास विकीत नाहीत. घरीच खातो. मग अशा प्रत्येक वेळी 'बघ्यांचे' जॅकपॉट लागलेले असतात आणि शहरातली ही घाण इथपर्यंत येऊन पोचल्याचे निदर्शनाला येते.

खायला अन्न नाही, ल्यायला वस्त्र नाही असे हे लोक अशा जुगारात पैसे खर्च करतात म्हणजे आहे की नाही धैर्य... ! खायला फक्त भात आणि अंबील. भात संपला की फक्त अंबिलावर दिवस काढावे लागतात. साळीचा कोंडा अबवून त्यापासून आंबील बनवतात. सीझनमध्ये वालाच्या शेंगांची भाजी तेवढी खातात. बाकी डाळी वगैरे काहीच माहीत नाही. मग प्रथिने शरीरात जाणार तरी कशी ? कोंबडीची अंडी खात नाहीत. गाई–म्हशी घरी असूनसुद्धा त्यांचे दूध मुळीच काढीत नाहीत. त्यामुळे दुधाचा वापर अजीबात नाही. मग मुलाबाळांची वाढ ती कशी व्हावी ? शिवाय कुणी आजारी पडले तरी हा मातेचा प्रकोप आहे. याला डॉक्टर तरी काय औषध देणार ?'. असे म्हणून त्याला घरीच डांबून ठेवणार आणि अगदी शेवटच्या क्षणी दवाखान्यात आणणार. मग हातापाया पडणे इ. सर्व सोपस्कार आलेच. त्यावेळी केस हाताबाहेर गेलेली असते. उपचार करताना रोगी अक्षरशः बोंबलतात आणि दुसऱ्या दिवशी या जंजाळातून वाचण्यासाठी बोऱ्याबिस्तरा गुंडाळून गुपचूप पळून जातात. किंवा काहीजण एकदा परत गेले की भीतीने परत येतच नाहीत. क्षय आणि कुष्ठरोग ही इकडे बऱ्याच प्रमाणात आहे. पण सतत एक–दीड वर्षे औषधपाणी घेणे, नियमितपणे दवाखान्यात येणे वगैरे नियम न पाळल्याने एखाद्या महिन्यानंतर ते येणे बंद करतात. म्हणजे त्यांना दिलेले औषध फुकट गेले आणि उपयोग झाला नाही म्हणून उपचारांवरील त्यांचा विश्वास उडतो तो वेगळा. शिवाय दवाखान्याची बदनामी ही आलीच. पण सुदैवाने दवाखान्याचे नाव शे–दीडशे मैलांपर्यंत पोचल्यामुळे बस्तर, नारायणपूरपासून लोक इथे येतात हा भाग वेगळा. पण बऱ्याच वेळा असा अनुभव येतो मात्र.

सांगून विश्वास बसणार नाही पण अगदी सत्य घडलेल्या घटना

आहेत. प्रकल्पापासून ८ मैल अंतरावरील एका गावी एक बाई प्रसूत झाली पण नाळ मात्र अर्धीच बाहेर पडलेली. सकाळी ९ वा. च्या सुमारास एक माणूस धावत पळत डॉक्टरांना बोलावण्यासाठी प्रकल्पावर आला. पण तिथे आलेल्या रोग्यांना सोडून जाणे शक्य नव्हते. त्यामुळे बाईलाच कसे तरी करून दवाखान्यापर्यंत आणण्यास सांगण्यात आले. पेपर मिलचे ट्रक्स चालू असल्यामुळे दुपारी चार वाजता कशीवशी ती प्रकल्पावर येऊन ठेपली. पण तोपर्यंत बाजेवर दोन्ही तंगड्यात पडलेले मूल, रक्त सगळे जसेच्या तसे. नंतर सर्व काही व्यवस्थित झाले. पण प्रकल्पात जर ही सोय नसती तर आड-मुठेपणाने कुणी तरी हवं तसं खाली-वर करून जीवघेणे प्रयत्न करते आणि बाळ-बाळंतीण खतम !

प्रत्येक गावात एकेक पुजारी आहे. म्हणजे कुणी आजारी वगैरे झाले की तो मंत्रतंत्र, अंगारेधुपारे करतो. त्यातून रोगी बचावला तर नशीब आणि गचकला तर त्याचे कर्म, ही अवस्था. मोफत औषधपाण्याची सोय झालेली असून सुद्धा आजार सुरू झाला, की ताबडतोब दवाखान्यात येणारे रोगी फार कमी. सर्व गावठी उपचार करून थकल्यावर मग ते येतात. तेव्हा रोग हाताबाहेर गेलेला असतो. अशा वेळी मलमपट्टी करताना थोडासा त्रास झाला की न सांगता रोगी पळून जातात. म्हणजे वैद्यकीय व्यवसायावरचा अंधुकसा निर्माण होऊ पाहणारा विश्वास पार मावळून जातो आणि पुन्हा त्याचे पूर्वीचे हाल सुरू. इतर कुठे औषध घेतले असले किंवा हातून चूक घडली असल्यास तसे स्पष्टपणे सांगत नाहीत. जखम झाली की त्यावर माती घासतात आणि दोनचार दिवसांनी डॉक्टर-कडे आणतात. शिकार करण्यावर बंदी असताना सुद्धा शिकारीला जातात आणि जखमा घेऊन दवाखान्यात येतात आणि भलतेच काही तरी कारण सांगतात. त्यामुळे केलेल्या उपचाराचा फायदा होत नाही किंवा विपरीत परिणाम झालेला दिसून येतो. म्हणजे एकीकडे रोग्याचा जीव धोक्यात तर दुसरीकडे डॉक्टर व हा व्यवसाय बदनाम होतात. अशी ही दुधारी सुरी हातात घेऊन येथे मार्गक्रमण करायचे म्हणजे अग्निदिव्य !

रात्री दोन वाजता अर्धचेतनावस्थेत (Semi conscious) एका बाईला घेऊन काही लोक आले (त्यात तिचा नवराही होता). बाई गरोदर होती. तिला नक्की काय झाले ते सांगायला नवरा सुद्धा तयार नाही. तरीही अंदाजाने ताबडतोब तिच्यावर उपचार करण्यात आले. पण नवरा खरे सांगायला अद्यापही धजत नव्हता. बाईच्या तोंडात पाण्याचा थेंब की अन्नाचा कण काहीही जात नव्हते. मग तिला ट्रकमध्ये घालून चंद्रपूरला घेऊन जायला सांगण्या-शिवाय दुसरा मार्ग नव्हता. तशा अवस्थेत प्रकल्पाच्या आवारा बाहेर नेऊन तिच्या नवऱ्याने बळजबरीने भात तिच्या तोंडात कोंबला. अगोदरच तोंड कोरडे पडलेले. कदाचित भाताची शिते श्वासनलिकेत अडकली असावीत. बाईने डोळे पांढरे केले. पुन्हा भूतदया आडवी आली. डॉक्टरनी परत तिला आत आणण्यास सांगितले. सुरुवातीला इंजेक्शनचे दोन रुपये देण्यास देखील तयार नसलेला तिचा नवरा आता हवे तेवढे पैसे खर्च करण्यास तयार होता. दहाची नोट जबरदस्तीने डॉक्टरच्या खिशात तो कोंबू पाही. पण मग थोडेसे दटावल्यानंतर तो थांबला. शेवटी व्हायचे तेच झाले. बाईने डोळे मिटले. मागाहून कळाले, तिचे दिवस भरलेले असूनसुद्धा नवरा तिला म्हणे, 'साली, नुसते बसून खाते. काम करीत नाही. चल काम कर.' आणि सडकेवर मुरुमाच्या पाट्या टाकण्याचे काम तिच्याकडून करवून घेई. अधून मधून बसत उठत, शक्य होते तोवर तिने काम केले. मग ती बेशुद्ध पडली, ती कायमचीच. तिचा असा दर्दनाक मृत्यू झाला. इथेच कहाणी संपली नाही. प्रेताच्या विल्हेवाटीचा प्रश्न आता आला. व्यक्ती दगावली होती खरी. पोलिसात खबर करण्यासाठी गेल्यावर त्यांनी भमरगडच्या पोलीस पाटलाची परवानगी घेण्यास सांगितले. त्याने अंत्यसंस्काराची परवानगी दिल्यावर भमरगडलाच नदीकाठी प्रेत पुरण्यासाठी खड्डा खणला. (माडियात हीच पद्धत आहे.) इतक्यात गावकऱ्यांनी तंगडी अडकवली. 'औरत दवाखाने में मरेली है और वो भी पेटसे है. फिर यहा क्यूं गाडने लाए. दवाखाने में च गाड दो, यहा नही.' आता आली का पंचाईत. खड्डा बुजवून टाकण्यात आला. प्रेत परत दवाखान्यात. नवऱ्याला सांगितले तर तो म्हण–तिचा जीव तर गेलाच आहे. आता मी काय करू ? तुम्हाला काय हवे ते करा. शेवटी सायंकाळी नाइलाजाने प्रकल्पाच्या आवारातच प्रेताची विल्हेवाट लावण्यात आली.

एक ना दोन ! अशा नित्य घडणाऱ्या घटनांना सामोरे जाऊनही हा सासुरवास ( वनवास ) पत्करण्यासाठी पूर्वीपेक्षाही जास्त जिद्दीने उभे राहणे म्हणजे फार मोठे धारिष्टच आहे. मानवते बद्दलची कणव अशी प्रत्यक्षीभूत होतोय या प्रकल्पात. त्याचे यथा-तथ्य रूप अशा लेखांमधून व्यक्त करणे शक्य नसले तरी नव्या उमेदीने व जिद्दीने अस्मानाला ठिगळे लावण्यासाठी निघालेल्या ध्येयधुंद तरुणाईचा भान ठेवून योजना आखण्यात आणि बेभान होऊन त्या राबवण्यात येत आहेत...त्याचे हे पुसटते दर्शन हा प्रत्यक्ष नमूना !

☐ ☐




# सोलकढी

## □ 'जपानसारखी' प्रगती !

जपान हा जगातला एक अद्‌भुत देश आहे. दुसऱ्या महायुद्धात जपान हरला. त्याची मानखंडना झाली. सगळे विस्कटून गेले. परंतु प्रखर राष्ट्रनिष्ठा, अविश्रांत परिश्रम, आणि प्रगल्भ विज्ञानोपासना यांच्या जोरावर, राखेतून पुनर्जन्म घेणाऱ्या फिनिक्स पक्ष्याप्रमाणे, अवघ्या वीसपंचवीस वर्षांत सूर्योपासक जपान पुन्हा दिमाखात उभा राहिला आहे. जपानचे आम्हाला कौतुक आहे. जपानसारखी प्रगती करा, असे आपणच आपल्याला मधूनमधून सांगत असतो.

'जपानसारखी' असे प्रगतीचे वर्णन आणि शिफारस ऐकली की मला गेल्याच वर्षी जपानमध्ये घडलेले मिनामाटा प्रकरण आठवते. मिनामाटा हे दक्षिण जपानमधले एक शहर. तेथल्या एका कारखान्याच्या उत्सर्जितातल्या पाण्यामुळे झालेल्या प्रदूषणाने मांजरे, कुत्रे, कावळे, माणसे विषबाधित झाली. विषबाधा झालेल्या ३९७ माणसांपैकी ६८ माणसे दगावली. त्या कारखान्यावर खटला भरण्यात आला. नुकसानभरपाई-दाखल कारखान्याला दोन कोटी तीस लाख रुपये भुर्दंड पडला.

तशी 'जपानसारखी' थोडी प्रगती आपणही केली आहे. मुंबईच्या समुद्रात मिळणाऱ्या तीस प्रकारच्या माशांच्या ('मासा' या शब्दाचे बहुवचन. 'समुद्रात' असे आधी म्हटल्यामुळे 'माशा' हे 'माशी'चे बहुवचन नाही हे वाचकांनी सहज जाणले असते, असे एखाद्याला वाटेल. पण ते खरे नव्हे. भरवशाचे वाचकदेखील दगा देऊ शकतात.) अठ्ठावन्न नमुन्यांची चिकित्सा नुकतीच करण्यात आली. त्यात असे आढळले की हे मासे पाण्याने प्रदूषित झालेले असून खाणाऱ्याला निश्चित अपायकारक झाले असते.

हे कळल्यापासून माझ्यासारख्या निढावलेल्या मासेखाव माणसाची जीभ जरा जड झाली आहे. मासे मला अतोनात आवडतात. मासे खाण्यासाठी कुठल्याही पाण्यात उतरायची माझी तयारी असते. माझ्या बाबतीत मासे अशी गंमत करतात की ते क्षुधाशांतीबरोबरच दुर्मिळ मनःशांती मला मिळवून देतात. आजकाल मुंबईतसुद्धा ताजे मासे मिळणे अवघड झाले आहे. अशा वेळी खाणाऱ्यापुढे दोन पर्याय असतात. भोजनपात्रातल्या मत्स्यविशेषाचे सेवन करताना कधीतरीकुठेकुठे खाल्लेल्या त्याच्या ताज्या अप्रतिम वस्तूचे कृतज्ञतापूर्वक स्मरण करायचे, हा पहिला पर्याय; आणि, समोरच्या शीतगृह(ह्य)संस्कारित खाद्यालाच ताजे मानून गट्ट करणे, हा दुसरा पर्याय. आता या प्रदूषणाच्या प्रगत भानगडीमुळे दुसरा पर्याय बाद व्हायचा धोका उत्पन्न झाला आहे. अरेरे.

जपानसारखे देश प्रगतीची भरमसाठ किंमत मोजत असताना आपण मागासलेपणाचे केवढेतरी लाभ उठवत होतो. परंतु यापुढे आपल्याला मागास राहू द्यायचे नाही, आणि चांगले मासे खाऊ द्यायचे नाहीत, असा निर्धारच त्या प्रगतिपरायण महांकाळेश्वराने केला असेल तर आपण काय करायचे ? □

## □ एक मिजासखोर म्हातारा

विठ्ठलराव घाटयांना परवाच इचलकरंजीच्या साहित्यसंमेलनात पाहिले. कविसंमेलनात नेहमीसारखी आपली हाजिरी त्यांनी लावली. त्यांच्या आधी प्रा. रा. श्री. जोगांनी आपल्या 'निशागीत' या १९२८ साली प्रसिद्ध झालेल्या कवितासंग्रहातली एक प्रेमकविता म्हटली होती. संमेलनाध्यक्ष पु. ल. देशपांडे यांनी विठ्ठलराव घाटयांना 'आलात ते कशाला, प्रिय जाहला कशाला ?' ही त्यांची ऐनखास कविता म्हणायची फर्माईश केली. घाटे मनोमन सुखावले. सावरून बसले. घसा शक्य तेवढा साफ करून, कापरा आवाज जुळवून, बावन्न वर्षांपूर्वी लिहिलेले ते फंदी प्रेमकवन तालावर गाऊ लागले. तालाचा आघात करायला शेजारीच बसलेल्या पु. ल. देशपांडयांची अध्यक्षीय मांडी त्यांना बरी मिळाली. घाटे रंगात आले. तालाचा आघात देशपांडयांच्या मांडीवर विशेष जोराने करून, घाटयांनी म्हातारपणाच्या मिजासीत 'लागलं का ?' असे विचारले. त्यावर पु. ल. देशपांडे तत्पर-तात्काळतेने हात काळजापाशी नेत म्हणाले, 'लागलं. पण मांडीवर नाही. इथं लागलं.' तालाचा पुढचा आघात अध्यक्षीय मांडीवर झाला नाही, हा किरकोळ तपशील पुरवून किस्सा संपवतो.

वर उल्लेखलेली विठ्ठलराव घाटयांची मिजासखोरी मला फार प्रिय आहे. मी विठ्ठलरावांना जवळून ओळखत नाही. तसा एकदोन वेळा भेटलो आहे. पण या भेटीत त्यांच्या, 'अंडी खाता की नाही ?', 'रोज दूध किती पिता ?' या प्रश्नांना शिताफीची उत्तरे देण्यापलीकडे माझ्याकडून विशेष काही घडले नाही. पण त्यांची पुस्तके मी मोठ्या चवीने वाचली आहेत; आणि पुस्तकातून ज्यांचा पुष्कळच परिचय सहज व्हावा असा हा एक बऱ्यापैकी माणूस आहे. 'दिवस असे




UH744

होते ' हे तर त्यांचे आत्मचरित्रच आहे. त्याचे सोडा. पण 'काही म्हातारे आणि एक म्हातारी', 'पांढरे केस, हिरवी मने', 'मनोगते' या पुस्तकातून विठ्ठलराव घाटे नावाच्या एका मिजासखोर म्हाताऱ्याशी तुमची मैत्री होते.

माझ्यासमोर म्हाताऱ्या विठ्ठलराव घाटयांचे चित्रच अधिक उठावदार आहे. तरुण विठ्ठलरावांना मी जुळवू शकत नाही. पण म्हातारे असले तरी विठ्ठलराव 'म्हातारबुवा' नाहीत. आणखी काय हवे? तसे बहुतेक म्हाताऱ्यांप्रमाणे तेसुद्धा हरपलेल्या त्या पूर्वीच्या, एकवीस–बोटी माणसांच्या, अधिक तळपत्या चंद्रसूर्यताऱ्यांच्या, चोवीस तासांहून मोठ्या दिवसांच्या, जमान्याबद्दल बोलतात. पण मला त्याचा कंटाळा येत नाही. कारण मला अद्भुतरम्यतेची ओढ आहे आणि विठ्ठलरावांच्या लेखनात ती कशी घमघमत असते.

विठ्ठलराव घाटयांनी तसे कमीच लिहिले आहे. समजूतदार माणसे त्यांनी मोजकेच लिहिले आहे, अशी मखलाशी करतील. घाटे लिहिता लिहिता म्हातारे झाले नाहीत; म्हातारे होता होता त्यांनी लिहिले. त्यांनी कमी अथवा मोजके कसेही लिहिले असेल; जे लिहिले ते बरे–ठसठशीत लिहिले; खास आपल्या घाटीव शैलीत लिहिले. आम्ही खुश आहो.

नुकतीच घाटयांनी ऐंशी वर्षे पुरी केली. हा किरकोळ तपशील निमित्ताला पुरवला. एरवी विठ्ठलराव घाटे गेली अनेक वर्षे म्हातारे असले तरी म्हातारपणात मात्र त्यांचे वय वाढल्याचे आम्हाला ठाऊक नाही. १४ वर्षांपूर्वी लिहिलेल्या 'दिवस असे होते' या आत्मचरित्राच्या 'दिवस चालले आहेत' या अखेरच्या प्रकरणाच्या शेवटी 'आम्ही जातो, तुम्ही रंग करा आपुला' असा शाहीर प्रभाकराच्या शब्दात घाटयांनी नवागतांचा आणि अनागतांचा निरोप घेतला होता. १४ वर्षांपूर्वीच.

आणखी पुष्कळ वर्षे विठ्ठलराव घाटयांना संगे घेऊनच आपला रंगोत्सव साजरा होईल.

–अनंतराव

# नेतृत्व बदल

## दोन राज्ये, दोन धोरणे

वा. दा. रानडे

बिहारच्या नेतृत्वात बदल होऊन मुख्यमंत्री गफूर यांच्या जागी नवा नेता निवडल्याची बातमी लोक अपेक्षित असता महाराष्ट्राच्या नेतृत्वात बदलाची बातमी आल्याने त्यांना अचानक धक्का बसला. बिहार विधानसभेचे अंदाजपत्रकी अधिवेशन पार पडेपर्यंत गफूरना हलवावयाचे नाही असे काँग्रेसच्या मध्यवर्ती पार्लमेंटरी बोर्डाने ठरविले. मग नाईकांच्याही बाबतीत तसेच का केले नाही? त्यांचे नेतृत्व बदलण्याची एवढी घाई का? एवढ्या तातडीने हा बदल घडवून आणण्यासारखे काय घडले होते? नाईकांच्या नेतृत्वाचे मला येथे समर्थन करावयाचे नाही, पण महाराष्ट्र आणि बिहार यांचा तुलनात्मक विचार करावयाचा तर नेतृत्व तातडीने बदलण्याची गरज होती बिहारमध्ये. केवळ विरोधी पक्षांनाच नव्हे तर सत्तारूढ काँग्रेस पक्षाच्या बहुसंख्य आमदारांना गफूर नेतेपदी नको आहेत हे आता स्पष्ट झाले आहे. जगन्नाथ मिश्र आणि केदार पांडे यांच्या गटांच्या आमदारांची बैठक भरून नवा नेता निवडण्यासाठी पक्षाची बैठक तातडीने बोलावण्याची मागणी करण्यात आली होती. 'गफूरना आम्ही नेते मानीत नाही आणि विधानसभा बैठक सुरू होण्यापूर्वी या प्रश्नाचा निकाल लागणार नसेल तर आम्ही विधानसभेवर बहिष्कार टाकू', अशा धमक्या या बैठकीत देण्यात आल्या होत्या. काँग्रेसचे अध्यक्ष बारुआंनी या बंडखोर गटाला सबुरीचा सल्ला दिला व त्यांनी तो सध्या तरी मानला आहे.

बिहारमध्ये काँग्रेस नेत्यांपुढे दोन अडचणी आहेत. एक तर गफूरना बदलावयाचे म्हणजे जयप्रकाशांच्या आंदोलनाचा तो विजय समजला जाईल. या निर्णयाने जयप्रकाशांच्या आंदोलनाचे बळ वाढणार असेल तर हा निर्णय कशाला घ्यावयाचा असा विचार करून वरिष्ठ काँग्रेस नेत्यांनी तो आजपर्यंत लांबणीवर टाकला. पण विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे बहुसंख्य सभासदच गफूरविरुद्ध उलटल्यानंतर त्यांना हा निर्णय आता फार काळ लांबणीवर टाकता येईल असे वाटत नाही. दुसरी अडचण म्हणजे नवा नेता कोण निवडावयाचा? जगन्नाथ मिश्र आणि केदार पांडे हे एकेक गटाचे नेते आहेत. ललित नारायण मिश्रांच्या निधनाने त्यांचा गट संपुष्टात आलेला नाही. जगन्नाथ मिश्रांचा आपल्या बंधूएवढा प्रभाव नसेल पण मुख्यमंत्रिपद मिळविण्याची धडपड आहे. गफूरना हलविण्यासाठी केदार पांडे गट सध्या जगन्नाथ मिश्रांना पाठिंबा देईल, पण हा पाठिंबा कितपत टिकाऊ राहील याची शंका आहे. नवा नेता बिनविरोध निवडल्याचा देखावा करावयाचा पण त्याची निवड झाल्या दिवसापासून त्याच्याविरुद्ध हालचाली सुरू करावयाच्या, अशी बिहारमधील गटबाजीच्या राजकारणाची आतापर्यंतची परंपरा आहे. लोकसभेच्या निवडणुका मेमध्ये घेण्याचे घाटत होते व त्याचवेळी बिहार विधानसभेच्या निवडणुका घेतल्या गेल्या असत्या. पण जबलपूरच्या पराभवाने काँग्रेस नेत्यांना एवढा हादरा बसला आहे की सध्या निवडणुका घेणे फायद्याचे होणार नाही असे फेरविचारानंतर त्यांना वाटू लागले आहे असे दिसते.

महाराष्ट्राच्या नेतृत्वात बदल करून वसंतराव नाईक यांच्या जागी शंकरराव चव्हाण यांना आणावे हा निर्णय याच वेळी घेण्यात पुढाकार कोणाचा? ज्येष्ठ नेते याबाबतीत उघडपणे बोलणार नाहीत पण घटनांचा एकूण क्रम पाहता पंतप्रधान श्रीमती गांधींनाच हा बदल हवा होता असे दिसते.

नाईकांच्या जागी शंकरराव चव्हाणांना आणण्याचा विचार श्रीमती गांधी १९७२ च्या निवडणुकीपूर्वीपासून करीत होत्या. प्रत्येक राज्यात आपल्या कलाने चालणारा मुख्यमंत्री हवा असा पद्धतशीर प्रयत्न १९७२ च्या निवडणुकीपासून त्यांनी केला. मध्यप्रदेशातील मुख्यमंत्री त्यांनी निवडणुकीच्या आधीच काही महिने बदलून प्रकाशचंद्र शेठींना तेथे मुख्यमंत्री नेमले. निवडणुकीनंतर गुजरात, बिहार, ओरिसात आपल्या पसंतीचे मुख्यमंत्री त्यांनी अधिकारावर आणले. पण महाराष्ट्रात त्यावेळी त्यांना ते जमले नाही. यशवंतराव चव्हाणांचे महाराष्ट्र काँग्रेसवरील प्रभुत्व त्यांना मान्य करावे लागले. यशवंतरावांना १९७२ नंतरही नाईकच मुख्यमंत्रीपदी राहायला हवे होते. मराठवाड्याच्या दौऱ्यातील एका भाषणात नाईकांच्या नेतृत्वाचा गौरव करून तेच १९७२ नंतरही नेते राहतील असे त्यांनी बोलूनही दाखविले होते. यशवंतरावांना नाईकच हवे होते याचे एक कारण नाईकांच्या जागी दुसऱ्या कोणाला नेता करावयाचे याबाबत महाराष्ट्र काँग्रेसच्या नेत्यात एकमत होत नव्हते. मुख्यमंत्रिपदासाठी वसंतराव दादा पाटील आणि शंकरराव चव्हाण प्रयत्न करीत होते.

कन्नमवारांच्या निधनानंतर डिसेंबर १९६३ मध्ये नेता–निवडीचा प्रश्न उपस्थित झाला, त्यावेळी मुख्यमंत्रिपद पश्चिम महाराष्ट्राला हवे असा आग्रह त्या भागातील काही काँग्रेस नेत्यांनी धरला होता. पण कन्नमवार फारच थोडा काळ मुख्यमंत्री होते. तेव्हा मुख्यमंत्रिपद आणखी काही वर्षे विदर्भाकडेच हवे हे चव्हाणांचे म्हणणे त्यांना मान्य करावे लागले. कन्नमवारांच्या नंतर नाईक मुख्यमंत्री झाले. गेली अकरा वर्षे ते मुख्यमंत्रिपदावर होते. वास्तविक १९७२ च्या निवडणुकीनंतर नाईक यांनी आपण होऊन मुख्यमंत्रिपद सोडायला हवे होते व आता मराठवाड्याकडे हे पद जाऊ द्या, अशी सूचना स्वतःच करायला हवी होती. त्यांनी तसे केले असते तर आज ज्या परिस्थितीत त्यांना नेतेपद सोडावे लागले तशी वेळ आली नसती.

इंदिरा गांधींनाच नेतृत्वात बदल हवा आहे हे समजताच आतापर्यंत नाईकांची सहकारी म्हणून काम करणारी मंडळी एका रात्रीत बदलली आणि शंकरराव चव्हाणांच्या गोटात जाऊन मिळाली. नाईकांना घालवायचे असेल तर आपण आपसातली भांडणे विसरून एकजुटीने मागणी केली पाहिजे, हे या मंडळींनी ओळखले. शंकरराव चव्हाण, वसंतदादा पाटील, मुंबई प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष रजनी पटेल, मंत्रिपद गेल्यापासून असंतुष्ट असलेले महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष पी. के. सावंत हे सारे एकत्र आले. या बनावास विरोध करणे आता आपणास शक्य नाही व आपले कोणी मानणार नाही हे ओळखून यशवंतराव चव्हाणांनीही या बदलास अनुकूलता दर्शविली.

नागपूर करारात दिलेल्या आश्वासनानुसार मराठवाड्याकडे मुख्यमंत्रिपद देण्यात येत आहे, असे या बदलाचे समर्थन करण्यात येत आहे. पण नागपूर कराराचा या नेत्यांना इतकी वर्षे सोईस्कर विसर कसा पडला? मुख्यमंत्री निवडताना प्रादेशिकतेचा विचार मनात न आणता केवळ पात्रता हीच एक कसोटी लावली पाहिजे, असाही युक्तिवाद यापूर्वी मराठवाड्यास मुख्यमंत्रिपद नाकारताना करण्यात आला. तत्त्व चांगले आहे. पण आपणास सोयीचे असेल त्याप्रमाणे कधी हे तत्त्व पुढे करावयाचे तर कधी प्रादेशिक प्रतिनिधित्वाचे तत्त्व पुढे करावयाचे हे योग्य नाही. त्यामागे 'सोयवादा'शिवाय दुसरी कोणतीही तर्कसंगत भूमिका नाही.

शंकरराव चव्हाणांना पाठिंबा देण्यासाठी पुढे आलेले गट त्यांच्यामागे कितपत एकजुटीने उभे राहतात यावर त्यांच्या नेतृत्वाचे स्थैर्य अवलंबून आहे. नव्या मुख्यमंत्र्यांना पुरेसे सहकार्य द्यावयाचे नाही व त्यांचा कारभार अकार्यक्षम ठरवून त्यांच्या जागी नवा नेता आणण्याच्या हालचाली चालू ठेवावयाच्या असे प्रयत्न होण्याची शक्यताही दूर सारता येणार नाही. वसंतरावांच्या जागी शंकरराव आल्याने मराठवाड्यास मिळणारा दिलासा सोडला तर परिस्थितीत मोठा फरक पडणार आहे असे नाही. कारण राज्ययंत्रणा आणि पक्षयंत्रणेत दीर्घकाल भिनलेले दोष केवळ मुख्यमंत्री बदलल्याने दूर होणार नाहीत. त्याला सर्वांगीण क्रांतीच हवी. ती करण्याची तर सत्तारूढ पक्षाची तयारी नाही. □

बॉबे डाइंग
एकमेव वितरक
पराग
डेक्कन जिमखाना पुणे-४ लक्ष्मीरोड पुणे-३०
मिलच्या दरांत
खरेदी करा !
मिलच्या
दुकानांत
खरेदी करा !!
सुपर ऑफर



" साहेब, या अक्करमाशा क्रांतिकारकांनी जणू इथं स्वतःचं राज्य स्थापलंय. मी झाडून सारे तुम्हाला दाखवीन. अहो, त्यांच्यात काही बायाही आहेत. एकेकाला गोळी घालून ठार करा साहेब. "

फितुरीतील लाचारी हे बोलत होती. क्रूरकर्मा फितुर झॅम आपल्याच देशबांधवांना स्वातंत्र्याच्या त्यांच्या झगड्यात त्यांच्यासाठी मृत्यू घेऊन उभा होता. त्याचाच सहकारी बा फी वरील विचार बरळत होता.

गॅन, बा रेन टाम चान, हाई थेप आणि व्हिएतनामच्या स्वातंत्र्याच्या विचारानं झप टलेल्या असंख्य स्त्रीपुरुषांना शत्रूबरोबरची झुंज ही नित्याची बाब झाली होती. क्रांतिकारकांनी उठाव करण्यापूर्वी फक्त व्हिएतनामी नागरिकांचेच जीव जात होते. आता मृत्यूच तांडव उभयपक्षी होत होतं.

एक हजार शत्रुसैन्याबरोबर उद्या लढाईला तोंड लागणार होतं. हॉन डॅट बाहेरील क्रांतिकारकांचे गुहेत जय्यत तयारी झाली होती. शत्रू हॉन डॅटपर्यंत येऊन पोहोचला होता.

# हॉन डॅट

## भाग : पाच

मूळ व्हिएतनामी लेखक : **ॲन्ह डक**

इंग्रजी भाषांतर : **रॉबर्ट सी. फ्रेंड**

मराठी भाषांतर : **लक्ष्मण लोंढे**

गॅननं रायफल उचलली आणि आपल्या खड्ड्याकडे धाव ठोकली. थाम आणि ट्रांगही त्याच्या पाठोपाठ आलेच.

खड्ड्यातून बाहेर नजर फिरवीत फिरवीत गॅन भात खात होता. 'अगदी अंगावर आले नाहीत तोपर्यंत आपापली 'खाणी' उरकून घ्या.' तो म्हणाला.

खाणं चालू असतानाच सूर्याचे पहिले किरण पसरले होते. हॉन सॉकच्या दिशेनं शत्रूचं पायदळ उजाड शेतातून पुढे सरकताना दिसू लागलं.

ते बरेच होते आणि झुंडीनं येत होते. नुकतंच उजाडत होतं. प्रकाश हळूहळू पसरत होता पण त्यांच्या पायांनी उडणाऱ्या धुरळ्यानं पुन्हा सगळं अस्पष्ट होत होतं. डोळ्यावर आडवा हात धरीत गॅननं अंदाज घेतला—'साले बरेच आहेत. ठीक आहे. या म्हणावं?' तो म्हणाला. आपली नजर त्यांच्यावर रोखून ठेवीत तो पुढे म्हणाला, 'भडव्यांना बरीच मस्ती चढलेली दिसतेय.' मग थामकडे वळत तो म्हणाला,—'थाम. हा आदेश सर्वांपर्यंत जाऊ दे. म्हणावं, सर्वांनी शांत रहा. आपण खिळे, काचा पसरलेल्या आहेत. दलदलीच्या शेतापर्यंत त्यांना पुढे येऊ दे. तोपर्यंत कसलीही हालचाल करू नका. ते तिथे आले की चलाओ गोळी.'

बा रेन धावत धावत गॅनच्या खड्ड्यापाशी आला आणि खाली वाकून काळजीच्या स्वरात म्हणाल,—'गॅन, आपले सापळे नीट लपवलेले आहेत ना?'

'त्याची चिंताच करू नको. ते काम बरोबर झालंय. फक्त तुझ्या माणसांना सांग की स्पष्ट आदेश मिळाल्याशिवाय कुणीही आपल्या खड्ड्याबाहेर पडायचं नाही.'

'मान्य आहे. पण हे बघ. माघार घ्यायची पाळी आलीच तर तुम्ही प्रथम पुढे व्हा'

'छे छे, तू प्रथम पुढे हो. तुला रस्ता चांगला माहीत आहे. माघारीचा आदेशही तूच दे. आम्ही तुझ्या पाठोपाठ येऊ. दुसरे म्हणजे पहिली गोळी उडवायचा मान तू आम्हाला दे.' गॅननं म्हटलं.

'एक गोष्ट सोडून तुझं सगळं म्हणणं मला मान्य आहे. माघार घेताना तुझ्या माणसांनाच प्रथम बाहेर पडावं लागेल. तुम्हाला रस्ता माहीत नसेल तर मी वाटाड्या बरोबर देईन. पण पिछाडी मात्र मीच सांभाळणार.' बा रेननं निक्षून सांगितलं.

पिछाडी मी सांभाळणार हे शब्द बा रेननं अभिमानानं आणि आत्मविश्वासानं उच्चारले होते. जणू काय हजारो माणसं पाठलागावर असली तरी तो त्यांना तोंड देऊ शकत होता!

लांब लांब टांगा टाकीत तो आपल्या खड्ड्याकडे पळत होता. त्यानं आपलं जाकीट काढून कमरेला गुंडाळलं होतं. त्याची रुंद पाठ उघडीच होती. त्याच्या धावणाऱ्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहता पाहता गॅनचं मन कौतुकानं भरून आलं. बा रेनच्या उत्साहाला आज उधाण आलं होतं. तो लोहार होता. पण आपलं नेहमीचं लोहारकाम करताना तो इतका उत्साही कधीच दिसला नव्हता.

जेव्हा त्यांना भूमिगत होऊन जंगलात लपूनछपून रहावं लागत होतं ते दिवस गॅनला आठवले. त्या काळात बा रेन अनेक वेळा रागावत असे. पोलीस किंवा वनरक्षक पाहिले की त्याचं रक्त खवळून उठत असे. त्यांच्यावर गोळीबार करण्याची तो रोज परवानगी मागत असे. सनदशीर चळवळीचं महत्त्व त्याला कोणी पटवून देऊ लागलं की तो चिडत असे. 'सनदशीर चळवळ गेली खड्ड्यात. एका जीवाला एक जीव घ्यायचा हा कायदा मला समजतो' तो म्हणत असे.

एके दिवशी आपली रायफल हाई थेपच्या सुपूर्त करून तो म्हणाला होता, 'कॉम्रेड, खूप विचार करून मी रायफल पार्टीला परत देऊन टाकायचं ठरवलंय.'

हाई थेपनं आश्चर्यानं डोळे विस्फारून त्याच्याकडे पाहिलं होतं. पण बा रेन त्याला पुढे म्हणाला होता— 'हसू नकोस. मी गंभीरपणे बोलतोय. ज्या रायफलचा उपयोग करायची परवानगी नाही ती ठेवून तरी काय कामाची? रायफल पार्टीनं दिलीय ती तू परत घे. म्हणजे माझी एखाद्या पोलिसाशी गाठ पडलीच तर माझ्या मनगटाच्या जोरावर त्याच्याशी दोन हात करायला तरी मी मोकळा होईन. त्यात माझं मरण ओढवलं तरी मग मी तुमच्याविरुद्ध तक्रार करणार नाही.'

त्यानं त्याचं शेवटचं वाक्य मुद्दामच जोरानं उच्चारलं होतं. पण हाई थेपवर नेता म्हणून काही जबाबदारी होती. पार्टीचे आदेश होते.

'ठीक आहे. तो म्हणाला— 'म्हणजे तुला पार्टीचे आदेश मान्य नाहीत तर. तुला पार्टीशी फटकून वागायचंय्. पार्टीपासून फारकत घ्यायच्येय्!'

हे शब्द बा रेनच्या मनाला झोंबले होते. आणि हे अपेक्षितच होतं. तो रांगडा होता पण इतर कोणत्याही आरोपापेक्षा लोकांची एकी फोडल्याचा आरोप त्याला भयंकर वाटत होता हे उघड होतं. हाई थेप उठत म्हणाला होता—'ठीक आहे. मी कॉम्रेड टाम चानला सगळं कळवीन.'

'थांब थांब. माझ्या म्हणण्याचा तसा अर्थ नव्हता.' बा रेन म्हणाला, 'मूर्खासारखं काहीतरी टाम चानला कळवायचं बोलू नकोस. मी तुला रायफल परत देत होतो. तू ती परत घ्यायला तयार नाहीस. बस. इथेच सगळं संपलं. टाम चानला वगैरे कळविण्याइतकं काही झालंच नाही.'

बा रेन ला तिथं, तसाच सोडून हाई थेप गॅनकडे आला होता. आणि त्यानं सगळी हकीकत गॅनला सांगितली होती. पुन्हा तसा प्रसंग घडला नव्हता. काय घडलं ते टाम चानपर्यंत कुणी नेलं नव्हतं. बा रेननं पुन्हा रायफल आपल्या ताब्यात घेतली होती.

पुढच्या दोनच महिन्यांत बंडाचा आदेश आला होता आणि बा रेनला आपली रायफल वापरण्याची संधी मिळाली होती. त्या बंडानंतरच हॉन डॅट स्वतंत्र झालं होतं

आज, माघारीच्या गोष्टी करताना बा रेनला पिछाडी सांभाळण्याची इच्छा होती. पिछाडीवर असलेल्यांना कोणत्या परिस्थितीला तोंड द्यावं लागेल याची गॅनला चांगलीच कल्पना होती. पिछाडी सांभाळण्याचं काम सोपं नव्हतं आणि बा रेनसारखे ते काम हसत हसत आपण होऊन मागून घेणारे फारच थोडे होते.

हल्लेखोरांच्या आकृत्या आता अधिकाधिक स्पष्ट होऊ लागल्या होत्या. सर्वांत पुढे वनरक्षकांची तुकडी होती. गणवेश झाडापाल्यानं लपवलेले होते; हातात रायफली होत्या. गॅन आता फायरिंग करायला उतावळा झाला होता. पण त्याबरोबरच त्याच्या मनावर



गॅनच्या बंदूकीच्या टप्प्यात ते दोघं तिघं आले
आणि त्याने चाप ओढला.

दडपणही आलं होतं. यापूर्वी त्याला अनेक वेळा तोंड द्यावं लागलं होतं. भीतीनं नव्हे पण अधीरतेने आताही त्याची छाती धडधडत होती. एकदा हात पाठीशी बांधलेल्या अवस्थेत त्यानं केवळ लाथेनं पहारेकऱ्याला ढकलून स्वतःची सुटका करून घेतली होती. आज तर त्याच्या हातात रायफल होती आणि आजूबाजूला त्याचे कॉम्रेडस् होते.

शिवाय शेतातून लावलेल्या सापळ्यांवर त्याचा पूर्ण विश्वास होता. शत्रू नेमका सरळ त्या शेताकडेच येत होता. अर्थात ती शेतं इतर शेताहून वरवर पहाता मुळीच निराळी दिसत नव्हती. आपल्यापुढं कसलं ताट वाढून ठेवलंय याची कल्पना नसल्यामुळे ते त्या शेताकडे वेगाने धावत येत होते. ते त्या शेतापाशी आले आणि—

गॅननं श्वास रोखून धरला. सेफ्टी कॅप काढली. मध्यभागी चालत असलेल्या एका जाडगेल्या सैनिकावर नेम धरून गॅननं रायफलचा चाप दाबला.

पहिल्या गोळीनं आसमंतातील शांततेला चीर गेली आणि पाठोपाठ त्याच्या सहकाऱ्यांनी गोळ्यांची बरसात केली.

तो जाडगेलासा दिसेनासा झाला होता. इतर भराभर बाजूला पांगत होते. त्यातले कित्येकजण शेतातून खणलेल्या खोल खंदकात दलदलीत खाली कोसळत होते. जमिनीवर त्यांचे फक्त हात आणि शस्त्रं हेलकावताना दिसत होती.

'सापडले साले बरोबर सापळ्यात.'

'तो बघ दुसरा दिसेनासा झाला.'

'तो तिसरा अदृश्य झाला बघ.'

हल्लेखोरात जितकी घबराट वाढत होती तेवढे जास्त जास्त जण खड्ड्यात, दलदलीत कोसळत होते. त्यांना माघार घेता येत नव्हती की पुढे सरकता येत नव्हतं. शेवटी ते जमिनीवर आडवे झाले. त्यांच्यापैकी जे मागे होते त्यांना पुढल्या संकटाची कल्पना आली. त्यांनी आपला पवित्रा बदलला. त्यांचा धीरही एव्हाना बराचसा चेपला होता. त्यानी आमराईच्या दिशेनं गोळ्यांचा पाऊस पाडायला सुरुवात केली. झाडावरून फळं टपाटप खाली पडू लागली. एका झाडाची एक फांदी गॅनच्या खांद्यावर कोसळली. फांदी बाजूला सारीत आपलं डोकं खड्ड्याच्या बाहेर काढीत गॅन ओरडला—'गोळीबार बंद. परत ते उभे राहून चालायला लागतील तेव्हाच गोळीबार सुरू करा.'

थोडावेळ सर्वत्र शांतता पसरली. हल्लेखोर पुन्हा उठून पुढे सरकू लागले होते. पाठीमागच्यांकडे पाहून त्यांचा आरडाओरडा सुरू होता. आता ते प्रत्येक पाऊल काळजीपूर्वक टाकीत होते. इतक्यात गॅनला बा रेनच्या दोस्तांनी उडविलेल्या लेबेलसचा धडधडाट ऐकू आला. शत्रूमध्ये पुन्हा मोठी घबराट उडाली. आणखी बरेचसे सापळ्यात अडकले. इतर पुन्हा आडवे झाले. मध्यंतरी काही अरण्यरक्षक बरेच पुढे सरकले होते. गोळीबार चालू असला तरी वाकून चालत चालत, पोटावर सरकत सरकत त्यांनी आपली आगेकूच चालूच ठेवली होती. आणि त्यांच्यातले काही ती सापळे लावलेली शेतं ओलांडून पुढे आले होते. ते इतके पुढे येतील अशी कोणाचीच अपेक्षा नव्हती.

आता पवित्रा बदलणं आवश्यक होतं. नाहीतर ते थोड्याच वेळाच क्रांतिकारकांना येऊन भिडले असते. गॅनने खड्ड्याच्या बाहेर उडी मारली आणि शत्रूच्या गोळ्यांच्या माऱ्यात तो जमिनीवर आडवा झाला. त्याच्या बंदुकीच्या टप्प्यात दोघं तिघं आलेले दिसताच त्यानं चाप ओढला. दोघं एका पाठीमागे एक असे होते. त्यातला पाठीमागचा लगेचच कोसळला. पुढच्याचं शरीर एकदम ताठरलं. त्याच्या हातून त्याची स्वयंचलित बंदूक गळून पडली आणि क्षणार्धात तोही लोळागोळा होऊन खाली पडला.

सापळ्यांच्या जागा कळून चुकल्यामुळे आता शत्रूची जोरदार आगेकूच सुरू झाली. त्यांनी आता एक तोफही पुढे आणली होती आणि आमराईवर तोफेचा मारा सुरू केला होता. झाडं मुळापासून उन्मळून पडत होती आणि धुराचे, धुळीचे लोट उठत होते.

गॅननं परत एकदा गोळीबार केला आणि तो ओरडला, 'पहिल्या तुकडीनं पळ काढा.' बाजूच्या एकाला तो म्हणाला, 'चल, आम्हाला रस्ता दाखव.'

गॅनचा ग्रुप त्या वाटाड्याबरोबर वाटचाल करू लागला. बा रेन त्याच्याकडे बघून ओरडला, 'आमराईच्या त्या बाजूला आमची वाट पहा.'

'तुम्ही पण निघताय् ना?'

'तुम्ही व्हा पुढे—आम्ही आलोच.'

पण बा रेन घाईत असल्यासारखा दिसत नव्हता. गॅननं मागं वळून पाहिलं. बा रेन आणि त्याचे सहकारी त्यांच्या प्रेइंग मॅंटिस तोफा घेऊन झाडीच्या बाहेर पडत होते. गॅनला त्यांची काळजी वाटू लागली. साध्यासुध्या 'तोफां'च्या साहाय्यानं लढायची त्यांची चाललेली धडपड पाहून गॅनला त्यांच्या धाडसाचं कौतुकही वाटत होतं आणि त्याचं हृदय भरून येत होतं.

परतीच्या मार्गावर मध्यंतरी त्यांना एक छोटा नाला लागला. ते तिथे थांबतात न थांबतात तोच तिन्ही बाजूंनी हल्ला आला. ते प्रत्युत्तर देत देत पळू लागले. इतक्यात थामच्या पायाला तोफेच्या गोळ्याचा एक तुकडा लागून त्याचा पाय जायबंदी झाला. आता

त्याला उचलून घेणं जरूर होतं. शत्रूचे सैनिक भारी संख्येनं आरडा-ओरडा करीत पाठलाग करीत होते. बा रेनच्या ग्रुपचं काय झालं हेही कळायला मार्ग नव्हता. गॅननं टोईला थामला उचलून घ्यायला सांगितलं. त्यानं त्यांना थोडं पुढे जाऊ दिलं व मागोमाग त्यांची पाठ धरली.

गॅनला रस्त्यावर रक्ताची धार लागलेली दिसत होती. गॅनच्या अंगावर शहारे आले. त्यानं धावत जाऊन टोईला गाठलं. थाम खांद्यावर असल्यामुळं टोई धाप लागून आता हळूहळू धावत होता. त्याच्या पोटरीला जखम झाली होती आणि ती साध्या रुमालानं बांधलेली होती.

'दुखतंय् का रे ?' गॅननं विचारले.

'थोडंसं चुरचुरतंय्' थाम म्हणाला आणि हसला.

खरं तर थामही थकलेला दिसत होता. रक्तस्राव बराच झाला होता. रुमाल रक्तानं पार भिजून गेला होता. पोटरीपासून पाया-पर्यंत रक्ताचे ओघळ उठले होते. तिथून रक्त खाली ठिपकत होतं आणि जमिनीवर सांडत होतं. आपली चिंता लपवीत गॅननं विनोद करण्याचा प्रयत्न केला—'थाम, थोडा धीर धर. थोड्याच वेळाच नाम न्हो तुझी शुश्रूषा करायला हजर होईल. तिनं जखमा धुतल्या की दुःख लगेच थांबतं असं म्हणतात बुवा.'

टोई थकला तेव्हा ट्रॅंगनं थामला खांद्यावर घेतलं. गॅन बाजूनं चालत होता. बा रेन दिसेल या आशेन मधूनमधून पाठीमागे लक्ष टाकीत होता. त्या बाजूला अजून गोळाबारी थांबली नव्हती. एकदम त्याला दोन प्रचंड स्फोट ऐकू आले. ६१ मि. मीटर तोफेच्या गोळ्यांच्या आवाजासारखे ते आवाज होते. तेवढ्यात बा रेन आणि त्यांची माणसंही येताना दिसली.

'बा रेन आणि त्याची माणसं आली.'

'कसले पळताहेत साले ! शत्रू त्यांच्या पाठीवर असणार !'

'ते आमराईपर्यंत येऊन ठेपलेले असणार.'

'चला चला, बोलत बसू नका' गॅन म्हणाला, 'मी, ट्रॅंग आणि थाम बरोबर येतो. बाकीच्यांनी पुढे पळा. ट्रॅंग थामला नीट सांभाळ. तू थकलास की त्याला माझ्याकडे दे.'

ट्रॅंग आणि गॅनच्या शिवाय बाकीचे सगळे पुढे पळाले. थोड्याच वेळात बा रेनच्या माणसांनी त्यांना गाठलं. टु राऊचा मुलगा बी एकाच्या आधारानं धावत होता. पोरगा धावता धावता कण्हत होता. त्याच्या जाकिटाची डावी बाही रक्ताळली होती. गॅनला त्याची काळजी वाटू लागली.

'तोफेचा गोळा लागला का रे ?' गॅननं विचारलं.

बीनं नुसती मान डोलावली.

बा रेनच्या खांद्यावर त्याच्या प्रेईंग मँटिस तोफेचं ओझं होतं. धापा टाकीत त्यानं विचारलं, 'काय, आमच्या तोफांची गर्जना ऐकलीस का ?'

'आम्हाला दोन आवाज ऐकू आले. ते तुमचे होते का ?'

'अर्थात. एक माझा होता आणि दुसरा हाई का ट्रेनचा.' हातवारे करीत बा रेन बोलत होता. 'च्यायला, त्यांची काय धुळधाण उडालीय ! तू बघायला हवा होतास. पण साला आम्हाला आणखी बार उडवायला सवडच नाही मिळाली. पळावं लागलं ना ! साल्यांनी आमच्या पाठीवर एवढ्या गोळ्या झाडल्या—'

'—पण आपण आता काय करायचं ?'

'हॉन डॅटला जायचं.'

ते सगळे हॉन डॅटकडे निघाले. गाव आता फारच जवळ आलं होतं. ते गावाच्या अगदी जवळ आले, तशी त्यांना एक स्त्री त्यांच्या-कडे धावत पळत येताना दिसली. ती नाम न्हो होती. ती दम टाकीत धावत आली आणि ट्रॅंगबरोबर धावू लागली. धावता धावताच तिनं थामची जखम पहायला सुरुवात केली. तिच्या हालचालीतून तिची काळजी तसाच तिचा आत्मविश्वासही प्रत्ययाला येत होता. तिनं तिच्या रुमालानं रक्त पुसून जखम कोरडी करण्याचा प्रयत्न केला. पण तरीही रक्त भळभळतंच राहिलं. ती हुंदके देऊ लागली.

'घाबरण्याचं काही कारण नाही, नाम न्हो' गॅन थट्टेनं म्हणाला, 'एवढ्याशा जखमेनं काही तो मरणार नाही.'

धावता धावता गॅनच्या मनात विचार येत होते—थामवरून तुझी थट्टा केली तर, नाम न्हो, तू किती चिडतेस. पण आता मात्र तुझ्या वागण्यानंच स्पष्ट केलंय्. ठीक आहे, जमेल तुझं आणि थामचं.

मग एकदम त्याला कुएनची आठवण झाली. थामच्या ऐवजी आपल्या पायाला जखम झाली असती तर ? त्याच्या नजरेसमोर कुएनचा चेहरा उभा राहिला. तो नाम न्होच्या चेहऱ्याइतकाच दुःखी आणि घाबरलेला दिसत होता.

—आणि याचंच त्याला समाधान वाटत होतं. □

क्रांतिकारक गुहेत पोचल्याला उणापुरा एक तास सुद्धा झाला नव्हता. तेवढ्यात शत्रूचे सैनिक हॉन डॅट गावात येऊन पोचले होते.

डोंगरावरून फणसाच्या झाडाच्या फांद्यातून हाई थेप आणि त्याची माणसं त्यांच्या प्रत्येक हालचालीची पहाणी करीत होती. फणसाच्या, आंब्याच्या आणि रातंब्याच्या झाडापाशी घोळके करताना आपाप-सात बोलत असलेले, नारळाच्या झाडावर चढत असलेले सैनिक वरून दिसत होते. रोजच्यासारखचं सकाळच्या सूर्याचं कोवळं ऊन गावावर पसरलं होतं. पण आज गावात गोंधळ उडाला होता. माणसांचा आरडा-ओरडा, मधून मधून येणारे बंदुकींच्या फैरीचे आवाज, धुबडाचे नि इतर पाखरांचे घूत्कार आणि मधूनच मारल्या जाणाऱ्या म्हशींच्या केविलवाण्या केकाटण्याने वातावरण भरून गेलं होतं. अरण्यरक्षक माडाच्या राईतून आराम करताना दिसत होते. त्यांच्या गणवेशांना झाडाच्या फांद्या बांधलेल्या असल्यामुळे इतर झाडझाडोऱ्याहून ते निराळे ओळखणे कठीण जात होतं. हलणारं झाड म्हणजे वनरक्षक. स्थिर झाड म्हणजे खरं झाड असं ओळखावं लागत होतं.

सैनिकांचा एक जथा कुठून तरी चोरून मारून आणलेली स्वैपाकाची भांडी घेऊन येत होता. सैनिकांची जवळजवळ एक पूर्ण पलटण डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या ईल नदीकडे येत असलेली दिसत होती. त्या नदीला ईल नाव पडण्याचं कारण असं की त्यात ईल जातीच्या माशाचा एक भला मोठा नरमादीचा जोडा होता. गावकरी त्यांना कधीच पकडीत नसत. एकदा सुआन नावाच्या

कोळद्याने त्यांना पकडण्याचा प्रयत्न केला होता. पण त्यामुळे तो आजारी पडला अशी गावात वंदता होती. अर्थात सुआनची ही गोष्ट खरी की खोटी याची गावात कोणालाच नक्की माहिती नव्हती. नदीत ईल मासे होते हे मात्र खरं आणि त्यांच्यामुळे नदीचं पाणी स्वच्छ रहायचं हेही खरं होतं.

नदीच्या बाजूला काही सैनिक मोठमोठे तंबू उभारीत होते. ते पाहून गॅनकडे वळून काळजीच्या स्वरात तो म्हणाला— 'त्यांच्या तंबू ठोकण्यावरून ते जणू काय कायमचेच इथे रहाणार असं दिसतंय. शिवाय आता ओढाही त्यांच्या ताब्यात रहाणारसं वाटतंय.'

'हं, असं दिसतंय खरं.' गॅन पुटपुटला.

, म्हणजे काम जरा कठीणच दिसतंय.'

'गुहेत पाण्याचा केवढा साठा आहे ?' गॅनने विचारलं. 'आपण पाणी साठवलंय, पण फारसं नाही. दोन चार दिवसाहून जास्त रहावं लागलं तर पंचाईत होईल.' खालच्या दृश्यावर नजर खिळलेली ठेवूनच हाई थेप बोलत होता.

'ठीक आहे. गुहेत सगळ्यांना याची माहिती दिली पाहिजे.'

डॅटला राखणीवर ठेवून आणि विशेष घडलंच तर ताबडतोब आत कळविण्याविषयी सांगून बाकी सगळे दगडधोंड्यातून आणि कपारीतून मार्ग काढीत काढीत गुहेत गेले.

हॉन डॅट डोंगराचा घेर पायापाशी चार किलोमीटर होता. त्याचा आकार कासवासारखा लंबवर्तुळाकार होता. माथ्यावर तो साधारणपणे हजार मीटर लांब आणि सातशे मीटर रुंद होता. त्याच्या पोटात ही गुहा होती. गुहा उतारावर अर्ध्या अंतरावर होती. तिला एकच तोंड होतं आणि ते चांगलंच अरुंद होतं. तोंडाच्या आतल्या बाजूला एक लांबलचक वाकडीतिकडी घळ होती. घळीच्या टोकाला सपाट भाग होता. त्या सपाट भागातून आतल्या बाजूला आणखी तीन घळी होत्या.

हाई थेप, बा रेन आणि गॅन यांना गुहेच्या तोंडाशीच आणखी दोन क्रांतिकारक भेटले. 'सगळे आतल्या भागात जमले आहेत.' त्यांच्यापैकी एकाने माहिती दिली.

'इथून खाली काय चाललंय ते स्पष्ट दिसत का ?'

'हां.'

'पाहू दे' म्हणत गॅन त्याच्या पाठोपाठ एका कपारीमागे गेला. आणि त्याच्या जागी उभं राहून खाली पाहू लागला. खाली बराच मोठा प्रदेश दिसत होता. माडांच्या रांगामध्ये सैनिक राहुटया ठोकीत होते, तेही इथून स्पष्ट दिसत होतं.

'टेहेळणीसाठी ही जागा भलतीच मोक्याची आहे.' गॅननं प्रशस्तिपत्र दिलं.

नंतर तो बा रेन नि हाई थेप बरोबर आत गेला. डाव्या बाजूला वळल्यावर बरीच मिनिटे त्या वाकड्या वाकड्या घळीतून ते चालत राहिले व शेवटी टोकापाशी आले. आत मंद दिवा जळत होता. आणि माणसांची कुजबुज चालू होती. इथे सगळे होते. त्यातले काही शत्रूला माहीत होते. त्यामुळे त्यांना गावात रहाणं शक्यच नव्हतं. डोंगराला असलेल्या भेगांमधून थोडाथोडा प्रकाश आत झिरपत होता. म्हणून अपेक्षेइतका काळोख तिथे नव्हता. वातावरणात ताण होता काळजी भरून राहिली होती. त्यातच माणसांच्या पायाच्या-शरीरांच्या हालचालींचा आवाज मिसळून गेला होता. अपुऱ्या प्रकाशामुळे कोणीच कोणाला स्पष्ट दिसत नव्हतं.

गॅनला हळू आवाजात मारलेली हाक ऐकू आली. अंधारात ती दिसली नाही तरी त्यानं आवाजावरून कुएनला ओळखलं. तो आवाजाच्या दिशेने गेला आणि त्याच्या ओळखीच्या हातांचा त्याला स्पर्श झाला. कुएन त्याच्या सर्वांगावरून हात फिरवीत जणू तो हातीपायी सुखरूप आहे याची खात्री करून घेत होती.

बी चटईवर पडला होता. त्याचा जखमी हात एका गळपट्ट्याच्या घडीवर ठेवलेला होता. नाम न्हो त्याच्याजवळ बसून त्याला रुमालाने वारा घालत होती.

'गॅन आला काय ?' थामनं विचारलं.

'हं, मी आलोय. कसं काय आहे ?'

'ठीक आहे.'

'तोफेच्या गोळ्याचा तुकडा अजूनही पोटरीत आहे का निघाला ?' गॅनने थामला विचारलं.

उत्तर नाम न्हो न दिलं, 'मला वाटतं इतक्या रक्तस्रावाबरोबर तो पडला असावा.'

कमरेच्या पट्ट्यात अडकवलेली बॅटरी काढून गॅनने आपल्या मित्राच्या पायाची पहाणी केली. छोटी थुय जवळ येऊन घाबरत घाबरत जखम पहात होती. थामनं तिचा हात पकडून तिला आपल्या जवळ बसवलं.

जखम नीट बांधलेली होती. रक्तस्राव थांबला होता. गॅन खाली वाकला तेव्हा त्याच्या कानात थाम कुजबुजला— 'माझ्या जखमेचं काही विशेष नाही. छोटासा तुकडा तर घुसला होता. पडला असेल. पण तुम्ही बी कडे नीट लक्ष द्या. बिचाऱ्याच्या हाताच्या चिंध्या झाल्या आहेत. पण पोरगं बाकी कणखर आहे हं, जरासुद्धा ओरडत नाहीये.'

गॅन बी कडे आला. त्यानं बॅटरीचा झोत त्याच्यावर टाकला, पोराच्या जाकिटाची बाही कापून टाकली होती आणि त्यामुळे हात उघडा पडला होता. हातावर खांद्यापर्यंत बँडेज होतं. बँडेजवर ठिकठिकाणी सुकलेल्या रक्ताचे काळे तपकिरी डाग दिसत होते. बी ने दुसऱ्या हाताने चटई घट्ट पकडून ठेवली होती. त्याचे डोळे बंद होते आणि तो तोंडाने श्वासोच्छ्वास करीत होता. तो थकला होता नी त्याचं तोंड सुकलं होतं. पण त्याचे ओठ अजूनही तजेलदार दिसत होते. त्याला झोप लागल्यासारखं दिसत होतं. त्याच्या निष्पाप चेहऱ्यावर दुःखाची छायाही नव्हती. आपल्या धाकट्या भावाबरोबर— ऊट बरोबर समुद्रकिनाऱ्यावर खेळताना किंवा बापानं खूप मासे घरी आणले की त्याचा चेहरा आनंदाने फुलून जाई, तेव्हा तो दिसे तसाच आताही दिसत होता. त्याच्या त्या निरागस चेहऱ्याकडे पहाता पहाता गॅनचं हृदय भरून आलं. तसंच त्याचं मन सूडाने, त्वेषाने उसळी मारू लागलं. तोफा घेऊन शेतातून फिरणारे शत्रूचे सैनिक, त्यांच्या तोफखान्यावरच्या शिवंदीच्या हालचाली, तोफेचा गोळा सारं सारं त्याच्या डोळ्यासमोर फिरू लागलं. आणि त्याच्या मनात राग उफाळून उठला.

इतक्यात हाइ थेपनं त्याला हाक मारली आणि तो भानावर आला. कुएन बीचे कपडे सारखे करीत होती. तो तिला म्हणाला,



त्याच्या निष्पाप चेहेऱ्यावर दुःखाची छायाही नव्हती

'चल आपल्याला मीटिंगला बोलावताहेत.'

कुएनने थुइकडे पाहिलं. थामकाकाच्या अंगावर हात टाकून ती स्वस्थ बसली होती. 'थुय, तू शहाणी ना ?'

'हो.' थुयने मान डोलावली.

'मग तू शहाण्या मुलीसारखी इथे नाम न्हो मावशीबरोबर रहाशील ना?' थुइने पुन्हा मान डोलावली.

मीटिंग फक्त पार्टीच्या सभासदांची होती. सगळे जमल्यावर हाइ थेपने बोलायला सुरुवात केली—'प्रथम फक्त पार्टीच्या सभासदांनाच मीटिंगला बोलवावं असं मी ठरवलं होतं. पण अधिक विचार करता मी असं ठरवलंय् की सगळ्यांनाच बोलवावं. अर्थात या सगळ्यांमध्ये पहाऱ्यावर असलेल्यांचा आणि जखमी माणसांच्या शुश्रूषेत गुंतलेल्याचा समावेश करता येणं शक्य नाही. कॉमरेड्स्, तुम्हाला काय वाटतं ?'

'कबूल.' सगळे म्हणाले.

मग बा रेनने बाहेर जाऊन सगळ्यांना बोलावून आणलं.

सगळे आल्यावर हाई थेपनं पुन्हा बोलायला सुरुवात केली— 'आपल्या गावावर यापूर्वी कधीही झाला नव्हता एवढ्या मोठ्या प्रमाणावर शत्रूनं या वेळी हल्ला केलाय हे सर्वांना माहीत आहेच. आणि मी त्यात काही नवीन सांगतोय असंही नाही. व्हान टान्हपाशी पहिल्या काही चकमकी झाल्यानंतर आज शत्रू आपल्या गावात तळ ठोकून बसला आहे. थोड्या वेळापूर्वी मी इथून नीट टेहळणी केली. मला असं वाटतं की या गुहेला वेढा घालायचा त्यांचा विचार दिसतोय. आपला गावाशी संबंध तुटलाय. शिवाय आपला पाण्याचा साठा त्यांच्या ताब्यात आहे. किनाऱ्यावर पेरून ठेवलेल्या आपल्या टेहेळणीदाराकडून असा संदेश आला आहे की आपल्यापासून सुमारे एखादं किलोमीटर अंतरावर त्यांनी दहा L S M जातीच्या तोफा आणून ठेवल्या आहेत. ते आपल्यावर हल्ला करणार हे नक्की. अशा परिस्थितीत त्यांच्याशी सामना कसा द्यायचा हा प्रश्न आज आपल्यापुढे उभा आहे...'

तोफेच्या गोळ्याच्या आवाजानं त्याच्या भागात खंड पडत होता. मध्येच एक तोफगोळा डोंगरावर येऊन आदळला. त्याच्या आघाताने कडेकपारी हादरल्या आणि बरीचशी माती कोठीत आणि सभेतल्या लोकांच्या अंगावर पडली.

'आठ मिलिमीटरच्या तोफा उडविताहेत बहुतेक' गॅन म्हणाला.

'हूं' बा रेन म्हणाला 'हजारो किलो वजनाचे बॉम्ब पडले तरी आपला केससुद्धा वाकडा होणार नाही या गुहेत.'

पुढं दहा मिनिटं सतत नुसता गडगडाटच ऐकू येत राहिला. तोफांचे आवाज नि शिवाय त्यांचे प्रतिध्वनी यानी गुहा दुमदुमून राहिली होती. कोठीत आत असल्यामुळे बाहेर नक्की काय चाललंय ह्याचीही कोणाला कल्पना येईना.

तेवढ्यात डॅट आत घुसला.

'मोठमोठ्या संगिनीनी ते डोंगर फोडताहेत.' तो ओरडला. 'बरीचशी झाडं उन्मळून पडताहेत. कपारीआडून मला त्यांच्या पावलांचाही आवाज ऐकू यावा एवढे ते जवळ आले आहेत.'

'खाली गावात होते ते सैनिक काय करताहेत ?'

'त्यांचा गुहेभोवती वेढा पक्का झालाय. डोंगरापासून शंभर मीटर पलीकडे सर्वत्र शत्रूचं सैन्यच सैन्य पसरलंय.'

'गुहेच्या तोंडापाशी ?'

'नाही, तेथपर्यंत अजून कोणी आलं नाही.'

थोडा विचार करून हाय थेप म्हणाला—'मी आता तिघा-तिघांचे गट पाडतो. दोन गटांनी गुहेच्या तोंडाशी आणि दुसऱ्या दोन गटांनी थोडं आतल्या बाजूला रहायचं. आपल्यापाशी आहेत तेवढ्या सगळ्या थॉम्पसन्स त्यांनी घ्यायच्या, हातबॉम्बस् घ्यायचे, बा रेन आणि गॅन चला. आपापले गट घेऊन बाहेर चला. बाकीचे सारे इथेच थांबतील.'

बा रेन आणि गॅन तावडतोब तयारीला लागले. गॅनचा गट गुहेच्या तोंडाकडे निघाला. जाता जाता गॅनने बा रेनकडे पाहिलं. बा रेननं आपला सुरा परजला होता. 'आम्ही दरवाजाकडे निघालो आहोत. आम्हाला कोन करून थोडेसे आत तुम्ही रहा.' बा रेननं फर्मावलं.

'ठीक आहे. पण अडचण आलीच तर आत माघार घ्यायला बिचकू नका. आम्ही आहोत.'

'ठीक आहे.'

तिघा-तिघांचे दोन गट वळणावळणाच्या घळीतून गुहेच्या दाराकडे चालू लागले. एकाचा नेता गॅन होता. दुसऱ्याचा टोई. दरवाजापाशी त्यांनी लपून बसायला मोठमोठ्या दरडी शोधल्या. टोईच्या गटापाशी दोन थॉम्पसन होत्या आणि सात MK3 हातबॉम्ब होते. गॅनच्या गटाजवळ एक थॉम्पसन, एक मास रायफल आणि आठ हातबॉम्ब होते. ते आपापल्या जागा घेतात न घेतात तोच डाट आतून धावत धावत आला. तो खूश होता—'हाइ थेपने मला तुमच्याबरोबर रहायला सांगितलंय.'

'बरं झालं.' गॅन म्हणाला. 'तू आमच्याबरोबर रहा. तुझ्यापाशी किती काडतुसं आहेत ?'

'पंचेचाळीस.'

'तुझा नेम बरा आहे नाही ?'

स्वतःची स्तुती ऐकून डाट थोडासा बावचळला. म्हणाला–' हं, जमतं साधारण मला, तुझ्याएवढं खास नाही. पण–'

' तसं नाही. ' गॅन म्हणाला. ' मला नेमबाजी जमते. पण माझ्या या मास रायफलनंच. कारबाइन मी अजून वापरली नाही. '

' तुला मास वापरता येत असेल तर तुला कारबाइनसुद्धा वापरता आली पाहिजे. ती वापरायला फारच सोपी असते. आणि खरं सांगायचं म्हणजे डोकं शांत ठेवून वापरली तर कोणतीही बंदूक चालते.

डाटच्या चेहऱ्यावर लपवाछपवी नव्हती.

' म्हणजे तू नेहमी डोकं शांत ठेवतोस म्हण ना. ' गॅन म्हणाला.

' हो मग. अर्थात. '

उत्तर स्पष्ट होतं. आणि गॅनला माहीत होतं की ते खरंही होतं. डाट केवळ अठरा वर्षांचा होता. गॅनला तो आवडायचा. जेव्हा जेव्हा तो टामचानला भेटायला जिल्ह्याच्या ठिकाणी येत असे तेव्हा तेव्हा त्याची आणि डाटची भेट होई.

नेत्यांचा शरीररक्षक म्हणून त्याच्या असलेल्या कामाव्यतिरिक्त तो त्यांच्या जेवण्याखाण्याचीही व्यवस्था करायचा. त्याच्यामुळेच गॅनला स्वादिष्ट मासे आणि रुचकर कोंबडी खायला मिळायची. शिवाय गॅनसारखाच डाटही अनाथ होता. त्यामुळे त्याच्याविषयी गॅनला अधिकच आपुलकी वाटे. डाटची आई त्याच्या जन्माच्या वेळीच वारली होती. त्याच्या वडिलांना १९५८ मध्ये दिएमच्या हस्तकांनी मारले आणि त्यांचे प्रेत दलदलीत फेकून दिलं. सू, कुएन आणि इतरांनी ती हाडं गोळा करून गुहेत ठेवली होती. डाटला एक आजीच काय ती होती. आईची आई. ती साठी उलटलेली म्हातारी होती. आणि लिन क्विनमध्ये रहायची. डाट टामचानबरोबर गेली दोन वर्षं होता. एकदा तर डाटला बरेच दिवस न पाहिल्यामुळे त्याची म्हातारी आजी लिन क्विन हून केवळ एकदा त्याला डोळे भरून पहाण्यासाठी जिल्ह्याच्या गावी चालत आली होती.

' काल आजीला भेटलास का रे ?' गॅनने विचारलं.

' अर्थात, ती खूश झाली. सारखं मला थोपटीत ती रडत होती. मग तिनं काही पोपये काढले आणि मला कोलमीचं भरीत करून दिलं. ते भरीत मला फार आवडतं. ओकारी येइस्तोवर काल मी भरीत हडपलं. '

' तसलं भरीत मला देखील आवडतं. '

' आजीकडून मी तुझ्यासाठी सुकवलेली कोलमी आणल्येय. '

गॅनने डाटच्या बंदुकीकडे बोट दाखवीत म्हटलं ' ठासलीय ना ?'

' हो, पण मी सेफ्टी क्लच नेहमीच लावून ठेवतो. '

' ठीक आहे. आता तुला सोईस्कर अशा जागी उभा राहा पाहू. '

डाट एका दरडीमागे उभा राहिला. त्यानं बंदुकीची नळी दरवाजाकडे वळविली; डावा डोळा बंद केला आणि बघितलं. हां. ही जागा ठीक आहे–मग त्याने पुन्हा एकदा नीट नेम घेऊन बघितला. डावा डोळा मिटून बघताना तो जीभ बाहेर काढून वरच्या ओठावर फिरवत होता. ' आयला मस्त जागा आहे ! ' त्यानं परत म्हटलं. मग बंदूक आपल्या कमरेपाशी उभी करीत त्यानं आपला पाण्याचा डबा बाहेर काढला आणि तो घटाघटा भरपूर पाणी प्याला. डबा गॅनपुढे करीत तो म्हणाला, ' तुला पाहिजे ?'

' माझ्याजवळ आहे. ' कमरेला बांधलेल्या पट्ट्यात अडकवलेल्या आपल्या डब्याकडे बोट दाखवीत गॅन म्हणाला, ' पाणी थोडं पी, संपवू नको. अती तहान लागली तर पी. '

मग गॅनने आपल्या इतर मित्रांनाही सांगितलं–

' कॉमरेड्स्, पाणी जपून वापरा. आपल्याजवळ पाण्याचा फारसा साठा नाही. सुका भात हेच आता आपलं मुख्य अन्न होणाराय. तेव्हा तोही केवळ वेळ जात नाही म्हणून खाऊन टाकू नका. '

' पण आणखी तांदूळ आहे की गुहेत ' टोई म्हणाला.

' आहेत. पण थोडीशीच पोती आहेत. फार फार तर तीन-चार दिवस पुरतील एवढीच आहेत. '

' अँहँ, मग काय झालं ! तीन-चार दिवसांत नक्कीच ते चालते होतील–'

' त्यांच्याबद्दल नक्की कोणालाच काही माहिती नाही. पण त्यांनी आपला वेढा आठवडाभर वाढवला तर ?'

कुणीच उत्तर दिलं नाही. जो तो आपापल्या जागी गप्प बसून राहिला. सर्व बंदुकांची टोकं आता गुहेच्या तोंडाकडे वळवलेली होती. गॅनने दूरवर पसरलेल्या शेताकडे पाहिलं. उंच उंच माड स्तब्ध उभे होते. त्यांच्या झावळ्यातून सूर्यप्रकाश झिरपत होता. खाकी गणवेशातल्या सैनिकांची इकडून तिकडे ये-जा चालू होती. मधूनच जेवण्याखाण्याची भांडी एकमेकांवर आपटल्याचा आवाज येत होता. मधूनच सैनिकांचा आरडाओरडा, आरोळ्या ऐकू येत होत्या. मधूनच माडावरून पडलेल्या नारळांचा धप्प् असा आवाज येत होता.

कुएननं टाकलेल्या बॅटरीच्या प्रकाशझोतात सू रांजणाचं निरीक्षण करीत होती. ती रांजणावर बाहेरच्या बाजूने हात फिरवीत होती. कुएननं काळजीपूर्वक स्वरात विचारलं, ' काय ग, रांजण गळतोय का ?'

' थोडासा. तू इथंच थांब. मी प्लॅस्टिकच्या कागदानं रांजण बाहेरून बांधून घेते. म्हणजे पाणी निदान फुकट तरी जायचं नाही. '

सू प्लॅस्टिकचा मोठा कागद घेऊन आली– ' इकडं पाड ग प्रकाश ' म्हणून सूनं तो प्रकाशात धरला.

' ठीक. आणखी याला भोकं नाहीत. '

मग सपाटशी जागा बघून तिनं तो जमिनीवर पसरला. आणि एक एक करून दोन्ही रांजण त्या कागदावर ठेवले.

' काय करणार, नाम न्होच्या हातून एक फुटला. ' ती पुटपुटली. मग तिनं सुतानं प्लास्टिकच्या कागदाची टोकं रांजणाच्या गळ्याशी बांधून टाकली आणि उठून ती कुएनला म्हणाली,

' तांदुळाचे रांजण पण बघून येऊ या. '

त्या दोघी बाजूच्या घळीत जाऊ लागल्या. इतक्यात उजव्या बाजूला त्यांना त्या कोळ्याच्या कण्हण्याचा आवाज ऐकू आला. त्याची बायको तर लहान मुलासारखी मुसमुसून रडत होती. पावलाचा आवाज ऐकू आल्यावर ती म्हणाली–' दया करा, थोडीशी दारू द्या ना...'

कुएननं तिच्या बहिणीचा हात दाबला. ' ऐकलंस, तिला दारू पाहिजे. '

' तिची बडबड काय ऐकतेस ? तिला काय द्यायचं, काय नाही हे

आपण हाई थेपला विचारू.'

'अगबाई', ती बाई ओरडली 'कुएन का ग तू?' दया कर, आमच्यासाठी ह्यांच्यापाशी मध्यस्ती कर ना?'

ती असं काही बोलेल अशी कुएनला अपेक्षा नव्हती. शिवाय तिने आपल्याला बरोबर ओळखलं याचीही कुएनला चीड आली.

'चूप बस ग थेरडे. मी तुझ्यासाठी काहीही करू शकत नाही. तुझी जनता कोर्टापुढे केस येईल त्यावेळी काय सांगायच ते सांग.'

'बाप रे, जनता कोर्ट?' तिच्या शब्दात भीती होती. 'म्हणजे सगळं संपलंच.' ती रडत रडत म्हणाली.

'तू थांब ग!' शेवटी नवऱ्याने तिला चापलं.

'बढाया मारीत होतास ना मेल्या. आता बघू कोण तुला वाचवायला येतंय ते. चांगला तावडीत सापडलायस.' कुएनने मनात विचार केला.

तांदुळाच्या रांजणाजवळ गेल्यावर सूने त्यातील मूठभर काढून त्याचा वास घेऊन बघितला. तांदूळ अजून चांगले आहेत ह्याचा तिला आनंद झाला. बॅटरीच्या प्रकाशात तांदुळांनी पूर्ण भरलेले दोन रांजण पाहून कुएनलाही धीर आला.

'दोन्ही रांजण मिळून शंभर किलो असतील का ग हे?' तिने विचारले.

'एवढे नसतील.' घळीतून बाहेर पडता पडता सू म्हणाली, 'पण उद्या भात कसा शिजवावा? पाणी तर इतकं कमी आहे.' ती म्हणाली,

'पाणी कमी आहे खरं. पण पाण्याशिवाय—'


'आजच्या दिवसापुरता भात प्रत्येकाला वाटून झालाय आधीच. उद्या आपण तांदूळ दळून त्याचं पीठच वाटू. तुला कसं वाटतं?'

'दुसरं काही नसलं तर तांदुळाचं पीठ चालेल.'

त्यांनी हाई थेपला सगळी परिस्थिती सांगितली. हाई थेप त्यावर फक्त हसला. 'आमची सगळी भिस्त तुम्हा दोघींवर आहे. जेवणाखाणाचं तुम्ही बघायचं. अन्न थोडं असेल तर तेच वाटून घ्यायचं, जास्त असलं तर तेही सर्वांना वाटायचं. फक्त जखमी जवानांना प्रथम द्यायला विसरायचं नाही. आम्हाला नुसतं पीठ चालेल. पण त्यांना निदान कण्हेरी तरी करून द्यायला हवी.'

मग सू आणि कुएननं गुहेतून तीन धोंडे शोधून आणून चूल मांडली. स्वयंपाकापुरेशी भांडीकुंडी, आणि फोडून ठेवलेली लाकडं गुहेत होतीच.

सूनं आपल्या सिगारेट लायटरने चूल पेटवली. बराच वेळ नुसता धूरच झाला. मग थोड्या वेळाने लाकडांनी पेट घेतला. सू चुलीपाशी बसून होती. इतक्यात थूय कुठून तरी हळूच आवाज न करता चवड्यावर चालत आली. आणि तिनं कुएनच्या गळ्याला पाठीमागून मिठी मारली. कुएननेही आपले हात पाठीमागे नेऊन तिला



पाठुंगळीस घेतलं.

एवढ्यात M. G. तोफेचा मोठा धडाका ऐकू आला. 'त्यांनी पुन्हा हल्ला सुरू केलाय.' घाईघाईने उठत कुएन म्हणाली,

'पण हल्ल्याला यांनी दिलेलं प्रत्युत्तर अजून का ऐकू येत नाही ?' हे शब्द सूच्या तोंडून निघतात न निघतात तोच त्यांना त्यांच्या थाम्पसन तोफांचा धडधडाट ऐकू आला. पाठोपाठ छोट्या बंदुकांतून आणि कारबाइन्समधून सुटलेल्या गोळ्यांचा सूं सूं आवाजही ऐकू आला.

'हां, हे घे आपलं प्रत्युत्तर !' म्हणत कुएन गुहेच्या तोंडाकडे धावली. सू मागून नको नको म्हणत असतानासुद्धा कुएन थांबली नाही. ती धावत थेट हाई थेपच्या गटात आली.

'आपल्याला आणखी एक गट तयार करायचाय.' हाई थेप सांगत होता. 'माझ्याबरोबर कोण कोण यायला तयार आहे ?'

'मी–मी'–म्हणत हात उंचावत कुएन पुढे झाली. पण पार्टी सेक्रेटरीने तिला एका हातानं बाजूला सारल. कुएनला फार वाईट वाटलं.

हाई थेप दोन क्रांतिकारकांबरोबर पुढे निघाला. घि एपने त्याची छोटी तोफ काखोटीला मारली होती. 'ही आज मी वापरणार, आणि आग ओकणार.' तो म्हणाला.

'दुसरी तोफ कुठाय.'

'ती काय तिकडे आहे ?'

'ती पण घेऊन ये.'

गुहेच्या दरवाजापाशी त्यांना बा रेनचा आवाज ऐकू आला. तुम्ही कशाला आलात इतक्यात बाहेर ? आत होता तेच बरे होता. इथे आम्हाला सुद्धा आमची शस्त्रं वापरायची संधी मिळाली नाही. जे कोणी पुढे आले त्यांना फक्त गॅनच्या गटानंच उडवून लावलंय. तुम्हाला बघायचं असलं तर इकडून पहा. मुडदे पडल्याहेत त्यांचे तोंडाशीच.'

'कुठायत् कुठायत्', म्हणत सगळेच पहायला धावले. हाई थेपनं खडकाच्या एका फटीतून पाहिलं. बाहेर शत्रूच्या सहा सैनिकांची प्रेते पडली होती. बहुतेक उताणेच कोसळले होते. आणि त्यांच्या बंदुका त्यांच्यापाशी जमिनीवर पडल्या होत्या. शत्रू अजून गुहेवर गोळ्यांचा वर्षाव करीत होता. त्यातल्या काही गोळ्या त्या प्रेतांना लागत होत्या. काही जमिनीवर आपटत होत्या. त्यामुळे धूळ उडत होती.




सूर्याची किरणं माडांच्या झावळ्यातून गाळून येत होती. सावल्या लांब झाल्या होत्या. गोळ्यांचे सूं सूं आवाज येत होते. त्यांच्या प्रेतावरून गोळ्या चाटून जात होत्या. आपल्याच सैनिकांना शत्रू मृत्यूनंतरही विश्रांती घेऊ देत नव्हता. एखादी गोळी एका प्रेताच्या पायाला लागली तर तो पाय त्या धक्क्यानं उडत होता. प्रेतं अस्ताव्यस्त पडली होती. सैनिकांचे चेहरे घामेजलेले आणि त्रस्त दिसत होते.

हाई थेपचं लक्ष प्रेताजवळ पडलेल्या शस्त्राकडे होतं. त्या काळ्या गॅरंड जातीच्या बंदुका होत्या. उन्हात त्यांच्या नळ्या चमकत होत्या. त्यात काही थॉम्पसन रायफलसही होत्या. प्रेतांच्या छातीवर नव्या कोऱ्या काडतुसांचे पट्टे चमकत होते. त्याला आणि त्याच्या मित्रांना ह्या जातीची शस्त्रं बरेच दिवसापासून हवी होती. अशा शस्त्राबद्दल त्यांनी अनेकवेळा चर्चा केली होती. अशी शस्त्रं आपल्याला वापरायला मिळाली तर काय बहार होईल अशा आशा बाळगल्या होत्या, स्वप्नं पाहिली होती. ती त्यांना हवी असलेली शस्त्रं आता त्यांच्यासमोर चार हात अंतरावर पडलेली होती. ती शस्त्रं शत्रूला त्यांच्या हाती पडू द्यायची नव्हती. हे अर्थात त्यांनी चालवलेल्या गोळ्यावरून उघड होत होते. हाई थेपने बराच वेळपर्यंत गोळीबार थांबायची वाट पहायचं ठरवलं. नंतर मात्र झपाट्यानं ती शस्त्रं ताब्यात घ्यायची होती. पण आता ताबडतोब काहीच करणं शक्य नव्हतं; कारण गोळीबार फारच जोरात होता.

थोडी मिनिटं अशीच गेली. हाई थेपला आणखी धीर धरवेना. बा रेनकडे बघत तो म्हणाला, 'कोणाला तरी पाठवून त्या बंदुका हस्तगत करायला पाहिजेत.'

बा रेनने होकारार्थी मान हलविली.

मग ते दोघेजण सरकत सरकत गॅनच्या गटाकडे गेले. कपारीवर थाडथाड गोळ्या पडतच होत्या. ठिणग्या उडत होत्या.

पण तरीही ते तसेच पुढे सरकत होते. गॅनपाशी पोचल्यावर हाई थेप गॅनच्या कानात म्हणाला–'त्यांयला या गोळ्यांच्या वर्षावातून बाहेर पडायला काहीच मार्ग नाही का ?'

गॅननं नकारार्थी मान हलवली. त्याचा चेहरा ओढलेला होता, गंभीर होता. इतक्यात डाट रांगत रांगत पुढे आला. 'मी असाच बाहेर जातो रांगत रांगत. मी तसा आकाराने छोटा आहे. मला गोळ्या नाही लागायच्या, काय ? पण साली शस्त्रं तर मिळतील. जातो, काय ? जाऊ ना ?'

गुहेच्या दारातून बाहेर पडण्यासाठी डाट पोटावर पालथा पडला. त्यानं एकदा गॅनकडे बघितलं. गॅन काही बोलला नाही; त्यानं नुसत्या भुवया आकुंचित केल्या आणि कपाळाला आठ्या घातल्या. गॅनच्या मौनाचा स्वतःला सोईस्कर असा अर्थ लावीत डाट पुढे सरकू लागला. पण इतक्यात गॅन ओरडला–'डाट, पुढे जाऊ नको. मी सांगतोय ना मागं फिर म्हणून.'

[ क्रमशः ]

# उमरी बँकेची धाडसी मोहीम

● अशोक परळीकर, परभणी ●

: पैसा ! पैसा ! पैसा ! पैशाशिवाय एक काम होईल तर शपथ.

: होणार नाही. पैसा महत्त्वाचा आहे.

: देशासाठी आपले सर्वस्व–प्राणसुद्धा– अर्पण करावयास तयार असलेले तरुण मिळाले. पण–

: पण पैशाअभावी मोहिमा अडताहेत असेच ना ?

: हो असेच.

: अरे, मग पैसे मिळविण्याचा प्रयत्न का करीत नाही ?

: खूप प्रयत्न केले. बऱ्याच लोकांनी मदत केली. परंतु योजनेच्या दृष्टीने हा पैसा अपुरा पडतो. आवश्यक पैसा मिळविण्यासाठी आता फक्त दरोडाच घालावा लागेल.

: घातला पाहिजे.

: काय ?

: दरोडा.

: छे: ! छे: ! चोरी, दरोडा पाप आहे.

: मग खून करणे पाप नाही ?

: कोण खून करतो ?

: तुम्ही !

: आम्ही ?

: हो, हो तुम्ही. तुम्ही रझाकार आणि त्यांचे जात्यंध साथीदार पोलीस यांचा खून करता की नाही ?

: आम्ही खून करीत नाही. आम्ही त्या दुष्टांना शासन करतो. समाजासाठी, देशासाठी, स्वातंत्र्यासाठी, त्यांच्या अन्याय, अत्याचाराला पायबंद बसावा, वचक बसावा म्हणून आम्ही त्यांना शासन करतो. स्वार्थासाठी नव्हे.

: बरोबर. म्हणजे शेवटी सर्व आपल्या समाधानावर, समजुतीवरच अवलंबून आहे की नाही ?

: काय म्हणणे आहे तुझे ?

: दरोडा घालण्यात पाप नाही. शत्रू शासनाचा पैसा ताब्यात घेण्यात कसले आले आहे पाप ? तुम्ही स्वार्थ हेतूने चोरी, दरोडा घातल्यास ते पाप ठरू शकेल. एका उदात्त कार्यासाठी तुम्हाला पैसा हवा आहे. राष्ट्राच्या रक्षणार्थ पाडलेले हे खून ठरत नाहीत. खुनी माणसाचा आपण कधी सत्कार करतो का ? त्यांना सन्मान पदके देतो का? परंतु युद्धात अनेक खून पडणाऱ्याला आपण वीर मानतो, त्याला सन्मान पदके देतो, त्याचा यथोचित गौरव करतो. का ? राष्ट्रहितार्थ, स्वातंत्र्यहितार्थ केलेले पाप हे पुण्यच असते. वैयक्तिक हितात पाप असते. शिवाजीने कल्याणच्या सुभेदाराचा खजिना लुटला. त्याचा आपण केवढा गौरव करतो. काहीजण त्यालाही लुटारू, बहकलेला देशभक्त वगैरे म्हणत असतील. तेव्हा तात्पर्य काय ? मनातून पापाचे खूळ काढा आणि–

: पण उद्या आमचेच लोक–

: रिकामटेकडे लोक काय वाटेल ते म्हणतील, तुम्ही आपल्यावर–स्वत:वर विश्वास ठेवा. दरोडा घाला. पैसा मिळवा आणि मिळालेला पैसा इच्छित राष्ट्रकार्यार्थच खर्च करा. तुमचा हेतू उदात्त आहे. तुम्ही दरोडा घातला असे काहीजण कुत्सितपणे म्हणतील. तुमच्या पराक्रमाला नाके मुरडतील, पैशाचा गैरवापर केला म्हणून दुष्ट आरोपही करतील. आपल्याकडच्या लोकांची हीच रीत आहे. तेव्हा डगमगू नका, निराश होऊ नका, काळजी करू नका. मनाची तयारी करा. मनाचा कौल महत्त्वाचा. उठा. निझामाच्या त्या अन्याय्य शासनाची शक्ती क्षीण होईल असे सर्व मार्ग चोखाळा. त्याच्या सत्तेला हादरा द्यावयाचा आहे ना ? त्याला चौफेर धडका द्यावयाच्या आहेत ना ? मग ? मनात विकल्प न आणता एखाद्या बँकेवर–

–पण

: पण परंतु हे भ्याडांचे काम. तुम्ही पराक्रमी आहात. निझामाची अन्याय्य आणि धर्मांध राजवट नेस्तनाबूत करण्यासाठी कटिबद्ध आहात. साध्याकडे जाताना प्राप्त परिस्थितीत साधनांचा विचार करावयाचा नसतो. पैसा सहज उभारता येईल. पण त्यासाठी जिवंत हृदयाची, पोलादी ताकदीची माणसं हवीत. आहेत कोणी ?

: मी, मी.

अंतर्द्वंद्वात अंतर्मनाने ग्वाही दिली.

१५ ऑगस्ट १९४७. भारताला स्वातंत्र्य मिळाले. दुर्दैवाने या स्वातंत्र्याच्या गुलाबालाही काटे होते. पापस्थान निर्माण झाले होतेच. परंतु इकडे हैदराबादचा धर्मांध आणि महत्त्वाकांक्षी निझाम, हैदराबाद संस्थान भारतीय संघराज्यात विलीन न करता स्वतंत्र ठेवून, स्वतंत्र आणि सार्वभौम इस्लामी राज्याची स्थापना करू इच्छित होता. राज्यातील बहुसंख्य प्रजा हिंदु आणि त्या सर्वांचा स्वतंत्र राज्याला विरोध. तेव्हा हिंदूंचा विरोध हाणून पाडावा म्हणून अनन्वित अन्याय आणि अत्याचार हिंदूंवर करण्यास प्रारंभ झाला. इत्तेहादूल मुसलमीन या संघटनेचा जन्म झाला. कासिम रझवी नावच्या लातूरच्या वकिलाने रझाकार संघटना बांधली. लष्करी शिक्षण देण्याची व्यवस्था केली. सत्तेचे पाठबळ होतेच. हिंदूंवर अन्याय, अत्याचार करण्यासाठीच हे राक्षस निर्माण केले होते. त्यांनी केलेल्या अन्याय, अत्याचारांचे काय वर्णन करावे ? अत्याचार वाढले तसे हिंदूंनी प्रतिकार करण्याचे, ठोक देण्याचे ठरविले. ' मरण्यापूर्वी मारावे ' अशी भावना जागृत झाली. स्टेट कांग्रेसने अहिंसक आंदोलनाला सुरुवात केलेली होती. परंतु अनेकदा ' रोग पाहून उपचार ' करावे लागतात. रोग जालीम तर उपचार जालीम या न्यायाने अहिंसा, हिंसा यांचा विचार न करता होईल त्या मार्गाने निझाम सरकारला जेरीस आणणे अत्यावश्यक आहे असे सर्वांनी जाणले. हातात पोथ्या–पुस्तकांशिवाय अन्य काहीही घेतले नाही, अशांनीही हातात शस्त्रे घेतली–हत्यारे घेतली. निरनिराळ्या थरांतील, जातीतील तरुण एकत्र आले होते. ते का चोर होते ? दरोडेखोर होते ? लुटारू होते ? खुनी होते ? छे: ! परंतु निझामी सत्तेच्या अन्यायाविरुद्ध हे उभे राहिले. निझाम सरकार आणि त्याचे अधिकारी यांना दहशत बसावी म्हणून पूल उडविणे, ठाण्यांवर हल्ले करणे, करोडगिरी नाके उद्ध्वस्त करणे, सरकारी इमारतीला सुरुंग लावणे, रेल्वे-रूळ उखडणे इत्यादींसारखे घातपाती कार्यक्रमही स्वीकारण्यात आले. दारूगोळा, शस्त्रास्त्रे यांचा पुरवठा 'बाहेरून' व्हायचा. जिवावर उदार झालेले, हैदराबादला मुक्त करण्याच्या वेडाने झपाटलेले अनेक तरुण, वृद्ध युवा आणि मुले मिळाली. सैनिक मिळाले. सेना तयार झाली. अन्य सज्जताही होती. भूमिगत कार्यकर्त्यांना मदत करणे, गुप्त परिपत्रके वाटणे, शस्त्रास्त्रांची खरेदी करणे, प्रवास–अनेक बाबी होत्या. माणसाला सर्व सोंगे आणता येतील. पण पैशाचे–? छे: ! पैसा कसा उभा करावयाचा हा प्रश्न नेत्यांना, कार्यकर्त्यांना, सैनिकांना सदोदित भेडसावयाचा. पैसा ! पैसा ! पैसा ! पैशाच्या विचारांनी बिचाऱ्यांची झोप उडाली. ' रात्रंदिन आम्हा एकला विचार–पैशाविना कशा योजना राबणार ?' विचार करून करून वेड लागण्याची पाळी आली. विचाराची मर्यादा संपली आणि अविचाराने उचल खाल्ली. अंतर्द्वंद्व सुरू झाले. To be or not to be. सारखाच प्रश्न होता. शेवटी अंतिम ध्येय लक्षात घेऊन, साध्य लक्षात घेऊन, बँकेवर हल्ला करण्यास हरकत नाही असा निर्णय घेण्यात आला. बँकेवर हल्ला करावयाचा, परंतु कोणत्या ? कोणती बँक सोईची राहील? कोणत्या बँकेत जास्त रक्कम मिळेल ? सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणती बँक योग्य आहे ? सहानुभूतीने साहाय्य मिळू शकेल असे कोणते गाव आहे ? रेल्वे स्टेशन आहे काय ? पोलीस ठाणे आहे काय ? एक का दोन ? अनेक समस्या होत्या, अनेक अडचणी होत्या. गुप्तता ठेवणेही अत्यावश्यक होते. तेव्हा बँकेवर हल्ला करावयाचा हे ठरल्यानंतर योग्य अशा बँकेचा बारकाईने शोध घेण्यात आला. अनेक कसोटचा लावण्यात आल्या. निरनिराळ्या व्यक्तींकडून व्यवस्थित माहिती मिळविण्यात आली. आणि शेवटी ' उमरी ' या गावच्या ' स्टेट बँक ऑफ हैदराबाद 'वर हल्ला करण्याचे निश्चित झाले.

बँकेची निवड तर झाली. आता प्रत्यक्ष योजनेचा आराखडा करणे अत्यावश्यक होते. एअर फोर्समधून राजीनामा देऊन बाहेर पडलेले श्री. रघुनाथ रांजणीकर हैदराबाद मुक्तिलढ्यात सामील झाले होते. बँकेची मोहीम अवघड होती. यामुळे योजना विचारपूर्वक होणे अत्यावश्यक होते. त्यांना उमरीला जाऊन प्रत्यक्ष ठिकाणाला भेट देऊन हल्ल्याची योजना आखण्यास सांगण्यात आले.

श्री. रांजणीकर उमरीला, पाहुणीसाठी अनेकदा जाऊन आले. विविध स्थळांना भेटी दिल्या. वेगवेगळे मार्ग पाहिले, अंतर मोजले आणि मग बँकेची इमारत, पोलीस ठाणे आणि रेल्वे स्टेशन या तीनही महत्त्वाच्या केंद्रांवर एकाच वेळी हल्ला करण्याची धाडसी योजना तयार करण्यात आली. रेल्वेच्या वेळापत्रकाचा नीट, काळजीपूर्वक अभ्यास करण्यात आला. काचीगुडा–मनमाड आणि मनमाड–काचीगुडा जाणाऱ्या गाड्यांच्या दरम्यान किती वेळ मिळू शकतो याचा अचूक हिशोब मांडण्यात आला. मिळालेला वेळ स्वातंत्र्य-सैनिकांना सुरक्षित स्थळी पोचविण्यास पुरेसा आहे किंवा नाही हेही पहाण्यात आले. रेल्वेद्वारा संदेश पाठविणे किंवा अन्य साधनांद्वारा संदेश पाठविणे शक्य होऊ नये म्हणून काय केले जावे हे ठरविण्यात आले. संदेश साधने निरुपयोगी करावयाची योजना, तयार योजनेचे महत्त्वाचे अंग बनले. श्री. रांजणीकर पूर्वी सैन्यात असल्यामुळे संभाव्य संकटांची नीट कल्पना ठेवून, अत्यंत काळजीपूर्वक त्यांनी ही योजना आखली. त्यामुळे पुढे यशस्वी झालेल्या या धाडसी मोहिमेचे श्रेय आधी व्यवस्थित आखण्यात आलेल्या या पद्धतशीर योजनेस द्यावे लागेल. योजनेची आखणी व्यवस्थित झाली. प्रमुखांनी योजना नीट अभ्यासून O. K. म्हटले. झाले! हैदराबाद मुक्तिलढ्यातील एका अत्यंत महत्त्वाच्या प्रयोगाची, संस्मरणीय पर्वाची नांदी म्हटली जावयाची होती. मोहीम यशस्वी झाल्यास अमाप पैसा मिळणार होता. वर्तमान संकटांना तोंड द्यावयाचे म्हणजे आर्थिक बळ हवे होते. या मोहिमेत भाग घेण्यासाठी स्वातंत्र्यसैनिकांची निवड करण्यात आली–वेगवेगळ्या वयाचे, वर्णाचे, जातीचे पण एकदिलाचे–ध्येयवेडे. निवडलेले सैनिक कोणतीही जोखीम स्वीकारण्यास तयार असलेले, मरणाचे भय नसलेले. मोहिमेत भाग घेता न आलेले सैनिक रुष्ट होत, कारण त्यांचेही हात शिवशिवत–शत्रूला कंठस्नान घालण्यासाठी, त्यांना दहशत बसविण्यासाठी, सालारे आझम कासिम रझवी आणि हैदराबादच्या उस्मानपाशास धक्का देण्यासाठी. सैनिकांनी स्वेच्छेने स्वीकारलेली शिस्त, त्यामुळे काटेकोर पालन होई. आज्ञा होताच, शस्त्रसज्ज होऊन, त्यांनी बाहेर पडावयाचे. ' कुठे ?' ' काय ?' असे प्रश्न विचारून अपशकून केले जात नसत.

स्थळ : उमरखेड. दिनांक २९ जानेवारी

१९४८. स्वातंत्र्य सैनिकांच्या नायकांना सूचना मिळाल्याप्रमाणे ते सर्व अन्य स्वातंत्र्य सैनिकांसह उमरखेडच्या बाहेर पडले. योजनेप्रमाणे त्यांना सुरुवातीला विदर्भातील पेणगंगेच्या काठी वसलेल्या देवसरी या गावी जावयाचे होते. स्वातंत्र्य सैनिक उत्साहाने, आनंदाने देवसरीच्या मार्गाला लागले. देवसरीला या सैनिकांचे अधूनमधून जाणे होई. त्यामुळे तेथील लोकांना अनेक सैनिक माहीत होते.

दुपारपर्यंत सर्व सैनिक एकत्र आले. मोहीम अवघड आणि नाजूक होती. तेथे असलेल्या कार्यालयात आखणीचे कागद घेऊन प्रमुख बसले. राजाराम देशमुख, अमृतराव थेरबनकर यांच्याबरोबर प्रत्येकी ४०–५० सैनिक दिले गेले. आवश्यक शस्त्रास्त्रे पुरविण्यात आली. तिसऱ्या नायकालाही जवळपास इतकेच सैनिक आणि आवश्यक शस्त्रपुरवठा केला. आपापल्या सैनिकांसह मिळालेल्या कामगिरीवर त्यांना निघावयाचे होते. या तीन तुकडयांवर अत्यंत महत्त्वाची जबाबदारी देण्यात आली होती. ते उमरी–नांदेड, उमरी–भोकर आणि उमरी–धर्माबादच्या दरम्यान रेल्वे वाहतूक बंद पाडून उमरीचा तिही बाजूंनी संपर्क तोडणार होते. मुख्य कार्यक्रम फक्त संबंधित नायकांनाच माहीत होता. त्यांना अन्य सर्वांनी शुभेच्छा व्यक्त केल्या. नायक आत्मविश्वासाने, जिद्दीने, आनंदाने, उत्साहाने आपल्या लक्ष्याकडे निघाले.

मुख्य योजनेतील सैनिक कामगिरीवर निघण्यास अत्यंत उत्सुक होते. ४ वाजले. परंतु अजूनही हिरवा कंदील दाखविण्यात आला नव्हता. काय झाले ? कोणता अडथळा निर्माण झाला ? मागच्याप्रमाणेच श्रम फुकट जाणार का ? परंतु आता उचललेले पाऊल मागे घ्यावयाचे नव्हते. पुढचे पाऊल पुढेच टाकावयाचे होते.

सायंकाळ होण्यापूर्वी पेणगंगा ओलांडणे आवश्यक होते. रातोरात खूप अंतर काटावयाचे होते. हिरवा कंदील दाखविला जाताच आपापले शस्त्र, दारूगोळा आणि जेवण्याचे साहित्य घेऊन सैनिक तयार झाले. अनंत भालेराव, नागनाथ परांजपे, साहेबराव देशमुख, आबासाहेब लहानकर, भीमराव लहानकर, किशोर शहाणे, बन्सीलाल तोष्णेवाल, शंकर शर्मा, बाबूराव कुंटूरकर, दिगंबर उत्तरवार, काशिनाथ शेट्टी आणि अन्य ४० एक सैनिक उमरीकडे जाण्यास तयार झाले. नेहमीपेक्षा आजचे सैनिक निराळेच भासत होते. त्यांच्या मित्रांना हितकर्त्यांना हा फरक चांगलाच जाणवत होता. एकूण तयारी आणि सैनिकांचा आवेश पाहून एखाद्या महत्त्वाच्या, निकराच्या मोहिमेवर हे सैनिक निघाले हे गावकऱ्यांनी ताडले. पित्राज्ञापालनार्थ सिंहासनाकडे पाठ फिरवून १४ वर्षांच्या वनवासासाठी अयोध्येबाहेर पडणाऱ्या प्रभु रामचंद्रासमवेत जसे गंगातीरापर्यंत भारावलेले अयोध्यावासी नागरिक आले तद्वतच नदीपर्यंत येण्याची इच्छा अनेकांनी व्यक्त केली. सैनिकांच्या चाकोरीबद्ध जीवनात भावभावनांना, बांध-बंधनांना अटकाव होता. सैनिकांनी कठोर कर्तव्यपालन करावयाचे. समोर उभे असलेले असंख्य भाबडे जीव, डोळयात आसवं दाटून आलेले मित्र, चेहरा उतरलेले हितचिंतक, आणि तो हात जोडून उभा असलेला म्हातारा, सैनिकांना नाही म्हणवले नाही. त्यांनी मूक संमती दिली. नदीपर्यंत जावयास मिळणार म्हणून उपस्थितांचे चेहरे आनंदले. सर्वजण झपझप नदीकडे निघाले. नदीपाशी आले. सैनिकांनी उपस्थितांचा निरोप घेतला. त्यांच्या डोळयांतून वर्षणारा उत्कट भाव साठविण्याचा प्रयत्न सैनिक करत होते. नदीकिनारी उपस्थित असलेल्या सुहृदांनी शुभेच्छा व्यक्त केल्या. म्हाताऱ्या गृहस्थाने तोंड भरून आशीर्वाद दिला आणि 'स्वीकृत कार्य आटोपून, यशवंत होऊन परत या. तुमच्या येण्याकडे आमचे लक्ष असेल ' असे म्हटले.

स्वातंत्र्य सैनिकांनी एकमेकाकडे पाहिले. वरवर सर्वजण शांत दिसत होते. पण आत कोण खळबळ चालली होती. उद्याचे काय सांगता येणार ? वर्तमान हेच खरे. भविष्याबद्दल, अदृष्टाबद्दल न बोललेलेच चांगले. म्हाताऱ्याच्या रूपात घरातील वडीलधाऱ्या माणसाचा भास–छे ! इतके भावनाप्रधान होणे ठीक नाही. आपण सैनिक आहोत. आपण जे कार्य स्वीकारले आहे तेथे इतक्या बंधनात गुरफटण्याइतपत हळुवार असून चालणार नाही. आपण आज सर्वस्व पणाला लावतो ते का ? कोणासाठी ? किती माणसे त्याची बूज ठेवणार ? आपले घरदार, आपली माणसं, आपलं भावविश्व–? छेः ! गुंता वाढतोच आहे. मन अनाकलनीय अशा पाशात फसतं आहे. किंकर्तव्यमूढ अवस्था प्राप्त झाली आहे–इतक्यात ' भारत माता की जय ', ' पानसरेका का बदला लेके रहेंगे '



**" हँडस अप्, किल्ल्या आमच्या स्वाधीन करा. "**

असा आवाज कानी पडला. स्वप्न तुटले. अंधार विरळ झाला. प्रकाश दिसू लागला. कर्तव्याची ओढ लागली. किनाऱ्यावरील माणसांकडे एकवार पाहून सर्व सैनिकांनी आपले पाऊल उचलले. वर्तमानाच्या प्रकाशावर भविष्याचा काळसर रंग पसरत चालला होता आणि सायंप्रकाशात सैनिक पुढे–पुढे–पुढे चालले होते. 'सदैव सैनिका पुढेच जायचे न मागुती तुवा कधी फिरावयाचे' हे त्यांचे लक्षण, त्यांनी भूतकाळासाठी वळायचं नाही, भविष्यात डोकावून पाहावयाचं नाही, फक्त जगायचं वर्तमान. तेवढेच त्यांच्या हाती चालणाऱ्या सैनिकांचा लयबद्ध आवाज त्या शांत वातावरणात चांगलाच जाणवत होता. सर्वजण मूक होते. पावले उमरी दिशेने झपझप पडत होती. परंतु मन केव्हाचेच तेथे जाऊन विसावले होते.

हिवाळा संपला होता. तरीसुद्धा पहाटे थंडी जाणवते. सततच्या चालण्यामुळे रक्त उसळत होते. सर्वांचे अंग गरम होते. निझामी राज्य आले तसे सैनिकांना चेव आला. परंतु शत्रुपक्षाला जाग येईल, शत्रू सावध होईल म्हणून अगदी जपून, शांतपणे सैनिक चालत होते.

पहाटेचे तीन-चार वाजले असावेत. सर्वजण उमरीपासून दोन मैलांवर असलेल्या कामनगावी पोचले. पाय थकले होते. विश्रांतीची अत्यंत आवश्यकता होती. सारे सैनिक गावाकडे बघत होते. गाव शांत झोपले होते. पृथ्वीने अंधाराचे पांघरूण अजून दूर केले नव्हते. तेव्हा ठरल्याप्रमाणे इथे माळावर विश्रांती घ्यावयाची, प्रातर्विधी आटोपायचा आणि न्याहारी करून पुढे जावयाचे–थकलेल्या सैनिकांनी जमिनीला पाठ लावली. एरवी त्या मनःस्थितीत त्यांना झोप येणे शक्य नव्हते. परंतु स्वदेशासाठी आपल्या सर्वस्वाचा होम करावयास निघालेल्या या बहाद्दरांवर निद्रादेवी प्रसन्न झाली. थोड्याच वेळात या सर्वांना चक्क झोप लागली.

सकाळी सकाळी यांच्या हेरांनी येऊन यांना उठवले. विश्रांती मिळाल्यामुळे आणि हेरांकडून 'कोंडलवाडी प्रकरणाचे' वृत्त ऐकून सैनिकांना चांगलीच तरतरी आली. सुरुवात तर चांगली आणि अपेक्षेप्रमाणे झाली होती. आलेल्या माणसांनी बैलगाड्या आणल्या होत्या. त्यात शस्त्रे आणि अन्य साहित्य ठेवण्यात आले. प्रत्येकाने पिस्तूल आणि मावझर स्वतःजवळ ठेवले. गाड्यात काही सैनिकांनाही बसविण्यात आले. अन्य सर्वजण विभागून पायी निघाले. गावातील पोलीस ठाण्यावर हल्ला करण्यासाठी नागनाथ परांजपे, भीमराव लहानकर, महादेवप्पा आणि अन्य १५ सैनिक, रेल्वे-स्थानकावर हल्ला करण्यासाठी बाबूराव कुंटूरकर, जगदीश, आणि शर्मासह १५ सैनिक आणि अनंत भालेराव, आबासाहेब लहानकर, किशोर शहाणे आणि उरलेले सैनिक यांनी बँकेवर हल्ला करावयाचा अशी व्यवस्थित योजना होती. 'उमरी' गावचे श्री. धनजीभाई पुरोहित यांनी हल्ल्यासाठी ३० जानेवारी १९४८ चा दिवस मुक्रर केला होता. हल्ला ठीक ४–३० वा. दुपारी करण्याचे निश्चित झाले होते. तिघा नायकांनी घड्याळे नीट लावून घेतली.

तीन गटात सैनिकांची विभागणी झाली. हल्ला दुपारी ४–३० वाजता करावयाचा होता. वेळ भरपूर होता. सैनिकांना एकेक क्षण म्हणजे–काळ पुढे सरकतच नव्हता का? सैनिकांना ॲक्शनची घाई झाली होती. हुतात्मा गोविंदराव पानसरे आणि हुतात्मा दत्ता उत्तरवार यांच्या खुनाचा त्यांना बदला घ्यावयाचा होता. त्यांचे कोंडलवाडी आणि उमरी मोंढ्यात सांडलेले रक्त वाया जाऊ द्यायचे नव्हते, त्यापासून स्फूर्ती घेतलेले हे तरुण सैनिक अत्यंत अवघड अशा मोहिमेवर निघालेले. निझामाची सत्ता खिळखिळी करावयाला, तिला प्रचंड हादरा द्यावयाला–नव्हे तिला कायम गारद करावयाला. तीनही नायकांनी परस्परांस शुभेच्छा दिल्या आणि आपापल्या सैनिकांसह ते लक्ष्याकडे निघाले.

स्टेशन, मोंढा आणि गावात विभागलेले सैनिक गेले. साधारणतः आठ–साडेआठ वाजता ते आपापल्या स्थानावर पोचले. पण ४–३० पर्यंत वेळ घालवावयाचा कसा? गुप्तता पाळणे तर अत्यंत आवश्यक होते. एकमेकास ओळख देणेही हितावह नव्हते. वेळ काढण्यासाठी काहीजण इकडेतिकडे पांगले.

चार वाजले. पांगलेले सैनिक भराभर परतले. सायंकाळ होताच घरट्याकडे पाखरे परततात तसे. सर्वांना सूचना मिळालेली होतीच. घड्याळाचा काटा पुढे पुढे सरकत होता.

उमरी बँकेची इमारत खाजगी आणि दुमजली होती. मोंढ्याच्या दक्षिणेस टोकाला ही इमारत होती. त्या इमारतीसमोरच सैनिकांनी आपल्या गाड्या सोडल्या होत्या. हल्ल्याची वेळ जवळजवळ येत होती, परंतु बँकेवरील ॲक्शनसाठी नियुक्त सैनिक अजून परतले नव्हते. उपस्थित सैनिक आपल्या घड्याळाकडे पहात होते. ४–२०, ४–२५ आणि ४–३०. वेळ झाली. अनंतराव, आबासाहेब, बन्सीलाल, साहेबराव आणि किशोर यांनी परस्परात विचारविनिमय चालवला. एवढ्या सैनिकांनीच हल्ला करावयाचा का? तेवढ्यात येसकराच्या पोशाखातील काशीनाथ शेट्टी धावत पळत आला आणि त्याने नागनाथ परांजपे आणि त्याच्या सैनिकांनी पोलीस ठाण्यावर ताबा मिळविल्याची आनंददायक वार्ता सांगितली. त्याच्याकडून ही बातमी मिळताच या सर्वांनी गाडीतून शस्त्रे काढली आणि हल्ला पुकारला. अनंतराव आणि आबासाहेब बँकेत घुसले. 'हँडस् अप. किल्ल्या आमच्या स्वाधीन करा. आम्ही काँग्रेसचे स्वयंसेवक आहोत.' अनंतरावांनी दरडावून सांगितले. कॅशियर टंगळमंगळ करतो आहे असे दिसताच आबासाहेबांनी गोळी झाडली. गोळी कॅशियरच्या पोटात शिरली. बँकेच्या रक्षणार्थ ठेवलेल्या अरबांपैकी एक समोर आला. 'या अल्ला' असा उद्गार काढून तो खाली कोसळला. इकडे आत असा गोंधळ चालू होता तर बाहेर बॅडमिंटन खेळण्याच्या तयारीत घरातून बाहेर पडणाऱ्या मॅनेजरास, आवाराचा ताबा घेतलेल्या, साहेबराव आणि किशोर यांनी ताब्यात घेतले. त्याला बँकेत आणण्यात आले. कॅशियरकडच्या किल्ल्या मिळाल्या होत्या. परंतु कोणत्या आलमारीत पैसा आहे याची कल्पना नव्हती. मॅनेजर पकडला गेल्यामुळे काम सोपे झाले.

मॅनेजरने बँकेवर हल्ला झाल्याचे जाणले. तो आलमाऱ्या उघडण्यास काकू करू लागला. 'उमरी' या गावातील रघुनाथ नावाचा एक अल्पवयीन छोकरा बँकेत या सर्वांबरोबर होता. त्याने मॅनेजरला गचांडी दिली. अन्य सैनिकांनी दोन–चार लाथा

आणि पाच–सहा गुद्दे लगावले. तेव्हा गृहस्थ वठणीवर आला.

मॅनेजर एकेक आलमारी उघडू लागला. पैशांनी खचाखच भरलेल्या त्या आलमाऱ्या, सैनिकांचे तर डोळेच फिरले. क्षणभर ते भानच विसरले. इतका पैसा त्यांनी यापूर्वी पाहिलाच नव्हता. बाहेर काढलेल्या नोटा पोत्यातून भरण्याचे काम सुरू झाले. मॅनेजर आलमाऱ्या उघडत होता. सैनिक ती आलमारी पोत्यात रिकामी करीत होते. रघुनाथ बँकेत इकडेतिकडे भटकत होता. त्याच्या काहीतरी लक्षात आले.त्या मुलाने सैनिकांना म्हटले, ' किती आलमाऱ्या रिकाम्या केल्या? ' तीन ' सैनिक उत्तरले. ' या गतीने सर्व रक्कम भरायला किती वेळ लागेल ? हा मॅनेजर बदमाश आहे. वेळ काढतो आहे. पोलीस येतील म्हणून वाट पहातो आहे. शिवाय एक गोष्ट लक्षात आली का– ?' त्याने विचारले. सैनिक एकमेकाच्या चेहऱ्याकडे पाहू लागले. कोणती गोष्ट ? आपल्या लक्षात आली नाही अशी कोणती गोष्ट या चिमुरड्याने हेरली. त्यांच्या काही लक्षातच येईना. त्यांनी मुलाला विजारले, ' कोणती गोष्ट बाळ ?' ' नाही लक्षात आली ?' त्याने आश्चर्याने विचारले. नोटा भरण्याचे काम चालू होते. कोणती बाब नजरेतून सुटली ? सैनिक अस्वस्थ झाले. तेव्हा रघुनाथने म्हटले, ' हा बदमाश मॅनेजर एक–एक रुपयाच्या नोटा असलेल्याच आलमाऱ्या उघडतो आहे. जास्त पैसा तुमच्या हाती लागू नये आणि वेळही काढता यावा असा दुहेरी उद्देश आहे त्याचा.' सैनिकांच्या डोळ्यासमोर काजवे चमकले, लख्ख प्रकाश पडला. जे थोरामोठ्यांच्या लक्षात आले नाही ते त्या चुणचुणीत पोराच्या लक्षात आले. तो समोर आला आणि त्याने मॅनेजरच्या कानशिलात एक सणसणीत चपराक ठेवून दिली. त्याला अनंतरावसमोर उभे केले. ' मोठ्या नोटा असलेल्या आलमाऱ्या उघडतोस का दाखवू तुला इंगा ?' असा धाक घातला. मॅनेजरने चौफेर नजर फिरवली. सैनिकांचे डोळे त्याने पाहिले. त्याची पाचावर धारण बसली. तो गयावया करू लागला. आपणही देशभक्त आहोत, काँग्रेसी आहोत असे परोपरीने सांगितले. पायावर लोळण घेतली. रघुनाथने त्याला उभे केले आणि मोठ्या नोटांच्या आलमाऱ्या उघडण्यास भाग पाडले. मॅनेजरला सैनिकांच्या रूपात साक्षात मृत्यू दिसत होता. तो पुरा गार पडला होता. पोती भरण्याचे काम झपाटयाने होत होते. एक–दोन–तीन. पोते भरावयाचे, बाजुला सारायचे, दुसरे भरायचे. यंत्रवत काम चालू होते. सर्वजण नोटा भरण्यात, पोते बाजूला सारण्यात, मॅनेजरवर लक्ष ठेवण्यात गर्क होते. भोवतालच्या जगाचा त्यांना विसर पडला होता. एकाग्र चित्ताने त्यांचे काम चालू होते आणि मृत्यू इकडे त्यांच्यापासून काही अंतरावर येऊन उभा राहिला होता. या सर्व सैनिकांना अशा रीतीने कामात मग्न असलेले पाहून पहाऱ्याच्या खोलीतील दोन अरबांनी हिंमत केली आणि बंदुका घेऊन हल्ला करण्याच्या पवित्र्यात ते उभे राहिले. एकच क्षण–पण अत्यंत महत्त्वाचा. बन्सीलालचे लक्ष नेमके याच वेळी त्यांच्याकडे गेले. त्याने स्टेशनगनचे तोंड अरबांकडे केले. साहेबरावांनी शस्त्र चालविले. दोन्ही अरब अल्लाच्या भेटीला गेले. त्यांना बंदूक चालविण्यासही संधी मिळाली नाही. सैनिक आले म्हणून टेबलाखाली आश्रय घेतलेला बँकेचा चपराशीही या गोळीबारात ठार झाला.

बँकेवर आता स्वातंत्र्यसैनिकांचा ताब होता. बाहेरच्या सैनिकांनी चौफेर वाटा रोखल्या होत्या. दारूगोळ्याचा पाऊस पडत होता. कानठळ्या बसविणारा आवाज थरकाप उडवून देत होता. उमरी गाव महत्त्वाची बाजारपेठ होती. रझाकारांची संख्याही भरपूर होती. प्रतिकार होईल, प्रचंड लढा द्यावा लागेल असे वाटले होते. परंतु विभागलेल्या सैनिकांनी आपापल्या क्षेत्रात रझाकारांची चांगलीच लांडगेतोड केली होती.

बँकेतील सैनिकांना वेळ का लागतो आहे हे पहाण्यासाठी धनजीभाई स्वतः आले. त्यांनी पैसे भरण्यासाठी पोती मागवली. पोती भराभर भरली जाऊ लागली. पाच, सहा, सात. पोती भरण्याचे काम चालूच होते. सोळा, सतरा, अठरा– सर्व पैसा पोत्यांत एकत्रित करण्यात आला. पोती शिवण्यात आली. बँकेतले काम झाले होते. आता बाहेर पडावयाचे होते. तोच बँकेच्यावर जाऊन बसलेल्या एका अरबास हुक्की आली. त्याने गोळी चालवली. सुदैवाने ती कोणाला लागली नाही. मग काय ? त्याच्यावर गोळ्यांचा वर्षाव करण्यात आला. ' या अल्ला, या अल्ला ' असा आवाज करीत तो वरवंडीबरोबर खाली कोसळला.



अपूर्व सवलत !

अर्थात् सिंगर कडूनच

# किंमत ३ महिन्यात द्या आणि आजच आपलं मेरिट* शिलाई यंत्र घ्या

## विशेष म्हणजे, लिस्ट प्राइसवर एकहि पैसा अधिक न देता.





"खरोखरच आश्चर्यकारक"

आता सिंगर आपणास एक अपूर्व सवलत देत आहे. हप्तेबंदीने खरेदी, पण जादा किंमत मात्र नाही.

"अय्या, किती किती बचत !"

किंमत तीन महिन्यात सवलतीने दिल्याने आपली किती बचत होते पहा. आपणास लिस्ट प्राइसवर एकहि पैसा अधिक द्यावा लागत नाही. शिवाय आपला पैसा किती झटपट वसूल होतो ते पाहिल्यावर आपले आपल्यालाच आश्चर्य वाटेल. आणि त्यानंतरची सगळी बचतच बचत !





"एकहि जादा पैसा द्यायला नको !"

साधारणपणे हप्तेबंदीने खरेदी करताना थोडी जादा किंमत पडते. माहीत आहे कां ? कंपनी आपणास जी सवलत देते त्याचा तो मोबदला असतो. आणि तो योग्यहि असतो. कारण आपण इकडे मेरिट शिलाई यंत्राचे हप्ते भरता, तर तिकडे आपली बचतहि होत असते ! (शिलाईचा खर्च वाचतो.)

"इतकी नामी योजना फार दिवस राहाणार नाही"

खरोखरच नामी ! अशी अपूर्व सवलत थोडया काळाकरितासुद्धा फक्त सिंगरच देऊ शकतात. तर विलंब नको. या सवलतीचा फायदा अवश्य घ्या. अशी संधि भाग्यानेच मिळते. आपल्या नजीकच्या सिंगर दुकानास अगर विक्रेत्याला भेट द्या.

सर्व जगाला ठाऊक आहे की, शिवणकलेचे पहिले शिक्षक, आम्ही.



## सिंगर

सिंगर सोइंग मशिन कं. २०७, डी. एन. रोड, मुंबई ४०० ००१.

* सिंगर कंपनीचा ट्रेडमार्क.

CHAITRA-SM-79-MAR

पोत्यात पैसे भरण्याचे काम साधारणतः अडीच तास चालले. सात वाजले होते. लक्षावधी रुपयांची लूट (!) पोत्यात बंद झाली होती. खुर्दा होता तो रघुनाथने 'हुतात्मा पानसरे की जय', 'स्वामीजी की जय', 'स्टेट कॉंग्रेस झिंदाबाद' आदि घोषणा देत मोंढयात उधळला. बँकेची मोहीम यशस्वी झाली होती. पोलीस ठाणे आणि रेल्वे स्टेशन इकडे गेलेल्या सैनिकांनी आपली कामगिरी चोख बजावली होती. ते या लोकांच्या निरोपाची वाट पहात होते. सैनिक बँकेबाहेर आले. गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांना या भीमपराक्रमाबद्दल आनंद झाला. पानसरे आणि उत्तरवार यांच्या निर्घृण हत्येचा पुरेपूर सूड उगविला गेला. गावात अनेक रझाकार होते. परंतु हिंदूंतील भूतदया जागी झाली. अत्याचारी रझाकार सहीसलामत राहिले.

आठ–साडेआठ वाजले. परतण्याची घाई सुरू झाली. गाड्यातून पोती रचण्यात आली. सैनिकांचा आवेश, उत्साह दांडगा होता. सारे वातावरण विजयाने, प्रसन्नतेने भारलेले होते. ठाण्याकडे व स्थानकाकडे निरोप पाठविण्यात आला. सर्व आले. गावकऱ्यांनी मिरवणूक काढली. गुलाल उधळला. हाराफुलांचा, गुलालाचा सडा धरणीमातेला घातला गेला. सर्वांनी आपापली शस्त्रे हातावेगळी केली. अन्य पंधरा गाड्या मिळविण्यात आल्या. पैशाच्या रक्षणार्थ शस्त्रसज्ज सैनिक गाडीत बसले. गाड्या भरधाव पिटाळण्यात आल्या.

रस्त्यात स्टेशन आणि ठाण्याकडे गेलेल्या सैनिकांकडून कामगिरीचे रसभरीत वर्णन केले गेले. नागनाथ परांजपे यांनी आपल्या साथीदारासह अवघ्या दोन-तीन मिनिटात पोलीस ठाणे कसे ताब्यात घेतले हे सांगितले. रेल्वे स्टेशनकडे गेलेल्या सैनिकांकडे महत्त्वाची कामगिरी होती. तारा तोडणे, फोन आणि संदेशवाहक नादुरुस्त करणे, तोडणे, स्टेशनमास्तरकडची शिल्लक घेणे इत्यादी. तेथे झालेल्या गमतीचे वर्णन ऐकून सैनिकांना हसू फुटत होते. सर्वांच्या चेहऱ्यावर तजेला होता. थकव्याचे नाव नव्हते. विजयाचे आगळे वातावरण थुई थुई नाचत होते.

स्टेशनवर हल्ला झाल्याचा गवगवा होताच रझाकार आणि हमाल स्टेशनवर चाल करून आले. काही रझाकार पडले. एक अरब झाडावर चढून बंदूक सावरून काफिरांचा घास घेण्यासाठी टपून बसला होता. सावध असलेल्या जगदीशने त्याला अचूक टिपले. हल्ला करावयास येणाऱ्या रझाकारावर बॉम्ब फेकण्यात आला. प्रचंड आवाज झाला. भेदरलेले रझाकार चौखूर उधळले. बेदरकार सैनिक निर्भयतेने आपली भूमिका वठवत होते. त्यांना भूतकाळाची आठवण नव्हती आणि भविष्यकाळाची ओढ नव्हती. आपल्या भूमीला मुक्त करण्यासाठी जिवाची बाजी लावण्यास ते सिद्ध होते. आणि म्हणूनच मृत्यूच्या छायेतही पाय रोवून स्थिर उभे होते. याच्या उलट रझाकार भाडोत्री होते. आणि म्हणूनच समोरचा शत्रू मातब्बर दिसताच त्यांनी पळ काढला होता.

धावत्या गाड्यांचा आवाज होत होता. हसण्या–बोलण्याचा आवाजही 'टीपेत' चालला होता. धुराळा मागेमागे जात होता आणि समोरची वाट दोन हात पसरून स्वागत करीत होती. मैलांमागून मैल मागे पडत होते. वाटेत लागलेल्या गावातील लोकांनी केलेल्या स्वागताने हे सैनिक आनंदून गेले होते.

बघता बघता पहाट झाली. क्षितिजाच्या पलीकडून सूर्यनारायणाने लाल–पिवळ्या सोनेरी रंगसंपत्तीची पृथ्वीवर उधळण केली. पैनगंगा नदीशी गाड्या आल्या. सैनिक खाली उतरले. गाड्या बघून गावकरी नदीकडे धावले. कालचा म्हातारा आजही उपस्थित होता. आनंदाने त्याचा चेहरा फुलला होता. गावकऱ्यांनी सैनिकांना यशवंत होऊन आल्याबद्दल जेवण दिले. केवढा जिव्हाळा, केवढी उत्कट भक्ती, केवढा अभिमान दाटून आला होता. जेवण करून सैनिक उमरखेडकडे निघाले. उमरखेडला कधी एकदा पोचतो आणि पराक्रमाचे इतिवृत्त केव्हा एकदा सांगतो असे सैनिकांना झाले होते. परंतु वाटेतच महात्मा गांधीजींचा खून झाल्याचे त्यांना कळाले. धक्का बसला. आनंदावर विरजण पडले मन निराश झाले. वातावरण उदास झाले.

सैनिक उमरखेडला आले. तेथून जीपमधून सर्व पैसा पुसदला नेण्यात आला. तेथे पैसे मोजण्यात आले. गोदाजीराव मुखरे या सद्गृहस्थांच्या गाडीतून रक्कम पुण्याला नेण्यात आली. कृतिसमितीच्या हवाली रक्कम करीत असता १६२ रुपये कमी भरले. गोदाजीरावांनी १६२ रु. ची जबाबदारी स्वीकारून तेवढे रुपये भरण्याची तयारी दर्शविली. परंतु सर्वांनी त्यांना नम्रपणे नकार दिला.

बँकेतून लुटलेली रक्कम तेव्हाच्या शिक्क्यात २० लक्ष ६३ हजार सातशे एकोणीस रुपये पंधरा आणे होती. या पैशाचा विनियोग ज्या कामासाठी करण्यात आला त्याचे पद्धतशीर हिशेबही ठेवण्यात आले. एवढेच नव्हे तर पैशाचे हिशेब पुण्याचे ऑडिटर श्री. एल. एम. जोशी आणि कंपनी, चार्टर्ड अकौंटन्ट (४८ बुधवार पेठ) पुणे यांनी प्रमाणितही केले आहेत. सरदार वल्लभभाई पटेल यांनी अ. भा. कॉंग्रेस वर्किंग कमिटीचे सदस्य श्री. शंकरराव देव यांना हिशोब डोळ्याखालून घालून अभिप्राय देण्यास सांगितले होते. लुटलेल्या पैशाचा कोणालाच मोह नव्हता. त्या धामधुमीच्या परिस्थितीतही व्यवस्थित हिशेब ठेवण्यात आले. श्री. शंकरराव देव यांनी हिशेब नजरेखालून घालून समाधान व्यक्त केले. एवढेच नव्हे तर कार्यकर्त्यांचे प्रामाणिकपणाबद्दल अभिनंदनही केले.

उमरी बँक प्रकरण हे हैदराबाद मुक्तिलढ्यातील एक अपूर्व पर्व आहे. उत्कट देशभक्ती, अतुल पराक्रम, अविचल ध्येयासक्ती, अजोड प्रामाणिकपणा, अचूक योजना आणि असाधारण साहस यातून साकारलेले एक सुवर्णपान आहे. आपल्या निर्मोही गुणांनी सैनिकांनी एक आगळा आदर्श आपल्यासमोर उभा केला आहे. त्यांचे जेवढे गुणगान करावे तेवढे थोडेच. गुणगान करण्यामागे केवळ एकच भावना. या ज्योतीपासून अनेकांनी स्फूर्ती घ्यावी आणि आगामी भारतासाठी निरपेक्ष सैनिक–नागरिक तयार व्हावेत हीच उत्कट इच्छा.

**'एक दीप दुसऱ्यास जागवी**
**ऐसे अगणित होती**
**जागृत हा राष्ट्रास जागवी**
**देऊनी जीवनस्फूर्ती**
**हा एकच नंदादीप**
**पण दीपमाळ करणार**
**हा अखंड नंदादीप**
**जळणार सतत जळणार.'**

□ □

# प्रकरण पाच : मुक्काम-पोस्ट त्रिनिनाद

भरतीचा जोर सहा तास टिकणार होता. त्यानंतरही ओहोटी सुरू होण्याची वाट बघत दीड तास थांबावं लागणार होत. तेव्हा निदान सात तास झोप घ्यायला हरकत नव्हती. मी जवळजवळ पेंगतच होतो. आत्ताच काय ती झोप घ्यावी. एकदा का समुद्रात शिरलं की मग केव्हा पडायला अवसर मिळेल कोणी सांगावं ! मी डोलकाठी आणि बॅरलच्यामध्ये ताणून दिली. मॅच्युरेटनं माझ्या बैठकीची जागा आणि बॅरल यांच्या दरम्यान ब्लॅंकेट अंथरलं. त्यामुळे आडोसा तयार झाला. त्या निवाऱ्यात मी झोप झोप झोपलो. स्वप्न, पाऊस, ती अवघडलेली स्थिती–यापैकी कशामुळेही झोपेत खंड पडला नाही. प्रदीर्घ झोप.

शेवटी मॅच्युरेटनं जोरजोरात हलवून मला जागं केलं. 'पपी, मला वाटतं वेळ झाली आहे. ओहोटी सुरू होऊन बराच वेळ झालाय्.'

आम्ही नौका समुद्राच्या दिशेला वळवली. पाऊस थांबला होता. चंद्राचा स्वच्छ प्रकाश पडला होता. त्यामुळे आमच्या पुढे शंभर यार्डांवरून नदीतून वाहत जाणारी झाडं, वनस्पती आणि इतर वस्तू दिसत होत्या. नदी आणि समुद्र नक्की कुठे मिळाले असावेत हे शोधण्याचा मी खूप प्रयत्न केला. वाऱ्याचा पत्ता नव्हता. झुडुपातून आम्ही नौका पुढे ढकलली. आकाशाकडे पाहून मी अंदाजानं नदी आणि समुद्राची हद्द ठरवली. आम्हाला वाटलं होतं त्यापेक्षा बरंच अंतर काटावं लागणार होतं; नदीच्या मुखापासून आम्ही साधारण सहा मैलावर होता. सर्वांनी थोडी थोडी रम घेतली. डोलकाठी आताच चढवावी का ? बाकीच्या दोघांनी संमती दिली. मग आम्ही ती भक्कमपणे उभी केली. मी शीड न उलगडता उचललं आणि ते डोलकाठीवर घट्ट धरून ठेवलं. मी सांगितल्यावर मॅच्युरेट शिडाचा दोर हातात घेऊन तयार झाला. डोलकाठीच्या ओळीतून दोर हळू-



हळू सेल सोडल्यावर शीड हवेनं फुगणार होतं. माझ्या जागेवरूनच तसं करणं शक्य होतं. मॅच्युरेट नौकेच्या पुढच्या बाजूस वल्हं घेऊन बसला आणि मी मागे तयारीत होतोच. आम्हाला सर्व शक्तीनिशी आणि वेगानं हालचाल करणं जरूरीचं होतं, कारण प्रवाह नौकेला किनाऱ्याकडे ढकलीत होता.

‘हुश्शार ! देवाचं नाव घेऊन सुरुवात करू या.’

‘ईश्वर आपल्याला मदत करो.’ जोन्स म्हणाला.

‘आता तुझ्याच हाती आमचं सर्वस्व !’ मॅच्युरेट म्हणाला.

आणि आम्ही हात मारायला सुरुवात केली. मी वल्हं पाण्यात खोल बुडवून जोरात ओढीत होतो. मॅच्युरेटही तसंच करीत होता. बघता बघता आम्ही मार्गाला लागलो. ओहोटीच्या साथीमुळे आम्ही चांगलं शंभर यार्ड अंतर कापलं. आता किनारा बराच दूर गेला होता. एकदमच वाऱ्याची झुळूक सुरू झाली आणि तिच्यामुळे नौका नदीच्या मधोमध जाऊ लागली.

‘दोर सोडा—एकदम जलदी.’ त्यांनी दोर सोडल्यावर नौका तुफान वेगात जाऊ लागली. आम्ही ठरवलं होतं त्यापेक्षा थोडा उशीर झाला असावा. कारण नदी अगदी शांत होती. उजेड पडायला सुरुवात झाली होती. आमच्या उजव्या बाजूला सुमारे एक मैलावर फ्रेंच किनारा स्पष्ट दिसत होता. डावीकडे तर अर्ध्या मैलावर डच किनारा होता. समोर उसळत्या समुद्राच्या फेसाळणाऱ्या लाटा.

‘माय गॉड; आपली वेळ चुकली,’ जोन्स म्हणाला, ‘आपल्याला समुद्रात शिरायला बराच त्रास होणार नाही ? तुला काय वाटतं ?’

‘कुणास ठाऊक.’

‘पहा त्या लाटा किती उंच आहेत, आणि कशा फुटताहेत ! पुन्हा भरती सुरू झाली का ?’

‘अशक्य. मला खाली जाणाऱ्या कितीतरी गोष्टी दिसत आहेत.’

‘तमल्या लाटांमधून पार होणं कठीण दिसतंय. आपण तिथे वेळात पोचणार नाही.’ मॅच्युरेट म्हणाला.

‘तू आधी वटवट बंद कर पाहू. मुकाट्यानं सांगितल्या जागी बस. जोन्स, तू सुद्धा गप्प राहा.’

बँग, बँग. गोळ्या झाडल्याचा आवाज येऊ लागला. मी नीट पाहिलं. पहारेकरी नक्कीच नव्हते. फैरी डच बाजूनं येत होत्या. मी मुख्य शीड उभारलं. त्यात वारं इतकं जोरात शिरलं की माझ्या मनगटाजवळच्या थडथडणाऱ्या भागामुळे मी जवळजवळ पाण्यात फेकला जात होतो. नौका अंदाजे पंचेचाळीस अंशात वळली. पुन्हा फैरींचा आवाज आला आणि बंद झाला. बस्स् ! आम्ही फ्रेंच बाजूला वळलो होतो, म्हणूनच डच बंदुका गप्प झाल्या.

फ्रेंच किनाऱ्यावर धावपळ होत असलेली दिसत होती. मी सर्व शक्तीनिशी शिडाचा दोर ताणून धरला. नौका वळू लागली. अखेर आम्ही त्यात सफल झालो. धोका टळला ! सुमारे दहा मिनिटानंतर

# पॅपिलॉन


मूळ लेखक : हेन्री शॅरियर

अनुवाद : रवींद्र गुर्जर


छोट्या बेटावर पॅपिलॉन आणि त्याच्या दोन सहकाऱ्यांनी आश्रय घेतला. त्यांनी पैदा केलेल्या होडीतून समुद्रप्रवास करणं अशक्यच होतं. योगायोगानं ब्रेटन नावाच्या माणसाची आणि त्यांची गाठ पडली. त्याच्या सल्ल्यावरून चांगल्या होडीसाठी तिघेजण महारोग्यांच्या पिजन बेटावर जाऊन थडकले. तिथे त्यांना अनपेक्षित माणुसकीचा ओलावा अनुभवायला मिळाला. चांगली नौका तर मिळालीच. एका अनुभवी महारोग्याकडून प्रवासाचं मार्गदर्शनही लाभलं. आवश्यक वस्तूंचा साठा घेऊन पॅपिलॉनच्या नव्या साहसाला आरंभ झाला. त्यानं नौका पाण्यात लोटली....

समुद्राच्या एका लाटेनं आम्हाला थोपवण्याचा प्रयत्न केला, पण आमची नौका अगदी सहजपणे त्यावर स्वार झाली. लाटा उंचच उंच होत्या पण पुढे जाण्यात आम्हाला काहीच अडचण आली नाही.

थप्–थप्–थप्. नौकेचं वरखाली चालू होतं, पण न डगमगता, अगदी सहज. फक्त खाली येताना नौकेच्या कडेवर पाणी जोरात आपटल्याचा आवाज येत होता.

'हुर्रे, हुर्रे ! आपण सटकलो !' जोन्सनं जोरात आरोळी ठोकली.

आम्हाला जणू अभिवादन करण्यासाठी लगेच सूर्योदय झाला. आमचा विजय होताच तशा विशेष लाटा आता ठराविक लयीत येत होत्या. आम्ही जसजसे पुढे जात होतो, तशी लाटांची उंची कमी कमी होऊ लागली. पाणी मात्र गढूळ होतं–चिखलमिश्रित गढूळ. उत्तरेकडे काळसर रंग दिसत होता, पण नंतर त्याचं निळ्यात रूपांतर झालं. होकायंत्राकडे लक्ष ठेवण्याची काहीच आवश्यकता नव्हती, सूर्यामुळे दिशा कळत होती. मी नौका सरळ हाकीत होतो. प्रवास सुखात चालू होता. महान साहसाला आरंभ झाला होता.

जोन्स उठला. त्याला बाहेर नीट बघायचं होतं. मॅच्युरेटनं त्याला हात देऊन माझ्यासमोर बसवलं. त्यानं माझ्याकडे एक सिगारेट सरकवली. आम्ही तिघांनी धूम्रपान सुरू केलं. पुन्हा मद्य घेण्याची आम्हाला हुक्की आली. वातावरणच तसं होतं. मॅच्युरेटनं तीन पेले भरले आणि आम्ही एकमेकांना 'चियर्स' केलं. आम्ही एकमेकाकडे पुन्हा पुन्हा बघत होतो. त्या दोघांचे चेहरे आनंदाने उजळून निघाले होते, माझीही तीच स्थिती असणार. थोड्या वेळानं जोन्स मला म्हणाला, 'कॅप्टन, सर, आपण कोणीकडे निघालो आहोत हे कृपया सांगाल काय ?'

'कोलंबिया. जर ईश्वराची तशी इच्छा असेल तर.'

'मुळीच काळजी करू नकोस. देव जागा आहे.' जोन्स म्हणाला.

सूर्य झरझर वर आला आणि आमचे कपडे लवकरच सुकून गेले हॉस्पिटलचा शर्ट मी डोक्यावर फेटचासारखा गुंडाळला. तो भिजवून घेतल्यामुळे मी सनस्ट्रोकपासून सुरक्षित होतो. समुद्राच्या निळ्या लाटा चमकत होत्या; दहा फूट उंचीच्या त्या लाटा दूरवर पसरत होत्या. त्यामुळे प्रवास खूपच आरामात चालू होता. वारा अद्यापही जोरात वाहत होता. वरचेवर मी मागे पाहत होतो. दूर क्षितिजावर किनारा दिसेनासा होत होता. माझ्या दोन मित्रांच्या आयुष्याची जोखीम माझ्यावर होती, अर्थातच माझ्याही आयुष्याची सुद्धा. ही जाणीव होऊन मी काहीसा अस्वस्थ बनलो.

'मी थोडा भात शिजवतो.' मॅच्युरेट म्हणाला.

'मी स्टोव्ह घट्ट पकडतो आणि तू भांडं पकड.' जोन्स म्हणाला.

शिजवलेल्या भाताचा छान सुवास पसरला होता. आम्ही दोन डबे उघडले आणि त्यातील माशांची तयार भाजी भातात कालवून तो गरम गरम असतानाच खाल्ला. त्यानंतर झकास कॉफी करून घेतली. 'थोडी रम् ?' मी नको म्हणालो. एक तर उकाडा खूप होता. आणि मला पिण्याची फारशी सवय नव्हती. मात्र एकामागून एक सिगारेट्स मात्र मी ओढल्या. प्रवासातील पहिलं जेवण तर अशा रीतीनं उत्कृष्ट झालं. सकाळचे दहा वाजले असतील. सूर्याच्या स्थितीवरून वेळेचा अंदाज करता येतो. समुद्रात शिरून फक्त पाच तास झाले होते तरीही खाली पाणी बरंच खोल असल्याचं जाणव लागलं होतं. लाटा आता फार उंच जात नव्हत्या आणि आम्ही संथपणे पुढे जात होतो. हवा खरोखरच सुंदर पडली होती. दिवसा होकायंत्राची गरज सारखी पडणार नाही हे एव्हाना लक्षात आलं होतं. सूर्य आणि होकायंत्राची सुई यांची स्थिती लक्षात घेऊन मी नौका हाकत होतो– ते अगदी सोपं होतं. तळपत्या उन्हामुळे माझे डोळे अगदी थकून गेले; गॉगल पैदा करण्याचा विचार आपल्याला कसा काय सुचला नाही कोण जाणे !

जोन्स मध्येच म्हणाला, 'मी किती भाग्यवान आहे नाही ? त्यामुळेच तुझी हॉस्पिटलमध्ये गाठ पडली.'

'तेव्हा माझंही नशीब जोरात होतं– फक्त तुझंच नाही काही.' मला देगा आणि फर्नांडिस आठवले... त्यांनी हो म्हटलं असतं तर आज तेही इथे हजर राहते.

'ते काही खरं नाही,' जोन्स म्हणाला, 'फक्त तुला त्या अरबाला योग्य वेळी वॉर्डमध्ये आणण्याचं काम युक्तीनं करावं लागलं असतं.'

'हो बाबा, मॅच्युरेटची आपल्याला खूपच मदत झाली. त्याला आपल्या बरोबर घेता आल्यामुळे मला खरंच खूप आनंद होतोय्. तो अगदी विश्वासू आहे, शूर आणि हुशारही आहे.'

'मनःपूर्वक आभार.' मॅच्युरेट म्हणाला, 'मी कसा आहे हे तुम्हाला ठाऊक आहेच. शिवाय ही लहान असूनही तुम्ही दोघांनी माझ्यावर जो विश्वास दाखवला त्याबद्दल मी ऋणी आहे. तुम्हाला खाली पहावं लागेल असं कोणतंही काम मी यापुढे करणार नाही.'

थोड्या वेळानं मी म्हणालो, 'सिएरा आणि गालगानीला बरोबर घ्यावं असं माझ्या फार मनात होतं...'

'पॅपिलॉन, त्याला आपला काही इलाज नाही. जीझस जर आपल्याशी प्रामाणिकपणे वागला असता, तर त्या दोघांची वाट पाहत झाडीमध्ये थांबलो सुद्धा असतो. जीझसनंच त्यांना आणण्याचं काम केलं असतं. असो. ते तुला चांगलं ओळखतात. सर्वस्वी अशक्य होतं म्हणूनच तू त्यांना विचारू शकला नाहीस हे ते नक्कीच जाणून असणार.'

'आम्ही बोलत होतो आणि मनापासून हसत होतो. मी म्हणालो, कोणी सांगावं, आपली आणि ठोसेबहाद्दर ज्यूलटची गाठ पडेल सुद्धा. तो जर झाडीमध्येच छपून राहिला नसेल तर एव्हाना खूप दूर गेला असेल.'

जोन्स म्हणाला, 'जेव्हा मी हॉस्पिटलमधून निघालो, तेव्हा उशीखाली एक चिठ्ठी ठेवली. त्यावर लिहिलं होतं, 'पत्ता न ठेवता जात आहे...' त्यावर आम्ही प्रचंड हसलो.

पहिल्या पाच दिवसांच्या जलप्रवासात विशेष काहीच घडलं नाही. दिवसा सूर्याच्या पूर्व–पश्चिम मार्गामुळे मला दिशा समजत होत्या. रात्री मात्र होकायंत्र वापरावं लागे. सहाव्या दिवशी समुद्र एकाएकी शांत झाला होता. अतिश्रमामुळे मी अतिशय थकून गेलो होतो. रात्रीच्या वेळी मला जागं ठेवण्याचं काम मॅच्युरेट करीत असे. ओल्या कपड्यानं तो माझा चेहरा पुशीत राही. तरीही मला डुलकी लागायचीच. मग जोन्स मला सिगारेटचा चटका देई. समुद्र अगदी संथ झाल्यामुळे मी थोडी झोप घ्यायचं ठरवलं. आम्ही शीड गुंडाळलं आणि डोलकाठी उतरवली. नंतर मी नौकेच्या मध्यभागी

एखाद्या लाकडी ओंडक्यासारखा आडवा झालो. उन्हापासून संरक्षण मिळावं म्हणून शिडाचं कापडच तोंडावर पसरलं. झोप. प्रगाढ झोप.

मॅच्युरेटनं गदगदा हलवल्यावर मी जागा झालो. तो म्हणाला, 'आता मध्यान्ह झाली आहे. मी तुला अन्नासाठी उठवलं की वाऱ्याचा जोर वाढू लागला आहे; शिवाय समोर क्षितिजाकडून काळे ढग इकडे येताना दिसत आहे.' मी उठलो आणि पुन्हा आपली जागा पकडली. छोटं त्रिकोणी शीड आम्ही तसंच ठेवलं होतं, नौका जलद जाण्यासाठी तेवढं पुरेसं होतं. माझ्यामागे पूर्वेकडे सर्वत्र काळं दिसत होतं. वाऱ्याचा जोर हळूहळू वाढतच चालला होता. मी मुख्य शीड डोलकाठीभोवती काळजीपूर्वक गुंडाळलं. सर्वत्र घट्ट बांधाबांध केली. 'सांभाळून राहा, ही चक्क वादळाची चिन्हं आहेत.'

आमच्या अंगावर पाण्याचे जड थेंब पडू लागले. तो समोरचा काळा पट्टा तुफान वेगानं पुढे सरकत होता. पंधरा मिनिटांच्या आत क्षितिजापासून तो आमच्या डोक्यापर्यंत येऊन पोचला. वादळ इथपर्यंत येऊन पोचलंच. वारा घोंघावत वाहू लागला. जादू केल्याप्रमाणे समुद्र एकदम उसळ्या मारू लागला. लाटांचं तांडवनृत्य सुरू झालं. रविमहाराज केव्हाच अदृश्य झाले होते. पाऊस आम्हाला झोडपू लागला. आम्हाला काहीच दिसत नव्हतं. लाटा नौकेवर आदळल्यावर माझ्या तोंडावर पाण्याचे सपासप फटकारे बसत होते. अखेर वादळानं गाठलंच— माझ्या आयुष्यातलं पहिलं वादळ. निसर्गाच्या सर्व सामर्थ्यासह ते आलं— मेघगर्जना. विजांचा कडकडाट, पाऊस, लाटा, वाऱ्याचं घोंघावणं. आम्ही त्यात पुरते अडकलो.

नौका गवताच्या काडीसारखी वाहून जात होती. ती अविश्वसनीय इतक्या उंचीवर चढत होती आणि पुन्हा खाली इतकी खोलवर जात होती की, पुन्हा ती कधी वर येईल असं वाटतंच नव्हतं; पण पुढच्याच लाटेबरोबर पुन्हा वर येतच राहिली. आम्ही पार दिङ्मूढ होऊन गेलो. मी दोन्ही हातात सुकाणू घट्ट धरलं. एक नेहमीपेक्षा मोठी लाट येताना दिसल्यावर ते चालवावं असं मला वाटलं. खरं तर मी तेव्हा सुकाणू जरा जोरातच चालवलं, आणि नौकेत एकदम खूपच पाणी शिरलं. नौकेतील सर्व वस्तू तरंगू लागल्या. निदान तीन फूट पाणी तरी आत होतं. पुढची लाट आल्यावर फारसा विचार न करता मी नौकेला एका बाजूस धक्का दिला,— असं करणं फार धोक्याचं होतं— त्याबरोबर ती कलंडली; म्हणजे अगदी पालथी होण्याच्या बेतातच होती. त्याबरोबर आत शिरलेलं बरचसं पाणी बाहेर फेकलं गेलं.

'ब्रेव्हो!' जोन्स ओरडला. 'मानलं तुला पॅपिलॉन! तू खरंच तज्ज्ञ आहेस. अरे, तू नौका सरळ रिकामीच केलीस की!'

मी म्हणालो, 'तुला कळलं ना आता? मग बस् झालं!'

मला तितकासा अनुभव नसल्यामुळे आता आमच्यावर भर समुद्रात जलसमाधीची पाळी आली होती. पण हे त्यांच्या लक्षात आलं नाही. मी मात्र ठरवून टाकलं की आता तसल्या प्रचंड लाटांशी पुन्हा खेळायचं नाही. काळजी करत न बसता नौका जास्तीत जास्त स्थिर ठेवण्याचा प्रयत्न केला की झालं! मी लाटा तीन-चतुर्थांश अंगावर घेत होतो; नौका खाली जाताना काही न करता स्वस्थ बसत होतो. समुद्र जसा वाहून नेईल तसं जाणंच त्यातल्या त्यात सुरक्षित होतं. लवकरच माझ्या लक्षात आलं की हा मला लागलेला सर्वांत महत्त्वाचा शोध होता. मी त्यामुळे नव्वद टक्के धोका टाळला होता. पाऊस थांबला. वारा मात्र वेगानं चालू होता पण. आता मागेपुढे स्पष्ट दिसू लागलं होतं. मागचं आकाश स्वच्छ झालं होतं पण पुढे मात्र अद्याप काळंच दिसत होतं. आम्ही मधोमध तरंगत होतो.

पाचच्या सुमारास सर्व संपलं. सूर्य डोक्यावर नेहमीसारखा तळपू लागला. वारा मंदपणे वाहू लागला. समुद्र पूर्वस्थितीमध्ये खाली आला. मी मुख्य शीड उभारलं आणि आम्ही पुन्हा मार्ग आक्रमू लागलो. आम्ही आमच्या कर्तृत्वावर बेहद्द खूश झालो होतो. नौकेतील पाणी भांड्यानं बाहेर फेकू लागलो. नंतर ओली ब्लँकेट्स डोलकाठीवर वाळत टाकली. भात, शिजवलेलं पीठ, तेल आणि कॉफी—नंतर रमचा सुखद आस्वाद. सूर्यास्ताची वेळ झाली. निळ्या समुद्रावर पसरलेले रंग अविस्मरणीय होते—लालसर करड्या रंगाचं आकाश, अर्धवट बुडालेल्या सोन्याच्या गोळ्यापासून निघून दूरवर पोचणारे सुंदर पिवळे किरण आणि इतर मिश्र रंग; त्यातच काही पांढरे ढग. समुद्राच्या लाटा जशा उंचावत तशा निरनिराळ्या रंगछटा दिसू लागत. तळाशी निळ्या, मग हिरव्या, नंतर उंचावर लाल, गुलाबी किंवा पिवळ्या छटा; त्या त्या ठिकाणी जो रंग शिरेल त्यानुसार.

मला अतिशय शांत वाटू लागलं. माझा स्वतःवरचा विश्वास अनाठायी नव्हता हे ध्यानात आल्यावर समाधान वाटलं. आम्ही संकटातून सहीसलामत बाहेर पडलो होतो. हे वादळ माझ्या दृष्टीनं फार मोलाचं ठरलं. तशा परिस्थितीत नौकेवर कसा ताबा ठेवावा हे माझं मलाच शिकायला मिळालं. आता येणाऱ्या रात्रीकडे मी अगदी निश्चिंत मनानं पाहू शकत होतो.

'तुला एकंदरीत कळलं तर, की नौका कशी रिकामी करायची. काय जोन्स, कळलं ना? तू प्रत्यक्षच पाहिलं म्हणा!'

'तू जर तसं केलं नसतंस तर पुढच्या लाटेच्या तडाख्यात आपण समुद्राचा तळ गाठणारच होतो.'

'हे सर्व तुला नेव्हीत शिकायला मिळालं का?' मॅच्युरेटनं विचारलं.

'हो. नेव्हीमध्ये मिळालेल्या शिक्षणाचा उपयोग नाकारता येणार नाही.'

आमचा ठरलेला मार्ग किती बदलला होता हे कळणं कठीण होतं. त्या चार तासांत नौका खूपच भरकटली होती. दिशा सुधारून घेण्यासाठी मी नौका वायव्येकडे वळवली. मी फक्त तेवढंच करू शकत होतो. सूर्य समुद्रात दिसेनासा झाला. जाता जाता आकाशात जांभळ्या छटा मात्र ठेवून गेला. मग एकदम अंधार पडला.

**आम्ही संकटातून बाहेर पडलो होतो. हे वादळ फारच मोलाचं ठरलं.**

पुढचे सहा दिवस व्यवस्थित पार पडले. काळजी करण्यासारखं काहीच घडलं नाही. फक्त छोटचा वावटळी आणि पावसाच्या सरी येत होत्या.—पण तीन तासांच्या वर त्यातील एकही टिकली नाही. पहिल्या वादळाइतका बेफाट जोर कशातच नव्हता.

सकाळचे दहा वाजले. वाऱ्याचा मागमूसही नव्हता. सर्वत्र शांतता. मी जवळ जवळ चार तास झोप काढली. जेव्हा मी उठलो तेव्हा माझे ओठ जळजळू लागले होते, ओठाची नाजुक त्वचा जळून गेली होती. नाकाचं सालडंही सोललं गेलं होतं. माझा उजवा हात कामातून गेला होता. मॅच्युरेट आणि जोन्सची तीच स्थिती होती. दिवसातून दोन वेळा आम्ही त्यावर तेल चोळत होतो. पण त्याचा तितकासा उपयोग झाला नाही—कडक उन्हामुळे तेल लगेच उडून जात होतं.

सूर्याच्या कलण्यावरून दुपारचे दोन वाजले असावेत. मी खाऊन घेतलं. समुद्र शांत असल्याचं पाहून कॅनव्हासचं शीड आमच्या डोक्यावर छतासारखं उभं केलं. मॅच्युरेटनं जिथे भांडी धुतली, त्या जागी समुद्रात मासे गोळा झाले. मी चाकू हातात घेतला आणि मॅच्युरेटला तिथे थोडे तांदूळ फेकायला सांगितले—नाहीतरी नौकेत शिरलेल्या पाण्यामुळे ते आंबू लागले होतेच. लगेच पृष्ठभागावर सगळे मासे गोळा झाले; त्यातल्या एका माशाचं डोकं पाण्याबाहेर आलेलं दिसताच मी हातातला चाकू त्याच्यावर जोरात मारला. दुसऱ्या क्षणी तो पाण्यावर उपडा तरंगू लागला. त्याचं वजन वीस पौंड तरी असावं. आम्ही तो स्वच्छ करून खाऱ्या पाण्यात शिजवला आणि त्याचा फडशा पाडला.

आता आम्हाला समुद्रात अकरा दिवस झाले होते. एवढ्या दिवसांत खूप लांबवर फक्त एकच जहाज आम्हाला दिसलं होतं. मी चकित होऊन विचार करू लागलो की आपण कुठे येऊन पडलो आहोत? खूप दूर, इतकं निश्चित होतं; पण त्रिनिदाद किंवा इतर इंग्लिश बेटांच्या जवळपास किती आलो आहोत? हा विचार करतो न करतो, तोच दूर एक काळा ठिपका दिसू लागला. तो हळूहळू वाढू लागला. ते जहाज होतं का दूर समुद्रात मासे पकडण्यासाठी जाणारी बोट होती? आमचे अंदाज चुकले. ते आमच्या दिशेला येत नव्हतं. ते होतं जहाजच. आता आम्ही स्पष्ट पाहू शकत होतो, पण ते बाजूला जात होतं. तसं आमच्यातील अंतर कमी होत होतं, पण त्याच्या दिशेमुळे आम्ही अगदी जवळजवळ येणं शक्यच नव्हतं. वारा अजीबात नव्हता, त्यामुळे नौकेचा वेग फारच मंदावला होता. जहाजावरील कोणाचं आमच्याकडे लक्ष गेलं नसावं. अचानक सायरनचा आवाज ऐकू आला आणि नंतर तीन छोटचा शिट्ट्या. जहाजानं दिशा बदलली आणि ते सरळ आमच्या दिशेला येऊ लागलं.

'ते अगदी आपल्याजवळ येणार नाही अशी आशा करू या.' जोन्स म्हणाला.

'काळजीचं काही कारण नाही, त्याची गती अगदीच कमी आहे.'

ते टँकर जहाज होतं. जसजसं ते जवळ येऊ लागलं, तसतसे डेकवरचे लोक स्पष्टपणे दिसू लागले. खोल समुद्रात आमची नौका पाहून ते चकित झाले असावेत. हळूहळू ते जवळ आलं. काही अधिकारी आमच्या दृष्टीस पडले. नंतर पट्टयापट्टयांच्या कपड्यातील स्त्रिया आणि रंगीबेरंगी शर्ट घातलेले पुरुष. ते प्रवासी असावेत. टँकरवर प्रवासी—मला जरा विचित्र वाटलं. जवळ येताच कॅप्टन हात हलवून म्हणाला, 'तुम्ही कुणीकडून येत आहात?'

'फ्रेंच गियांना.'

'तुम्हाला फ्रेंच येतं का?' एका स्त्रीनं विचारलं.

'हाय मॅडम.'

'तुम्ही या भर समुद्रात काय करीत आहात?'

'वारा नेईल त्या दिशेला आम्ही जातोय.'

ती स्त्री कॅप्टनशी काहीतरी बोलली आणि नंतर आम्हाला म्हणाली, 'कॅप्टन तुम्हाला जहाजावर बोलावतोय. तो तुमची होडी डेकवर चढवून घेईल.'

'त्याला सांगा की आम्ही खूपच आभारी आहोत; पण आम्ही आमच्या नौकेमध्ये मजेत आहोत.'

'तुम्हाला मदत का नको आहे?'

'कारण आम्ही पळून आलो आहोत आणि आम्हाला तुमच्या दिशेला जायचं नाही.'

'मग तुम्ही कुठे निघाला आहात?'

'मार्टिनिक् किंवा त्याच्याही पुढे. सध्या आम्ही कोठे आहोत?'

'महासागरात खूप दूरवर.'

'वेस्ट इंडिजला जाण्याची दिशा कोणती?'

'तुम्हाला इंग्रजी चार्ट वाचता येतो का?'

'होऽ'

त्यांनी लगेच एक इंग्रजी चार्ट नौकेत टाकला. शिवाय काही सिगारेटची पाकिटं, भाजलेलं मटन आणि थोडा ब्रेडही.

'नकाशात पाहा.'

मी पाहून म्हणालो, 'मला दक्षिणेकडून पश्चिमेकडे गेलं पाहिजे. म्हणजे ब्रिटिश वेस्ट इंडिज आम्हाला लागेल. बरोबर आहे ना?'

'हो, बरोबर.'

'साधारण किती मैलांवर?'

'तुम्ही दोन दिवसांत तिथे पोचाल,' कॅप्टन म्हणाला.

'गुडबाय! तुम्हा सर्वांना नमस्कार.'

'या समुद्र—साहसाबद्दल तुमचं अभिनंदन.'

'थँक्स! गुडबाय!'

जहाज सावकाश दूर निघून गेले. नौकेला त्याचा स्पर्श झालाच. कॅप्टननं जाता जाता माझ्याकडे गणवेशातली टोपी भिरकावली. ती नौकेच्या मधोमध पडली; तिच्यावर सोनेरी पट्टा आणि त्यावर नांगर होता. मी तो डोक्यावर चढवला. पुढच्या दोन दिवांसत आम्ही त्रिनिदादला पोचलो, यावेळी वाटेत काहीच अडचणी आल्या नाहीत.

## स्वातंत्र्याचे पहिले दिवस

जमीन बरीच दूर असतानाच पक्षी आम्हाला सांगून गेले की ती जवळ आलीय. सकाळी साडेसातच्या सुमाराला आमच्या नौकेवर आकाशात पक्षी फेऱ्या मारू लागले. आपण पहिल्या मुक्कामाला पोचलो. अखेर पोचलोच की. पहिला सर्वात कठीण टप्पा आपण पार पाडला. 'स्वातंत्र्य, स्वातंत्र्य, कायमचं स्वातंत्र्य!' आनंदानं बेभान होऊन आम्ही शाळकरी मुलांसारखं ओरडत होतो. टँकरच्या कॅप्टननं दिलेलं नारळाचं लोणी आम्ही उष्णतेनं सोलून निघालेल्या आमच्या चेहेऱ्यावर फासलं होतं. नऊ वाजता एकदाची जमीन

दिसली. वाऱ्यामुळे आम्ही किनाऱ्याकडे जलद जाऊ लागलो. संपूर्ण बेट दिसेपर्यंत दुपारचे चार वाजले. काही घरं दिसत होती, पण तिथे कोणी राहत होतं का नाही हे अद्याप कळलं नव्हतं. पण आम्ही जिथे नौका थांबवणार होतो; तिथे बघता बघता मोठा जनसमुदाय गोळा झालेला दिसला. त्या छोट्या खेड्यातील सर्वच्या सर्व लोक जणू आमच्या स्वागतासाठी हजर झाले होते. नंतर आम्हाला कळलं की त्या खेड्याचं नाव होतं 'सॅन फर्नांडो.'

किनाऱ्यापासून तीनशे यार्डांवर मी नांगर टाकला; तो ताबडतोब खाली रुतला. शीडही व्यवस्थित गुंडाळून ठेवलं आणि लोकांची प्रतिक्रिया अजमावत आम्ही तिथेच थांबलो. एक लहानशी होडी आमच्या दिशेला येऊ लागली. दोन काळी माणसं आणि एक गोरा. गोऱ्या माणसानं डोक्यावर शिरस्त्राण घातलं होतं.

'त्रिनिदाद आपलं सहर्ष स्वागत करीत आहे.' गोरा इसम अस्खलित फ्रेंचमधे बोलला. काही माणसं दात दाखवून हसली.

'आम्ही आपले आभारी आहोत, महाशय. इथे समुद्रतळ प्रवाळाचा आहे की वाळूचा?'

'वाळूचा आहे. तुम्ही काळजी न करता आत येऊ शकता. तुमच्या होडीला काही इजा पोचणार नाही.'

आम्ही पुन्हा नांगर उचलून घेतला, त्याबरोबर लाटा संथपणे आम्हाला किनाऱ्याकडे लोटू लागल्या. आम्ही तिथे पोचतो न पोचतो आहोत तोच दहाएक जण धावले आणि त्यांनी एका दमात आमची नौका पाण्याबाहेर ओढली. सर्वजण मोठ्या कुतूहलानं आम्हाला न्याहाळत होते, काहीजण तर आम्हाला हात लावत होते. निग्रो आणि रेड इंडियन स्त्रियांची आम्हाला निमंत्रण देण्यात चुरसच लागली होती. फ्रेंच बोलणाऱ्या गोऱ्या इसमानं सांगितलं की आम्ही त्या लोकांबरोबर राहावं अशी त्यांची इच्छा होती. मॅच्युरेटनं ओंजळीत वाळू घेतली आणि तिचं चुंबन घेतलं. धमाल उत्साह. आम्ही त्या गोऱ्या माणसाला जोन्सच्या पायाची परिस्थिती सांगितल्यावर त्यानं जोन्सला उचलूनच घरी नेलं. त्याचं घर जवळच होतं. दुसऱ्या दिवशीपर्यंत आमचं सर्व सामान तिथेच राहिलं तरी चालेल असं तो म्हणाला. कोणीही त्याला हात लावणार नाही. सर्वांनी आमची दिलखुलास स्तुती केली, 'शाब्बास कॅप्टन, छोट्याशा नौकेतून तुम्ही खूप मजल मारलीत.'


रात्र झाली. आमची नौका आम्ही आणखी थोडी वर ओढली आणि किनाऱ्यावरच्या दुसऱ्या एका मोठ्या होडीला घट्ट बांधून टाकली. मग मी त्या इंग्लिश माणसाच्या मागोमाग गेलो. मॅच्युरेट बरोबर होताच. त्याच्या घरी पोचल्यावर जोन्स आरामखुर्चीमधे मोठ्या खुशीत बसलेला दिसला. त्यानं जखमी पाय एका खुर्चीवर पसरला होता. त्याच्या जवळच एक मध्यम वयाची स्त्री आणि एक मुलगी बसली होती.

'ही माझी पत्नी आणि माझी मुलगी.' तो भला गृहस्थ म्हणाला, 'मला एक मुलगाही आहे; तो इंग्लंडला विश्वविद्यालयात शिकतोय.'

'सुस्वागतम्.' ती स्त्री फ्रेंचमधे म्हणाली.

'तुम्ही बसा ना.' दोन खुर्च्यांकडे निर्देश करीत मुलगी म्हणाली.

'आभारी आहोत, बाईसाहेब; पण तुम्ही आमच्यासाठी फार




सागराशी दोन जीवघेण्या झुंजी देऊन पॅपिलॉन वरील मार्गाने निसटला.

तसदी घेण्याचं कारण नाही.'

'का बरं? तुम्ही कुठून आला आहात त्याची आम्हाला कल्पना आहे, तेव्हा ती चिंता करू नका; आमच्या घरी आल्याबद्दल मी पुन्हा तुमचं मनःपूर्वक स्वागत करते.'

त्या घराचा मालक–गोरा माणूस–बॅरिस्टर होता. श्रीयुत बोव्हन हे त्याचं नाव होतं. ऑफिस वीस मैलांवर पोर्ट ऑफ स्पेन या राजधानीच्या ठिकाणी होतं. त्यांनी आम्हाला चहा, दूध, टोस्ट, लोणी व जाम इ. पदार्थ दिले. ती आमच्या स्वातंत्र्याची पहिली संध्याकाळ होती; मी ती कधीच विसरू शकणार नाही. त्यांच्या घरातील मनमोकळ्या वातावरणामुळे आम्ही अत्यंत प्रभावित झालो. भूतकाळाविषयी एकही शब्द नाही, की अनावश्यक प्रश्न नाही; फक्त आम्ही समुद्रात किती दिवस होतो आणि आमचा प्रवास कशा प्रकारे पार पडला इतकंच. जोन्सच्या दुखण्याची त्यांनी आपुलकीनं विचारपूस केली. पोलिसांना दुसऱ्या दिवशी कळवावं का एक दिवस आणखी जाऊ द्यावा हें त्यांनी आम्हालाच विचारलं. आमच्या बायकामुलांविषयी पृच्छा झाली. आपापल्या घरी पत्रं टाकायची असतील तर आम्ही ती पोस्ट करू असं ते म्हणाले. मी काय बोलणार? ते अत्यंत नवलपूर्ण असं स्वागत होतं; किनाऱ्या-वरच्या लोकांकडूनही आणि या कुटुंबातही. पळून आलेल्या तीन-जणांना अत्यंत स्नेहशील वागणूक मिळत होती.

श्री. बोव्हननी एका डॉक्टरला फोन केला. डॉक्टरनं दुसऱ्या दिवशी दुपारी जोन्सला घेऊन यायला सांगितलं. तिथे एक्स-रे काढून उपचार करणं सोयीचं जाणार होतं. त्यांनी आणखी एक फोन मुक्तिफौजेच्या प्रमुखाला केला. त्यांच्या पोर्ट ऑफ स्पेनमधील होस्टेलमधे आमच्यासाठी एक खोली राखून ठेवण्याचं त्या प्रमुखानं मान्य केलं. आम्हाला वाटलं तरच तिचा उपयोग करायचा होता. आमची नौका चांगल्या स्थितीत आहे किंवा नाही याची तपासणी काळजीपूर्वक करणं आवश्यक होतं, कारण पुन्हा निघताना तिचाच उपयोग होणार होता. श्री. बोव्हननी विचारलं की आम्ही गुन्हेगार होतो का केवळ खबरदारी म्हणून आम्हाला अटक झाली होती. आम्ही खरं ते सांगून टाकलं, त्यामुळे ते खुश झाले.

'तुम्हाला दाढी, अंघोळ वगैरे करायचीय का?' मुलीनं विचारलं, 'मुळीच संकोच करू नका. आम्हाला तुमचा यत्किंचितही त्रास होत नाहीये. बाथरूममध्ये काही गोष्टी तुम्हाला मिळतील. त्यांचा तुम्हाला उपयोग होईल असं वाटतं.'

मी बाथरूममध्ये गेलो. स्नान उरकलं. दाढी केली आणि माझे केस उलटे फिरवून पुन्हा बाहेर आलो. राखी रंगाची विजार, पांढरा शर्ट, टेनिसचा बूट आणि पांढरे मोजे इ. गोष्टी मी चढवल्या. छोटचा मॅच्युरेटच्या अंगात बरोबर बसतील असे कपडे मात्र घरात नव्हते, कारण त्याच्या बरोबरीचं तिथे कोणीच नव्हतं.

या लोकांच्या चांगुलपणाला काय म्हणावं? मला अंतःकरणात काय वाटत होतं ते मी सांगू शकत नाही. त्या रात्री जोन्स प्रथम निद्राधीन झाला. आम्ही पाचजण मात्र खूप विषयांवर बोलत राहिलो. आम्ही आमचं नवं आयुष्य सुरू होण्यासाठी अगदी वेडे झालो होतो, हे ऐकून त्या दोघींना खूपच बरं वाटलं. त्यांनी आमच्या भूतकाळाविषयी एकही प्रश्न विचारला नाही, फक्त वर्तमान आणि भविष्यकाळ. पळून आलेल्या लोकांना त्रिनिदाद सरकार स्थायिक होण्यास परवानगी देत नाही म्हणून श्री. बोव्हन यांनी खेद व्यक्त केला. त्यांनी तशी परवानगी काढण्याचा बऱ्याच वेळा प्रयत्न केला होता, पण ती कधीच मिळाली नाही.

ती मुलगी उत्कृष्ट फ्रेंच बोलत होती. तिचे केस लांबसडक होते. वय सतरा ते वीसच्या दरम्यान असावं–मला तिचं वय विचारणं अप्रशस्त वाटलं. ती म्हणाली, 'तू अगदी तरुण आहेस आणि उभं आयुष्य तुझ्यासमोर पडलं आहे. तुला कशाबद्दल शिक्षा झाली हे मला ठाऊक नाही आणि ते जाणून घ्यायची इच्छाही नाही; पण अगदी छोटचा नौकेतून समुद्रप्रवासाच्या तुमच्या जिद्दीवरून हे मात्र स्वच्छ दिसतंय की, तुमची स्वातंत्र्याची तळमळ प्रामाणिक आहे आणि त्याच गोष्टीचं मला खूप कौतुक वाटतं.'

दुसऱ्या दिवशी सकाळी आठ वाजेपर्यंत आम्ही झोपलो. उठल्यावर पाहतो तर श्री. बोव्हन आधीच ऑफिसला निघून गेले होते. दोघी-जणींनी आम्हाला शांतपणे सांगितलं की, 'ते आता दुपारी परत येतील आणि येताना तुमच्यासाठी काय करता येईल याची माहिती घेऊन येतील.' आमच्यासारखे तीन गुन्हेगार–त्यातून अपरिचित–घरात असताना ते सरळ निघून गेले होते, यापेक्षा दुसरा चांगला धडा आम्हाला कोणता मिळाला असता? त्यांना जणू असं सुचवायचं होतं, 'तुम्ही मुळात चार लोकांसारखी चांगली माणसं आहात; मी तुमच्यावर कसा विश्वास टाकला याचा तुम्हीच विचार करा. कारण घरात माझी बायको आणि मुलगी असून मी तुमच्यावर घर सोपवून निश्चितपणे जात आहे.' या न बोलता कळलेल्या त्याच्या विचारां-मुळे आम्ही भारून गेलो. 'तुमच्या बोलण्यावरून तुम्ही विश्वासार्ह आहात हे मला समजलं–म्हणूनच माझे जुने मित्र असल्याप्रमाणे मी तुमच्याशी वागत आहे. तुमचा मला तिळमात्रही संशय येत नाही.'

वाचकहो, या माझ्या कथेला कधी काळी वाचक मिळतील असं समजू या–मी काही फार हुशार नाही आणि माझ्याजवळ लेखन-शैलीही नाही. त्यावेळच्या माझ्या तीव्र भावना व्यक्त करण्यासाठी ओजस्वी भाषेची जरूरी आहे. तो आदरभाव–छे, पुनर्वसन, किंवा नवीन आयुष्य म्हणू या. त्या सरळ स्वभावाच्या वर्तावामुळे, अधो-गतीमधून मला वर ओढल्यामुळे, एका रात्रीत खऱ्या जबाबदारीची जाणीव करून दिल्यामुळे मी आमूलाग्र बदलून गेलो. मी एक गुन्हे-गार होतो, खरं तर सुटका झाल्यावरही मला साखळदंडाची जाणीव व्हायला हवी, कोणीतरी आपल्यावर लक्ष ठेवून आहे अशी टोचणी हवी; हे सर्व मी पाहिलं होतं, अनुभवलं होतं, त्यातूनच गेलो होतो आणि खूप भोगलं होतं–अगदी जादू व्हावी तसं ते सर्व नष्ट झालं होतं. धन्यवाद बोव्हनमहाशय, ईश्वराच्या न्यायालयातील बॅरिस्टर-साहेब, तुम्ही थोड्या अवधीमध्ये माझ्यात एक नवीन माणूस घडवल्याबद्दल मी आपला ऋणी आहे.

ती सुंदर केस असलेली, सागरासारखे निळ्या रंगाचे डोळे असलेली मुलगी माझ्याबरोबर बागेत एका नारळाच्या झाडाखाली बसली होती. बोगनवेलीची लाल, पिवळी व जांभळी फुलं सर्वत्र फुलली होती, त्यामुळे बागेत काव्यमय वातावरण पसरलं होतं. आमच्या संभाषणाला ते पोषक ठरलं. 'हेन्री महाशय, (मला उद्देशून ती महाशय म्हणाली! कोणी मला महाशय म्हणाल्याला किती



**' महाशय ', कधी काळी इच्छा झालीच तर तुमची खुशाली कळवा.**

वर्षं लोटली असावीत ?) काल पपांनी सांगितल्याप्रमाणे इथले ब्रिटिश अधिकारी अगदी कडक आहेत. कोणत्याही सबबीवर ते बाहेरच्या लोकांना इथे स्थायिक होऊ देत नाहीत. तुम्हाला विश्रांतीसाठी फार तर पंधरा दिवस राहू देतील, नंतर तुम्हाला पुन्हा समुद्रातूनच जावं लागेल. आपण अशी आशा करू या की, तुम्ही आमच्याहून आतिथ्यशील आणि समजूतदार अशा चांगल्या देशाला पोचाल. मात्र सगळ्या ब्रिटिश बेटांवर आमच्यासारखीच स्थिती आहे. यदाकदाचित प्रवासात तुम्हाला काही त्रास झालाच तर त्याचं खापर या बेटातील जनतेवर मात्र फोडू नका. कारण ते काहीच करू शकत नाहीत. ज्यांना तुम्ही कधी पाहिलेलंही नाही असे इंग्लंडमधील लोक इथली धोरणं ठरवतात. जाऊ दे. पपांचा पत्ता आहे, ' १०१ क्वीन स्ट्रीट, पोर्ट ऑफ स्पेन, त्रिनिदाद. ' जर तुम्हाला कधी काळी इच्छा झाली तर तुमची खुशाली एक–दोन ओळीत आम्हाला कळवा अशी मी विनंती करते. '

मी इतका सद्‌गदित झालो की, माझ्या तोंडातून एक शब्दही फुटला नाही. इतक्यात तिची आई आमच्याजवळ आली. ' महाशय, माझे यजमान पाच वाजेपर्यंत घरी येणार नाहीत. पोर्ट ऑफ स्पेनमध्ये आमच्या गाडीतून तुम्हाला प्रवेश मिळावा या खटपटीत ते आहेत. अर्थात पोलीस पहारा नसावा म्हणून. तुमची इथली पहिली रात्र पोलीस स्टेशनमध्ये जाऊ नये अशी त्यांची इच्छा आहे. तुमच्या जखमी मित्राला सरळ एका डॉक्टर मित्राच्या नर्सिंग होममध्ये दाखल करण्यात येईल आणि तुम्हा दोघांची मुक्तिफौजेच्या होस्टेलवर सोय झाली आहे. '

आता मॅच्युरेटही आमच्यात सामील झाला. तो आमच्या नौकेकडे गेला होता. त्यानं सांगितलं की, नौकेभोवती खूप लोकांचा गराडा पडला होता, पण कोणत्याही वस्तूला त्यांनी स्पर्श केला नव्हता. आमच्या नौकेच्या कडेला एक गोळी घुसली होती; ती कोणाला तरी दिसली. ' आठवण म्हणून जवळ ठेवण्यासाठी ती गोळी काढून देऊ का ' असं एकानं विचारलं. त्यावर मॅच्युरेट म्हणाला, ' कॅप्टन, कॅप्टन. ' त्याबरोबर लोकांना कळलं की कॅप्टनला विचारणं आवश्यक होतं.

मॅच्युरेटनं विचारलं, ' आपण ती कासवं सोडून देऊ या का ? '

' तुमच्याजवळ कासवं आहेत ? ' ती मुलगी जवळजवळ ओरडलीच, ' चला, आपण जाऊन ती पाहू या. '

आम्ही नौकेकडे जाऊ लागलो. वाटेत त्या खेळकर मुलीनं किंचितही न लाजता माझा हात आपल्या हातात घेतला. निरनिराळ्या रंगांच्या माणसांनी आम्हाला ' गुड आफ्टरनून ' केलं. मी नौकेतून कासवं बाहेर काढली. ' आपण यांचं काय करायचं ? पुन्हा समुद्रात सोडायची का तुझ्या बागेत ती ठेवायला तुला आवडेल ? '

' आमच्या बागेत समुद्राच्या पाण्याचं एक तळं आहे, तिथे आपण त्यांना सोडू. म्हणजे तुमची मला सदैव आठवण राहील. '

' उत्तमच. ' मी इतर बघ्या लोकांना नौकेतील इतर वस्तू देऊन टाकल्या. फक्त होकायंत्र, तंबाखू, पाण्याचे पिप, चाकू, कुऱ्हाड, ब्लँकेट्स आणि पिस्तूल या गोष्टी तेवढ्या ठेवल्या. पिस्तूल मी ब्लँकेटच्या खाली दडवून ठेवलं. कोणीच ते पाहिलं नव्हतं.

पाच वाजता श्री. बोव्हन परतले. ' मित्रहो, सर्व काही ठीक झालं आहे. मी राजधानीत तुम्हाला स्वतःच घेऊन जाणार आहे. प्रथम जखमी माणसाला दवाखान्यात पोचवून आपण होस्टेलवर जाऊ. ' गाडीच्या मागच्या सीटवर आम्ही जोन्सला नीट बसवलं. मी त्यांच्या मुलीशी बोलत असताना सौ. बोव्हन बाहेर आल्या. त्यांच्या हातात एक सूटकेस होती. ' यात माझ्या यजमानांच्या काही गोष्टी आहेत–आम्ही त्या तुम्हाला अगदी मनापासून देत आहोत. ' या औदार्यापुढे आम्ही काही बोलूच शकलो नाही. ' आभारी आहोत. आभार, आभार, पुनःपुन्हा आभार. ' आणि गाडी निघाली. सायंकाळी पावणेसहा वाजता आम्ही नर्सिंग होममध्ये पोचलो. सेंट जॉर्ज नर्सिंग होम. नर्सेसनी स्ट्रेचरवरून जोन्सला वॉर्डमध्ये हलवलं. डॉक्टर आले आणि त्यांनी श्री. बोव्हनशी हस्तांदोलन केलं. त्यांना फ्रेंच येत नव्हतं म्हणून बोव्हनसाहेबांचे द्वारा त्यांनी सांगितलं की, जोन्सची नीट काळजी घेतली जाईल आणि आम्ही तिथे हवं तेव्हा जाऊ शकतो. नंतर आम्ही गाडीतून शहरात हिंडलो.

रस्त्यातील दिवे, मोटारी, सायकली, माणसं पाहण्यात आम्ही गुंग होऊन गेलो. गोरी माणसं, काळी–पिवळी माणसं, रेड इंडियन्स आणि हमाल, सर्वजण हिंडत होते. शहरात सगळी लाकडी घरंच दिसत होती. आम्ही होस्टेलवर जाऊन पोचलो. त्या इमारतीचा तळमजला दगडी होता, त्यावरचे मजले मात्र लाकडीच होते. एका मोठ्या चौकात ती इमारत उभी होती. मुक्तिफौजेच्या कॅप्टननं आमचं स्वागत केलं. त्यावेळी तिथे स्त्री–पुरुष नोकरमंडळी हजर होती. तो थोडं फ्रेंचमधून बोलला, पण इतरजण मात्र आमच्याशी इंग्रजीतून बोलत होते. आम्हाला त्याचा अर्थ कळत नव्हता, पण त्यांच्या आनंदी आणि उत्साही चेहऱ्यावरून त्यांचे शब्द सहृदयतेचे असणार हे सहज कळत होतं.

दुसऱ्या मजल्यावरील एक खोली त्यांनी आम्हाला दिली. तिथे तीन बिछाने होते–तिसरा जोन्ससाठीच पसरला होता. जवळच बाथरूम होती. शिवाय आमच्यासाठी टॉवेल आणि साबणही तिथे

ठेवला होता. आम्हाला खोली दाखवून झाल्यावर कॅप्टन म्हणाला, 'तुम्हाला जर भूक लागली असेल तर सात वाजता आमच्याबरोबर तुम्ही जेवण घेऊ शकता. म्हणजे साधारण अर्ध्या एक तासातच.'

'नको, आम्हाला तितकीशी भूक नाही.'

'तुम्हाला जर शहरात फेरफटका मारायचा असेल तर हे दोन वेस्टइंडिज डॉलर्स जवळ ठेवा. तेवढ्यात तुमचं चहापाणी सहज होईल. फक्त कुठे चुकणार नाही याची मात्र काळजी घ्या. परत येताना वाटेत कोणालाही विचारा की मुक्तिफौज कुठे आहे.'

दहा मिनिटांतच आम्ही बाहेर पडलो. आम्ही फुटपाथवरून चालत होतो; इतर लोकांमधून वाट काढीत आम्ही पुढे जात होतो; आमच्याकडं कोणाचंही लक्ष नव्हतं की कोणी वळून पाहत नव्हतं. शहरात स्वतंत्रपणे हिंडताना आम्ही हरखून गेलो होतो. त्यांनी आमच्यावर विश्वास ठेवून आम्हाला मोकळेपणानं हिंडायची परवानगी दिल्यामुळे आमचं हृदय हर्षभरित झालं होतं. त्यामुळे आमच्यात आत्मविश्वास उत्पन्न झाला आणि त्यांच्या विश्वासाला पात्र ठरण्याची जबाबदारीही जाणवली. आम्ही मन मानेल तसं भटकत होतो. आम्हाला लोकांच्यात वावरायचं होतं, गर्दीमध्ये मिसळायचं होतं; त्या लोकांचाच भाग बनायचं होतं. आम्ही एका बारमध्ये शिरलो आणि दोन बियर मागितल्या. 'दोन बियर प्लीज' असं नुसतं म्हणण्यात खरं तर काहीच विशेष नव्हतं, अगदी सहाजिक होतं. पण नाही, आमच्या दृष्टीनं त्याचं मोल अनन्यसाधारण होतं. नाकात सोन्याची नथ घातलेली एक मुलगी आमच्याजवळ आली आणि म्हणाली, 'अर्धा डॉलर, सर.' तिचं हास्य मोत्यासारखं होतं. डोळे मोठे आणि गडद जांभळे, स्तन अर्धवट दिसतील असे कपडे—या इतरांच्या लेखी अगदी नित्याच्याच गोष्टी होत्या, पण आम्हाला तरी पऱ्यांच्या राज्यात वावरल्यासारखं वाटत होतं थांब, पपी. हे खरं असणं शक्यच नाही. एक जन्मठेपेचा गुन्हेगार काही दिवसांतच एक स्वतंत्र माणूस बनतो ही गोष्ट खरी कशी मानावी?

मॅच्युरेटनं बिल दिलं. आता त्याच्याजवळ अर्धा डॉलर शिल्लक होता. बियर बऱ्यापैकी थंडगार होती. म्हणून तो म्हणाला, 'पुन्हा घ्यायची का?' पण का कोण जाणे, मला पुन्हा घेणं नको वाटलं. 'जाऊ दे.' मी म्हणालो, 'स्वतंत्र होऊन अजून तासभुद्धा झाला नाही आणि इतक्यातच तुला पिऊन आडवं पडावंसं वाटू लागलं?'

'थांब, थांब पपी. बियरच्या दोन बाटल्या आणि पिऊन तर्र होणं या दोन गोष्टींचा काहीही संबंध नाही.'

'नसेल; पण थोडी मोकळीक मिळाल्यावर आपण वाहवत जाऊ नये असं मला वाटतं. आपण हाती आलेल्या सुखाचा थोडा थोडा आस्वाद घेऊ आणि मुख्य म्हणजे हे पैसे आपले स्वतःचे नाहीत.'

'आता ठीक बोललास. पटलं आपल्याला. आपण स्वतंत्रतेचा हळूहळू उपभोग घेऊ—त्यातच काही अर्थ राहील.'

पुन्हा आम्ही रस्तोरस्ती हिंडलो. तिथल्या सर्व गोष्टींचं आम्हाला नाविन्यच होतं. आम्ही अचंबित होऊन सगळीकडे आधाशासारखं पाहत होतो. बघता बघता आम्ही बंदरावर जाऊन पोचलो. आमच्यासमोर प्रकाशमान झालेली अनेक जहाजं उभी होती. प्रवासी जहाजांनी आमच्यावर मोहिनी घातली—पनामा, लॉस एंजल्स्, बोस्टन, क्वेबेक, हॅम्बुर्ग, ॲमस्टरडॅम आणि लंडन. बाजूच्या धक्क्याला लागून बार, पब, रेस्टॉरंट्स उभी होती. गर्दीमुळे सगळी भरगच्च झाली होती. त्यात स्त्री–पुरुष कोंबल्यासारखे बसले होते. पिणं, गाणं आणि नृत्य याला अगदा उत आला होता. एकदम मलाही तीव्रतेनं वाटू लागलं की त्यांच्यात घुसावं. कारण तिथे उत्साह नांदत होता. कॉफीचा रंग असलेल्या, प्रमाणबद्ध देहयष्टीच्या मुली तिथे सरबराई करीत होत्या.

त्यांच्यापैकी एकीजवळ जाऊन मी विचारलं, 'फ्रेंच पैसे इथे चालतील?' आणि तिला एक हजार फ्रँक्सची नोट दाखवली. 'हो, मी तुम्हाला इथलं चलन मिळवून देते.' 'ठीक आहे.' तिनं नोट घेतली आणि गर्दीनं ओसंडणाऱ्या एका खोलीत ती अदृश्य झाली. थोड्या वेळातच ती परत आली. 'इकडे या.' असं म्हणत एका कॅश डेस्कजवळ ती मला घेऊन गेली. तिथे एक चिनी इसम बसला होता.

'तू फ्रेंच आहेस?'

'हो.'

'हजार फ्रँक्स् बदलायचेत?'

'हो.'

'सगळे वेस्टइंडिज डॉलर्स चालतील?'

'हो.'

'पासपोर्ट?'

'जवळ नाही.'

'खलाशाचं ओळखपत्र?'

'जवळ नाही.'

'इथे आल्याचा दाखला?'

'जवळ नाही.'

'छान.' तो त्या मुलीला काहीतरी म्हणाला. तिनं खोलीत पाहिलं. माझ्यासारखी टोपी घातलेल्या एका नाविकाजवळ ती गेली. त्याला डेस्कपाशी घेऊन आली. चिनी त्याला म्हणाला, 'तुझं ओळखपत्र?'

'हे पाहा.'

त्या चिनी माणसाने शांतपणे त्या अनोळखी इसमाच्या नावाने एक हजार फ्रँकसाठी हुंडणावळ बदलाचा अर्ज भरला. त्यावर त्याची सही घेतली. नंतर त्या मुलीनं त्याला आपल्या हातानं पकडून दूर नेलं. आपण कशावर सही केली याचा त्याला पत्ता लागला नव्हता. आम्हाला अडीचशे वेस्टइंडिज डॉलर्स मिळाले. त्यातील पन्नास डॉलर्स सुटे होते—एक आणि दोनाच्या नोटा. मी त्या मुलीला एक डॉलर दिला; आम्ही बाहेर गेलो आणि एका टेबलाशी बसून निरनिराळ्या खाद्य–पदार्थांवर ताव मारला. त्यानंतर मद्याचाही समाचार घेतला.

[क्रमशः]

---

'तुम्ही फ्रेंच आहात ना?'

'होय, महाराज.'

'कृपया गाडीत बसा.' ते तिघेजण आमच्यामागे बसले. मी ड्रायव्हरशेजारी बसलो.

'तुमची होडी खडकावर आपटून नष्ट झाली वाटतं? कोणी बुडालं तर नाही ना?'

'सुदैवानं नाही.'

'तुम्ही कोणीकडून येताय?'

'आता त्रिनिनादहून; पण मूळ फ्रेंच गियानापासून.'

## पॅपिलॉन पुन्हा संकटाच्या भोवऱ्यात

**माणूस पुढील अंकी**

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

## २२–२–७५ ते २८–२–७५

### महाराष्ट्राच्या नव्या नेतृत्वाची कसोटी लागणार !

कुंभ रवीच्या व मकर मंगळाच्या भ्रमणात महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदावर श्री. शंकररावजी चव्हाण यांची नियुक्ती झाली आहे. त्यांच्या अबोल नेतृत्वाची एका अर्थाने कसोटीच लागणार आहे. महाराष्ट्राच्या नेतृत्व बदलाच्या व शोधाच्या हालचाली 'पडद्याआड' चालू होतील असे मी यापूर्वीच सूचित केले होते ते आता खरे ठरले आहे. शंकररावांना महाराष्ट्र मंत्रिमंडळाचा व विधान सभा सदस्यांचा एकमुखी पाठिंबा व्यक्त झाला असला तरी महाराष्ट्राच्या राशीकुंडलीतील ग्रह मात्र पाठिंबा देतील असे म्हणता येत नाही. नाराजी व धुसफूस आतल्या आत चालू होणार आहे. केंद्राकडून हवे ते मिळविण्यात शंकरराव यशस्वी होऊ शकतील. तात्पुरती केंद्राची मर्जीही राहील. पण...या 'पणा'चे उत्तर नजीकच्या काळातच महाराष्ट्रीय जनतेला मिळू शकेल. कदाचित काही अकल्पितदेखील घडू शकेल.

**मेष** : अधिकारावर नेमणूक

अकरावा रवी व दहावा मंगळ तुमच्या कर्तबगारीला विलक्षण उठाव देणार आहेत. आता माघार नाही. रेंगाळणे नाही. सर्वच क्षेत्रात विजयाची प्रसादचिन्हे दृष्टिपथात येणार आहेत. गुरू बारावा झाला आहे. हा मात्र तेवढासा अनुकूल नाही. उपासनेत अडथळे, अनावश्यक खर्च, लेखी करारात उणीवा असे काही तरी या बाबतीत घडावे. एरवी तुमच्या विजयाला वारादेखील अडवू शकणार नाही. आर्थिक परिस्थिती थोडी फार दोलायमान होणार आहे. पैसे एकदम येतील पण ते कसे खर्च झाले हे समजणार देखील नाही. घरी पाहुण्यांचा तळ पडेल. कुणा जवळच्या व्यक्तीसाठी पैसा खर्च करावा लागेल. सोमवार ते बुधवार नोकरीत यशप्राप्ती. गुरुवारी व्यापारात भरपूर नफा. महिलांच्या धार्मिक कार्यात अडथळे येतील. शुभराशी २–५–१०

**वृषभ** : व्यवसायात समृद्धी

चंद्राच्या सहवासात अजून केतू आहे व कुटुंबस्थानी शनी काही तरी उपद्व्याप करीत आहे. पण तुम्ही या वेळी त्यांची फिकीर करू नका. हे ग्रह तुमचे काहीही वाकडे करणार नाहीत. या उलट गुरू दहावा होऊन तुमचे जीवन निर्मल करीत आहे. मंगलमय बनवायचा प्रयत्न तो करीत आहेच. तुमच्यापैकी ज्यांचे विवाह फार काळ तंगून राहिले होते त्यांचा मार्ग आता मोकळा झाला आहे. पूर्वपरिचित अशी व्यक्ती तुमचे संसारी-वैवाहिक जीवन बहरून टाकणार आहे. प्रामुख्याने हा आठवडा भारी कापड व्यापार, सौंदर्य प्रसाधने, वेषभूषेची इतर साधने यांचा व्यवसाय तेजीत आणून पैसा मिळवून देईल. रविवार, बुधवार व गुरुवार नोकरीत वरिष्ठाकडून शाबासकी. महिलाकडून मंगल कार्यात पुढाकार. शुभांक ४–६–७

**मिथून** : विवाहाला अनुकूलता

तुमच्या विवाहाचा प्रश्न अनेक दिवस नव्हे अनेक वर्षे गंजत पडला होता. त्याला आता गुरूच्या अनुकूलतेमुळे चालना मिळणार आहे. आजच मंगळ आठवा होत आहे. स्थानाच्या दृष्टीने हा मंगळ तेवढासा अनुकूल नाही. तसेच शनी-मंगळाचा षडाष्टक योग, तब्येतीला किरकोळ त्रास होऊ शकेल. सर्दी, ताप, घसा बसणे असे काही तरी घडू शकेल. असे असले तरी आर्थिक स्थिती उत्तम सुधारेल. घराचा, राहत्या जागेचा, स्थावराचा प्रश्न सुटू शकेल. न्यायालयातील स्थावराचा वाद तडजोडीने मिटेल. रविवार ते बुधवार नोकरीत बढती बदलीचा योग. चालू धंद्यात बरकत येईल. किरकोळ व्यापार तेजीत येईल. फळांचे व्यापारी चिंताकूल होतील. महिलांना नोकरी नमत्यास मिळू शकेल. शुभराशी ६–९–१०

**कर्क** : संमिश्र अनुभव

आजच मकर राशीत मंगळाचे प्रस्थान होत आहे, ते तुमच्या संसारसुखाला ग्रहण लावण्याची नांदीच म्हणावी लागेल. नवरा बायकोबद्दल व बायको नवऱ्याबद्दल भांडण उकरून काढतील. डोके तापवून घेण्याचे शक्यतो टाळा. गुरू तुमचा पाठीराखा आहे. त्याच्यावर श्रद्धा ठेवा. यावेळी ठरलेले विवाह स्वभावाच्या दृष्टीने अनुरूप ठरण्याची शक्यता कमी आहे. मात्र नोकरीच्या दृष्टीने तुमच्या आशाआकांक्षांना साफल्याची फुले फुलू लागतील. नोकरीसाठी ज्यांना तुम्ही भेटणार आहात ती व्यक्ती भेटू शकेल. कामही होईल. रविवार, बुधवार व शुक्रवार या दिवशी वायदे-व्यवहारात फायदा होईल. नवीन व्यापाराचे उद्घाटन करायला हे दिवस शुभ आहेत. महिलांचे व्यवसायात स्थान वाढेल. शुभ राशी ३–४–६.




### सिंह : विरोधाची तमा नको

मकर राशीत आजच प्रविष्ट झालेला मंगळ तुमचे सारे हेतू सफल करायला पुरेसा आहे. त्याचे सामर्थ्य तुमच्या स्पर्धकांचे, विरोधकांचे डावपेच उधळून लावायला पुरेसे आहे. नोकरीधंद्यातील तुमचे स्थान आता पक्के होईल. मनात ठरवलेल्या अनेक योजना गती घेऊ लागतील. त्यासाठी पैशाचे, माणसाचे सहकार्यही तुम्ही यशस्वीपणे मिळवू शकाल. तुम्ही राजकारणात उडी घेऊ शकता. योग्य व्यक्तीचे तुम्हाला मार्गदर्शनही होईल. बेकारीने त्रासलेल्या व्यक्तीस दिलासा मिळेल. आशा उत्पन्न होईल. पत्रव्यवहार होऊ शकेल. परदेश–प्रयाण होऊ शकेल. महिलांना प्रगतीच्या नव्या वाटा खुल्या होतील. शुभ राशी ४–९–१०.

### कन्या : संसाराला सात्त्विकता

मीन राशीत गुरूचे झालेले राश्यंतर हे तुमच्या सप्तमस्थानी झाले आहे. ही एकच गोष्ट तुमच्या बाबतीत महत्त्वाची ठरावी. आता अनिश्चितपणा संपून तुमच्या योजना-कल्पनांना मूर्त स्वरूप येऊ लागावे.प्रामुख्याने संसारातील ताण, तणाव, अशांतता व उद्विग्नता कमी कमी होण्याची चिन्हे दिसू लागतील. पती–पत्नीत योग्य असे प्रेम व सहकार्य निर्माण होऊ शकेल. विवाहेच्छूंपैकी ज्यांचे विवाह ठरण्यात अडथळे येत होते त्यांचे विवाह चटकन ठरू शकतील.लेखकांना, पत्रकारांना, या व्यवसायातील काम करणाऱ्यांना एखादी शुभ वार्ता समजावी. नोकरी–व्यवसायातील अनेक न सुटलेल्या समस्यांचा वरिष्ठांकडून सहानुभूतीने विचार होईल. सोमवार, गुरुवार अपेक्षित पत्रे येतील. महत्त्वाचा निर्णय ठरेल. महिलांच्या मनातील शंका–कुशंका दूर होऊन प्रसन्नता येईल. शुभ राशी ९–११–१२.

### तूळ : मनस्वास्थ्य सांभाळा

या आठवडयातील आजच्या मंगळाच्या मकरेतील उपस्थितीमुळे तुमच्या बाबतीत अनेक प्रश्नचिन्हे निर्माण होतील. गुरूचे निर्भेळ कृपाछत्र आता दुरावले आहे तर मंगळ सुख हरवून घेणार आहे. असे क्रूर ग्रह जेव्हा सुखाला सुरुंग लावतात तेव्हा संयम पाळण्याखेरीज गत्यंतर नसते. यावेळी अन्याय झाला तरी भांडून उपयोग नाही. तुमच्या बाजूने सत्य असले तरी ते सांगून उपयोग नाही. कमी बोलणे व परिस्थितीची लाट ओसरू देणे हाच एकमेव मार्ग यावेळी तुमच्या समोर आहे. नोकरीत बढती–प्रमोशनच्या बाबतीत अन्याय झाला तरी तो काही दिवस सहन करा. व्यवसायात नवे काही करू नका. आर्थिक ताण सहन करावा लागेल. महिलांनी कोणताही भांडणाचा प्रसंग टाळावा. शुभ राशी ३–४–९

### वृश्चिक : शुभबदलाची चाहूल

हर्शल व्ययात हीच काय ती तुमच्याबाबतीत उणीव म्हणावी लागेल. तेवढी प्रतिकूलता सोडली तर तिसरा मंगळ आणि पाचवा गुरू हे यावेळी तुमचे भाग्यविधाते आहेत. तुमच्या भाग्यरथाची सारी सूत्रे त्यांच्याच हाती आहेत. यावेळी तुमच्या आशा-आकांक्षाच्या बाबतीत बरेच काही अद्वितीय असे घडावे, अविस्मरणीय असा प्रत्यय यावा. नोकरीधंद्याच्या बाबतीत वाङ्मयीन व शैक्षणिक बाबतीत अकल्पित अनुकूल बदलाची चाहूल लागावी. तुमच्या पैशाअडचणींच्या गरजेत सुधारणा व्हावी. नोकरी नसली तर ती मिळेल. बेकारीची कुऱ्हाड माथी पडेल की काय ही भीती नष्ट होईल. विज्ञानपदवीधर, शेतीपदवीधर व कायदा पदवीधर यांना चांगले दिवस येतील. शनिवार, सोमवार व गुरुवार आर्थिक लाभ. महिलांचे मनोरथ सफल होतील. शुभ राशी ६–८–९.

### धनू : गोंधळून जाऊ नका

याच आठवडयात तुमच्या राशीतून मंगळ निघून जात आहे. त्याचप्रमाणे सुखस्थानी गुरूची कारकीर्द सुरू झाली आहे, ही काही तुम्हाला म्हणावी तितकी अनुकूल घटना नाही. चौथा गुरू मीन राशीत आहे. तो काही बाबतीत तुम्हाला लाभदायक ठरेल. प्रामुख्याने खूप दिवस तुम्हाला आईची माया मिळाली नव्हती ती मिळेल. तुमच्या जागेचा प्रश्न मात्र या वेळी चटकन सुटणार आहे. एखादा प्लॉट वगैरे खरेदी करू शकाल. तुम्ही देवधर्म मानणारे लोक आहात. रोज कुलदेवतेची आराधना करा म्हणजे मन अविचाराकडे झुकणार नाही. नोकरीत हाताखालच्या लोकांवर विश्वासून राहू नका. आपल्या कामात काळजी घ्या. एरवी हा आठवडा सार्वजनिक कामात तुम्हाला मानमरातब मिळवून देणारा आहे. शुक्रवारी महत्त्वाची घटना घडेल. महिलांनी उद्योगव्यवसाय काळजीपूर्वक करा. शुभ राशी ३–५–११.

### मकर : नातेवाइकांशी समझोता

चंद्रावर गुरूची दृष्टी आहे. ही एक शुभसूचक घटना मानायला हरकत नाही. त्याचप्रमाणे मंगळ तुमच्या राशीत आला आहे, हा एक असामान्य योग आहे. यावेळी


## साप्ताहिक माणूस : वर्गणीचे नवे दर

वार्षिक : छत्तीस रुपये

सहामाही : वीस रुपये

परदेश : (जलमार्ग)

पंचावन रुपये

नोकरी असो की व्यापार, असो तुमचे त्या त्या क्षेत्रातील कर्तृत्व उठून दिसेल. व्यवसायांचे क्षेत्र व्यापक होणार आहे. नव्या नव्या योजना आखून शेती, बागायती व रासायनिक उद्योगाच्या क्षेत्रात तुम्ही नव्या युगाची सुरुवात करू शकाल. तुमचे आणि नातेवाइकांचे बिघडलेले संबंध या आठवड्यात एखाद्या सूचक घटनेने सुधारू लागतील. त्यांची मदत होईल. तुम्ही परदेशी जाण्याच्या विचारात असाल तर त्याला योग्य असे वातावरण तयार होईल. नोकरी कायम होईल. आर्थिक स्थैर्य यायला अजून थोडे थांबावे लागेल. मंगळवारी महत्त्वाचा निर्णय होईल. महिलांनी आत्मसंशोधन करावे. सार्वजनिक कार्यात भाग घ्यावा. शुभ राशी ५–३–१२.

**कुंभ : कौटुंबिक उत्कर्ष**

सुमारे तेरा महिने तुमच्या चंद्राच्या सहवासात असलेला गुरू आता बदलला आहे. हा मीन राशीतील दुसरा गुरू तुमचे नैतिक व आध्यात्मिक सामर्थ्य वाढवणार आहे. भविष्यकाळातील घटनांची चाहूल तुम्हाला लागावी असे काहीतरी घडेल. दुसरा गुरू तुमचे कौटुंबिक सुख वृद्धिगत करील. संसारातील, कुटुंबातील साऱ्या अडचणींचा निरास होऊन तुमच्या आशाआकांक्षांच्या साफल्याचा मार्ग मोकळा होईल. घरात पुत्रजन्माचा आनंद मिळेल. शनिवार, रविवार व शुक्रवार या दिवसांची नोंद घ्या. नोकरीव्यवसाय, व्यापारउदीम फायद्याच्या दृष्टिपथात येईल. आर्थिक क्षेत्रात तुमच्या कर्तृत्वाचा ठसा उमटेल. महिलांना तीर्थक्षेत्राची यात्रा घडेल. शुभ राशी ५–६–१२.

**मीन : प्रकाशात चमकाल**

अंतरिक्षातील सात्त्विकता, सज्जनता, अध्यात्म, धर्म व मांगल्य, औदार्य व उदात्तता या सर्व गुणांचा अधिपती गुरू तुमच्या राशीचा स्वामी आहे व तो आता वरील गुणांच्या संगोपनासाठी तुमच्या राशीत आला आहे. आता निराशा संपली. अडचणी संपल्या आणि नव्या पर्वाची नांदी होत आहे. तुमच्या रोमरोमात प्रकाशकिरण दीप्तिमान होतील. आशाआकांक्षा पालवतील. हुकलेली संधी पुन्हा मिळेल. नोकरीव्यवसाय यशस्वीपणे चालेल. नोकरीतील अनेक अडचणींवर मात करून तुमच्या प्रगतीची गाडी वेगाने पुढे सरकेल. वाणिज्य पदवीधरांना मुलाखतींना बोलावले जाईल. नवा व्यवसाय सुरू करायला सोमवार ते गुरुवार अनुकूल आहेत. महिलांना मंगलकार्यात मानसन्मान मिळेल. शुभ राशी ७–८–१०.

□ □


---

## ही चळवळ अपेशी होऊन चालणार नाही : पृष्ठ ५ वरून

विचारला जातो. प्रश्न विचारणारांना आंदोलनाचे स्वरूपच समजलेले नाही. आंदोलन यशस्वी झाले की अयशस्वी, हे कसे ठरवायचे? त्याची फूटपट्टी कोणती? आगामी निवडणुकांमध्ये जे. पीं. च्या बाजूला बहुमत मिळाले, म्हणजे ते यशस्वी ठरले असे लौकिकदृष्टीने म्हणता येईल. सामान्य माणसे यशाचे मोजमाप असेच करणार. पण जरा खोलवर विचार केला तर असे म्हणता येईल, की जयप्रकाश नारायण यांना अपयश येणे शक्यच नाही. जे लोक पुढील निवडणुकीत यशस्वी होतील, त्यांच्यामध्ये आजच्या लोकप्रतिनिधींच्या मानाने नैतिक दृष्ट्या उच्च स्तर असणारांचे आणि इमानदार लोकांचे प्रमाण निश्चितच अधिक राहाणार आहे. विहार आंदोलनाची ती उपलब्धी आहे. उमेदवार कोणत्या पक्षाचे आहेत हा प्रश्न या राष्ट्रीय संदर्भामध्ये गौणच समजला पाहिजे. हे आंदोलन बौद्धिक उत्थानासाठी आहे. सुशिक्षित तरुण स्वातंत्र्योत्तर काळात फार मोठ्या संख्येने आणि हिरीरीने आंदोलनामध्ये उतरला आहे. आंदोलन सुरू झाले तेदेखील भ्रष्टाचार, बेकारी, महागाई आणि निकामी शिक्षणपद्धती यांविरुद्ध, समाजाचे नैतिक अध:पतन थांबविण्याची प्रेरणा यामध्ये आहे. नवविचारांचे आणि प्रेरणांचे लोण तरुण मंडळी ग्रामीण जनतेपर्यंत नेऊन पोहोचवीत आहेत. काही लोक म्हणतात, की विद्यार्थ्यांना कॉलेज सोडून चळवळ करण्यास जे. पी. सांगतात; त्यामुळे तरुण पिढीचे नुकसान होत आहे. नफा आणि नुकसान यांचे मोजमाप काय? कॉलेजातील ग्रंथालयातील पुस्तके वाचून ज्ञान मिळविण्याऐवजी खेड्यापाड्यातील समाजजीवनाचा ग्रंथ त्यांनी वाचावा, त्याचे अध्ययन करावे आणि त्यावर चिंतन करावे. एक वर्षभर त्यांनी हा उपक्रम केला तर ते व्यक्तिशः त्यांच्या व राष्ट्राच्या दृष्टीने हितावहच ठरेल. शहरांमध्ये प्रस्थापितांविरुद्ध संघर्ष करण्यासाठी उभा ठाकलेला तरुण वर्ग जयप्रकाशजी खेड्यापाड्यात नेत आहेत. त्यांची ही कामगिरी इतिहासामध्ये महान् अशीच समजली जाईल. देशाच्या उज्ज्वल भवितव्यासाठी एका नव्या पर्वाचा या आंदोलनाने श्रीगणेशा केला आहे. जयप्रकाशजींचे यश त्यांच्या या थोर कामगिरीतच आहे. विरोधकांनी शिव्याशाप दिले, तरी आपल्याला त्याची पर्वा नाही.


□

सर्व वस्तूंच्या किंमती भरमसाट वाढत आहेत
पण एक अपवाद आहेच



मनःशांती
अर्थात
आयुर्विमा.

दररोज अवघ्या
एका पानाच्या किंमतीत (साधारण २५ पैसे)
आपण २५00 रूपयांचा
३0 वर्षांचा आयुर्विमा *
आपल्या मुलाबाळांच्या
सुखी भवितव्यासाठी
मिळवू शकता.



* आज आपलं वय ३0 असल्यास

PRATIBHA 2317 IVI—MAR—2

योगक्षेमं वहाम्यहम्

आयुर्विम्यामुळे मनःशांती अजूनही आपल्या आटोक्यात आहे

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर